रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक २४६ ▌पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

## ऊस गाळपात पुणे आघाडीवर

**पुणे** : राज्यातील साखर गाळप हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचला असून बहुतांश कारखान्यांमध्ये ऊस पुरवठा कमी होऊ लागला आहे. आत्तापर्यंत राज्यात ९१८ लाख टन उसाचे गाळप होऊन ८५६ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. ऊस गाळपात पुणे जिल्हा आघाडीवर असून, साखर उत्पादनात कोल्हापूर जिल्ह्याने अव्वल स्थान मिळवले आहे. लवकरच काही कारखाने गाळप बंद करण्याची शक्यता आहे. राज्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा साखर उत्पादन अधिक झाले असले तरी अपेक्षित उत्पादन मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे.

## शिवकालीन किल्ल्यांना युनेस्को मानांकन

**मुंबई** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि जिंजी या १२ किल्ल्यांना 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान देण्यात आले आहे. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी फ्रान्समधील युनेस्को कार्यालयात जाऊन स्वीकारले. गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी युनेस्कोच्या अधिवेशनात हा निर्णय जाहीर झाला होता.

# 'गांधारी'त गोंधळ

- पुलाचा पिलर चुकीच्या जागी
- महाड नगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष
- उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांची हरकत
- काम थांबवून पिलर तोडण्याचे दिले आदेश



**उदय सावंत**

**। महाड ।**

महाड शहरात प्रवेश देणाऱ्या गांधारी नदीवरील नव्या पुलाच्या बांधकामात गंभीर त्रुटी उघड झाल्याने महाड नगरपालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ठेकेदाराने उभारलेला एक पिलर तब्बल एक मीटर चुकीच्या जागी बांधल्याचे समोर आले असून, यामुळे शासकीय निधीचा अपव्यय झाल्याची टीका होत आहे. गांधारी पुलाच्या कामातील गोंधळ उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी जनतेसमोर आणला आहे. या पुलाचे काम हरकत घेत तात्काळ थांबवले असून, तांत्रिक पाहणीनंतर हा पिलर पूर्णपणे तोडून नव्याने बांधण्याचे आदेश देण्यात आले. वेळेत ही चूक लक्षात आल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

केंबुर्ली ते महाड मार्गावरील गांधारी नदीवरील जुना पूल नादुरुस्त झाल्याने अनेक वर्षांपासून वाहतुकीसाठी बंद होता. महाड नगरपालिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण विकास योजनेतून नगरविकास खात्याने या पुलासाठी ८ कोटी ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. निविदेनंतर १६ डिसेंबर २०२४ रोजी टी अँड टी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, पुणे या कंपनीला कार्यारंभ आदेश देण्यात आले. याच कंपनीने सावित्री दुर्घटनेनंतर विक्रमी •> पान २ वर

> पुलाच्या कामातील ही चूक अत्यंत गंभीर होती. शासकीय पैशाचा अपव्यय झाला आहे. वेळेत लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. पुढील काम तांत्रिक सक्षम यंत्रणेकडे द्यावे.
> – संदीप जाधव, उपनगराध्यक्ष, महाड

### पैशाचा अपव्यय

चुकीच्या जागी उभारलेला पिलर तोडून पुन्हा बांधावा लागणार असल्याने शासकीय निधीचा अनावश्यक खर्च वाढला आहे. देखरेखीअभावी झालेल्या या त्रुटीमुळे कामाचा कालावधीही लांबणार असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### संभाव्य धोका टळला

पूररेषेखालील, आपत्तीग्रस्त महाडमध्ये पुलाच्या बांधकामातील ही गंभीर चूक भविष्यात थेट जीवितहानीस कारणीभूत ठरू शकली असती. वेळेत त्रुटी उघड झाल्याने मोठा अनर्थ अक्षरशः थोडक्यात टळल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. सावित्री पूल दुर्घटना, दरडी कोसळणे आणि महापुराच्या आठवणी अजून ताज्या असताना अशा निष्काळजीपणामुळे प्रशासनावर संताप व्यक्त केला जात आहे. पुलासारख्या महत्त्वाच्या कामात झालेली ही चूक धोक्याची घंटा मानली जात आहे.

# शिळफाटा परिसरात १५ किलो गांजा जप्त

## शिंदे गटाच्या नगरसेवकांच्या सासऱ्यांच्या घरावर पोलिसांची धाड



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोलीतील शिळफाटा परिसरात पोलिसांनी टाकलेल्या धाडीत तब्बल १५ किलो ४०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. ज्या घरातून हा साठा जप्त झाला, ते घर शिंदे गटाशी संबंधित एका नगरसेवकांच्या सासऱ्यांचे असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर रंगली आहे.

शिळफाटा येथील नवनाथ कॉलनी परिसरात खोपोली पोलिसांनी मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत श्रीपाद गणपत सूर्यवंशी (६६) यांच्या घरातून ३ लाख २२ हजार २०० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला. पटेल नगरजवळ, जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत असलेल्या नवनाथ कॉलनीत सूर्यवंशी यांचा अगरबत्तीचा व्यवसाय आहे. त्यांच्या घरात अमली पदार्थाचा साठा असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यांमार्फत मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी नियोजनबद्ध धाड टाकत घराची झडती घेतली असता गोणीत व •> पान २ वर

## वेधक

### भरधाव टेम्पोची स्कूल बसला धडक

**पनवेल** : भरधाव टेम्पोने समोरुन स्कूल बसला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन शालेय विद्यार्थी जखमी झाल्याची घटना गुरुवारी पनवेलजवळील पुणे-मुंबई हायवेवर पारपुंड गावाजवळील वेलकम हॉटेलच्या समोरील रस्त्यावर घडली आहे.स्कूल बस चालक संदीप मोहिते हा एमएच-०६-झेड-७८५५ ही घेऊन जात असताना समोरुन आलेल्या टेम्पो क्र.एमएच-०१-सीव्ही-७७९८ वरील चालक मिलिंद सपकाळ (४३, रा.मुंबई) याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात झाला.

### विमान दुर्घटनेचा अहवाल समोर

**नवी दिल्ली** : अहमदाबाद विमानतळावर जून २०२५ मध्ये झालेल्या एअर इंडियाच्या भीषण विमान अपघाताने संपूर्ण देश हादरला होता. या अपघाताबाबत आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही दुर्घटना तांत्रिक बिघाडामुळे नसून, जाणीवपूर्वक केलेल्या एका कृत्यामुळे घडल्याचा दावा इटालियन वृत्तपत्र 'कोरीएर डेला सेरा'ने केला आहे. एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान उड्डाण केल्यानंतर काही सेकंदातच कोसळले होते. या दुर्घटनेत २६० जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. मृतांमध्ये विमानातील प्रवाशांसह ज्या हॉस्टेलवर विमान कोसळले, तेथील वैद्यकीय विद्यार्थ्यांचाही समावेश होता.

### हवाई दलाची ताकद वाढणार

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाची घटती युद्धनौका क्षमता पाहता, सरकारने ११४ नवीन लढाऊ विमाने खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ही विमाने मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत भारतात तयार केली जाण्याची शक्यता आहे. केवळ हवाई दलच नाही, तर नौदलासाठी अतिरिक्त पी८आय पाळत ठेवणारी आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमाने खरेदी करण्यासही मंजुरी मिळाली आहे. दरम्यान, सध्या हिंदुस्थानकडे राफेलची दोन स्क्वॉड्रन्स (३६ विमाने) आहेत. मात्र, शेजारील देशांचे आव्हान लक्षात घेता हवाई दलाला मोठ्या प्रमाणात आधुनिक विमानांची गरज होती. ११४ विमानांच्या या नवीन करारामुळे हवाई दलाची मारक क्षमता अनेक पटीने वाढणार आहे.

# रायगडमध्ये कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

## प्रलंबित मागण्यांवर शासनाचे लक्ष वेधले

(छायाचित्र : समीर मालोदे)




**। रायगड । प्रतिनिधी ।**


देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक-शिक्षकेतर, नगरपालिका, ग्रामपंचायत कर्मचारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संयुक्त धरणे आंदोलन व निदर्शने केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

देशातील विविध कामगार संघटनांच्या निर्णयानुसार पाच कोटी कामगार-कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या देशव्यापी संपाला पाठिंबा देत रायगड जिल्ह्यातील कर्मचारी, शिक्षक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'जुनी पेन्शन योजना लागू करा', 'चार कामगार संहिता रद्द करा', 'पीएफआरडीए कायदा रद्द करा', 'कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करा', 'रिक्त पदे तात्काळ भरा', 'कॅशलेस आरोग्य विमा लागू करा', 'खासगीकरण व कंत्राटीकरण थांबवा' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, १ मार्च २०२४ पासून सुधारित पेन्शन लागू करण्याची घोषणा होऊनही त्यासंदर्भातील शासन निर्णय अद्याप निघालेला नसल्याने निवृत्त कर्मचाऱ्यांना लाभ मिळत नाही. विनाअनुदानित व अनुदानित शिक्षक-शिक्षकेतरांना जुनी पेन्शन लागू करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, १०-२०-३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे, नगरपरिषद/ •> पान २ वर

# नवी मुंबई पोलिसांची आता तिसरी नजर

## ४३० बॉडी वॉर्न कॅमेरे आणि गाड्यांना डॅश कॅमने मिळणार बळ



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक पारदर्शक आणि हायटेक करण्यासाठी नवी मुंबई पोलीस दलाने कंबर कसली आहे. वाहतूक पोलिसांच्या अंगावर आता बॉडी वॉर्न कॅमेरे दिसणार असून, पोलीस वाहने देखील आता डॅश कॅमने सज्ज होणार आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या कामात अचूकता तर येईलच; शिवाय वाहनधारकांशी होणारे वाद आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारींनाही लगाम बसणार आहे.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती दिली असून, या प्रकल्पासाठी निधीची तरतूद आणि अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. वाहतूक विभागाला अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) ठाणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. यात एकूण ४३० बॉडी वॉर्न कॅमेऱ्यांचा प्रस्ताव असून, त्यासाठी १.९७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. पहिल्या टप्प्यात ९८.८ लाख रुपये वितरित झाले असून, २३० कॅमेऱ्यांच्या खरेदीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. त्याचप्रमाणे पोलीस वाहनांसाठी १०० डॅश कॅमेऱ्यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. •> पान २ वर

# धावत्या एसटीतून महिलेची उडी

## रोहा-चणेरा मार्गावर धक्कादायक प्रकार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या एसटी बसमध्येच एका ३८ वर्षीय महिलेला भीतीपोटी धावत्या बसमधून उडी मारावी लागल्याची संतापजनक आणि धक्कादायक घटना रोहा बस आगाराच्या चणेरा-रोहा मार्गावर घडली. महादेवखार येथे उतरायचे असूनही वारंवार सांगून, बेल देऊनही बस न थांबवल्याने घाबरलेल्या महिलेने अखेर दरवाजा उघडून उडी मारली. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली, मात्र या प्रकारामुळे एसटी प्रशासनाच्या बेफिकीरीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता चणेरावरून सुटलेल्या रोहा आगाराच्या एसटी बसमध्ये सदर महिला महादेवखार येथे जाण्यासाठी चढली होती. तिने कंडक्टरकडून महादेवखारचे तिकीटही काढले होते. बसमध्ये त्या वेळी चालक, •> पान २ वर

> ही घटना पूर्णपणे गैरसमजातून घडली असून, यामागे कोणताही वाईट हेतू नव्हता. एसटी बसला निश्चित केलेल्या स्टेजप्रमाणे थांबवले जाते. बस न थांबवण्यामागे कोणतेही कारण नव्हते. प्रवाशांनी गैरसमज करून घेऊ नये. चालक आणि वाहकांना समज देण्यात आली असून, यापुढे असा प्रकार होणार नाही याची काळजी घेतली जाईल.
> – श्री. शेलार, आगारप्रमुख, रोहा




## विवाहितेचा छळ; तिघांवर गुन्हा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी येथे विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ डिसेंबर २०२३ ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडली आहे. महिला फिर्यादी यांचे मुख्य आरोपी पती याने फिर्यादी यांना पत्नीचा दर्जा न देता 'मै तुम्हारा खानदान बरबाद कर दूंगा, खत्म कर दूंगा' अशी वारंवार धमकी देऊन फिर्यादी यांचा मानसिक व शारीरिक छळ करून घरातून हाकलून दिले. तसेच सासू व सासरे आरोपी यांनी शिवीगाळ व मारहाण करून घरातून हाकलून दिले. याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भररस्त्यात महिलेवर जीवघेणा हल्ला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल-उरण मार्गावरील सर्विस रोडवर सायंकाळच्या सुमारास एका ३६ वर्षीय महिलेवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संगीता सोमनाथ भोईर असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास आर-३/४ जवळील नाल्याजवळ ही घटना घडली. संगीता भोईर या मार्गावरून येत असताना अज्ञात इसमाने त्यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून, त्यांना उपचारासाठी तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेचे वैशिष्ट्य म्हणजे, जखमी महिलेच्या अंगावर सोन्याचे दागिने होते, या हल्ल्याचा नेमका उद्देश काय होता, याबाबत पोलीस संभ्रमात आहेत. हा प्रकार लुटीच्या उद्देशाने झाला की यामागे काही जुने वैमनस्य आहे, याचा तपास आता पोलीस करत आहेत. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

भरवस्तीत आणि वर्दळीच्या मार्गावर अशा प्रकारे हल्ला झाल्याने नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या पनवेल शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. सदर महिलेला अधिक उपचारार्थ लाईफलाईन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

शासकीय सुट्टीमुळे इच्छुकांचा हिरमोड | १३ किंवा १५ फेब्रुवारीचा मुहूर्त साधण्याची धडपड

# 'व्हॅलेंटाइन डे'ला विवाहबद्ध होण्याची संधी हुकणार!


**। रायगड । प्रतिनिधी ।**

प्रेम व्यक्त करण्याचा दिवस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'व्हॅलेंटाइन डे'ला अनेक जोडपी आयुष्यभराच्या नात्याची अधिकृत नोंद करण्याचे स्वप्न पाहतात. हातात हात घेऊन प्रेमाची शपथ नोंदणी विवाहातून अधिकृत करण्याची इच्छा असते. मात्र, यंदा १४ फेब्रुवारी हा शासकीय सुट्टीचा दिवस (शनिवार) आल्याने रायगडमधील अनेक इच्छुक जोडप्यांचा हा खास मुहूर्त हुकणार आहे.

दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारीदरम्यान साजऱ्या होणाऱ्या 'व्हॅलेंटाइन सप्ताहा'त नोंदणी विवाहांची संख्या वाढलेली दिसते. प्रेमाचा हा आठवडा आणि त्यातील प्रत्येक दिवस साजरा करण्याबरोबरच अनेक तरुण-तरुणी या काळात विवाह नोंदणी करण्यास प्राधान्य देतात. विशेषतः १४ फेब्रुवारीला विवाहबद्ध होण्याचा ट्रेंड गेल्या काही वर्षांत वाढला आहे. मात्र, यंदा ७, ८ आणि १४ फेब्रुवारी हे सुटीचे दिवस आल्याने नोंदणी विवाहासाठी ऑनलाइन स्लॉट मिळूनही त्या दिवशी प्रत्यक्ष विवाह नोंदणी होऊ शकत नाही. त्यामुळे अनेक जोडप्यांचा हिरमोड झाला आहे. प्रेमाचा दिवस आयुष्यभरासाठी •> पान २ वर

### अवघ्या २५० रुपयांत विवाह नोंदणी

नोंदणी विवाहासाठी सध्या ऑनलाइन पूर्वनोंदणी बंधनकारक असून, विवाह अधिकाऱ्यांकडून एका दिवशी जास्तीत जास्त पाचच विवाह नोंदवले जातात. नोंदणी विवाहाची पद्धत अत्यंत सोपी, पारदर्शक आणि अल्पखर्चिक आहे. केवळ २५० रुपयांत हा विवाह कायदेशीररित्या नोंदवता येतो. ऑनलाइन अर्ज केल्यानंतर उपलब्ध स्लॉटनुसार इच्छुकांना कार्यालयीन वेळेत स्वतःच्या सोयीनुसार वेळ निवडता येते. १४ फेब्रुवारी सुट्टीचा दिवस असल्याने इच्छुकांकडून १३ किंवा १५ फेब्रुवारीचा पर्याय निवडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



### नोंदणी विवाहासाठी हे आवश्यक

नोंदणी विवाहासाठी काही आवश्यक अटीही आहेत. वराचे वय २१ वर्षांपेक्षा अधिक व वधूचे १८ वर्षांपेक्षा अधिक असल्याचा पुरावा आवश्यक आहे. त्यापैकी किमान एकाचा रहिवास संबंधित विवाह अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात असणे गरजेचे आहे. शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मदाखला, आधार कार्ड, रेशन कार्ड किंवा इतर शासकीय ओळखपत्र आवश्यक असते. वधू किंवा वर घटस्फोटीत असल्यास न्यायालयाचा आदेश, तसेच विधवा किंवा विधूर असल्यास जोडीदाराच्या मृत्यूचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. याशिवाय ओळखीचे तीन साक्षीदार त्यांच्या ओळखपत्रांसह उपस्थित असणे बंधनकारक आहे.

# दादांना एकटं पाडलं जात होतं!

## रोहित पवारांची माध्यमांना माहिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार तथा दिवंगत नेते अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी विमान अपघातावरुन अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. गुरुवारी माध्यमांशी बोलताना त्यांनी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि नरेश अरोरा यांची नावं घेत गंभीर प्रश्न उपस्थित केले.

रोहित पवार म्हणाले की, मागच्या काही दिवसांपासून अजितदादांना एकटं पाडलं जात होतं. त्याबाबत दादा अनेकदा आमच्याशी बोलले आहेत. अपघाताच्या एक दिवस आधी फाईलवर सही झाली पाहिजे, अशी इच्छा एका मोठ्या नेत्याने व्यक्त केली होती. त्याच्यामुळेच दादांना उशीर झाला आणि विमानाने जावं लागलं. ७ वाजून १३ मिनिटांनी विमानाचं बुकिंग झालं.

नरेश अरोरांबद्दल बोलताना रोहित पवार म्हणाले, नरेश अरोरांच्या कंपनीचा शकडो कोटींचा कॉन्ट्रॅक्ट दादा रद्द करणार होते. त्यावरुन वादविवाद झाले त्यामुळेच दादा गाडीने जाऊ शकले नाहीत. काही दिवसांपूर्वी पुण्यातल्या बारामती हॉस्टेलमध्ये मी आणि दादा बसलो होतो, तेव्हा नरेश अरोराच्या कन्स्लटन्सीचे लोक आले होते. तेव्हाही दादा त्यांच्या स्टाईलमध्ये त्यांना •> पान २ वर

पान १ वरून

## ‘गांधारी’त गोंधळ

वेळेत पूल उभारल्याची नोंद आहे. मात्र, या कामाकडे नगरपालिका प्रशासनाचे पुरेसे लक्ष नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. महाड नगरपालिकेत एकच अभियंता असल्याने शहरातील विविध विकासकामांबरोबर पुलाच्या कामावर आवश्यक देखरेख राहिली नाही. त्याचा परिणाम म्हणून दोन पिलरपैकी क्रमांक एकचा पिलर आबारमेंटच्या मध्यरेषेपासून जवळपास एक मीटर बाजूला उभारला गेला. ही गंभीर बाब स्थानिक नगरसेवक वजीर कोंडेकर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांना माहिती दिली. जाधव यांनी तात्काळ घटनास्थळी पाहणी करून काम थांबवण्याच्या सूचना दिल्या व चुकीचा पिलर तोडून नव्याने बांधण्याबाबत नगरपालिकेला लेखी पत्र दिले.

या कामाची तांत्रिक पाहणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील प्राध्यापक डॉ. सचिन पोरे यांनी केली. त्यांच्या अहवालानुसार, पिलर चुकीच्या रेषेत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार महाड नगरपालिकेचे अभियंता प्रवीण कदम यांनी ठेकेदाराला पिलर पूर्णपणे तोडण्याचे आदेश दिले असून, पिलर तोडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महाड हे पूररेषेखालील व आपत्तीप्रवण शहर आहे. सावित्री पूल दुर्घटना, २००५ मधील दरडी कोसळणे, आंबिवली कोकण रेल्वे अपघात, २०२१ चा महापूर अशा घटनांनी महाडकर आधीच भयभीत आहेत. अशा परिस्थितीत पुलाच्या बांधकामातील ही गंभीर चूक भविष्यात मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकली असती. वेळेत त्रुटी लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी या घटनेनंतर महाड नगरपालिकेची यंत्रणा अशा तांत्रिक कामांसाठी सक्षम नसल्याचे मत व्यक्त केले. पुढील बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करून त्यांच्या देखरेखीखाली करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## रायगडमध्ये कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

नगरपंचायत आकृतीबंध तयार करणे, १० वर्षे सेवा केलेल्या कंत्राटी/रोजंदारी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा देणे, रिक्त पदे भरणे, शिक्षकांवरील १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासन आदेशाचा पुनर्विचार, नवीन शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार आदी मागण्यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारच्या पातळीवरील मागण्यांमध्ये चार कामगार संहिता रद्द करणे, असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा, किमान वेतन ३० हजार रुपये लागू करणे, सर्व ज्येष्ठांना १० हजार रुपये पेन्शन, सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण थांबवणे, आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी, आशा-अंगणवाडी व इतर योजना कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण आदी मुद्द्यांकडेही लक्ष वेधण्यात आले.

या आंदोलनात कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये प्रभाकर नाईक (निमंत्रक), संतोष पवार (सरचिटणीस), संदीप नागे (कोषाध्यक्ष), डॉ. कैलास चोलकर (कार्याध्यक्ष), सुरेश पालकर, परशुराम म्हात्रे (राज्य प्रतिनिधी), रानाकर देसाई (सहसचिव), प्रफुल्ल कानिटकर (सहसचिव), दर्शना पाटील (कोषाध्यक्ष) यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. दरम्यान, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.

## धावत्या एसटीतून महिलेची उडी

वाहक आणि ही महिला एवढेच प्रवासी असल्याचे तिने तक्रारीत नमूद केले आहे. बस सुटल्यानंतर बसमधील लाईट बंद करण्यात आल्याचा आरोपही महिलेने केला आहे.

महादेवखार जवळ आल्याचे लक्षात येताच महिलेने कंडक्टरला बस थांबवण्यास सांगितले आणि बेल मारण्याची विनंती केली. चालकालादेखील तिने बस थांबवण्यास सांगितले. एकदा-दोनदा नव्हे तर, चार वेळा विनंती करूनही चालक-वाहकांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा महिलेचा आरोप आहे. बसमध्ये ती एकटीच प्रवासी असल्याने तिच्या मनात भीती निर्माण झाली. महादेवखार बसथांबा येताच चढणीवर बसचा वेग कमी झाल्याचा अंदाज घेत, चालक-वाहक बोलण्यात गुंग असल्याचा फायदा घेऊन महिलेने दरवाजा उघडला आणि धावत्या बसमधून उडी मारली. या प्रकारात तिच्या हातापायाला मुका मार लागला, मात्र मोठी दुखापत टळली. धक्कादायक म्हणजे, महिला उडी मारल्यानंतरही बस थांबवण्यात आली नसल्याचा आरोप महिलेने केला आहे.

घाबरलेल्या अवस्थेत महिलेने आणि तिच्या पतीने रोहा पोलीस ठाण्यात संबंधित एसटी चालक व वाहकाविरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी रोहा आगाराचे अधिकारी तसेच संबंधित चालक-वाहकांना पोलीस ठाण्यात बोलावून जाब विचारला. पोलिसांच्या मध्यस्थीने दोन्ही बाजू समोरासमोर आल्यावर हा प्रकार गैरसमजातून झाल्याचे सांगण्यात आले. चालक आणि वाहकांनी झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. तसेच या चालक-वाहकांना यापुढे या मार्गावर पाठवले जाणार नसल्याचे आश्वासन आगार अधिकाऱ्यांनी दिल्याचे समजते. अखेर हे प्रकरण पोलिसांच्या हस्तक्षेपाने मिटवण्यात आले.

पीडित महिलेने तक्रार अर्ज दिल्यानंतर आगाराचे अधिकारी तसेच संबंधित चालक-वाहकांना पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते. पीडित महिला व तिचे पतीही उपस्थित होते. हा प्रकार गैरसमजातून झाल्याचे स्पष्ट झाले. चालक-वाहकांनी माफी मागितली असून, यापुढे अशी घटना घडणार नाही, असे त्यांनी आश्वासन दिले आहे.

- मारुती पाटील, पोलीस निरीक्षक, रोहा

## शिळफाटा येथे १५ किलो गांजा जप्त

सीलबंद खाकी पॅकेटमध्ये साठवलेला, उग्र वास असलेला हिरवट-काळपट रंगाचा पाने, फुले व बिया असलेला गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये १५ किलो ४०० ग्रॅम गांजा, एक मोबाईल फोन व वजन काटा यांचा समावेश आहे.याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल नेहूल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन हिरे पुढील तपास करत आहेत. दरम्यान, ज्या घरातून हा साठा जप्त झाला ते घर शिंदे गटाशी संबंधित एका नगरसेवकांच्या सासऱ्यांचे असल्याची चर्चा शहरात रंगत असून या कारवाईमुळे खोपोलीत एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून या संदर्भातील अधिक तपास सुरू आहे.

## नवी मुंबई पोलिसांची आता तिसरी नजर

सद्यःस्थितीत मंत्रालयाकडून तांत्रिक मान्यतेची प्रक्रिया सुरु असून, या कॅमेऱ्यांच्या चाचण्या प्रगतीपथावर आहेत.

अनेकदा वाहतूक नियम मोडल्यावरुन पोलीस आणि नागरिक यांच्यात खटके उडतात. अशा वेळी बॉडी वॉर्न कॅमेरा हा ठोस पुरावा म्हणून काम करेल. तसेच, पोलीस वाहनांवरील डॅश कॅमेऱ्यांमुळे रस्ते अपघात किंवा गुन्हेगारी घटनांचे थेट चित्रीकरण उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पारदर्शकता वाढणार असून, गुन्हेगारीला चाप बसणार आहे. त्याचप्रमाणे पोलिसांवरील खोट्या आरोपांना आळा बसेल. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर राहील. तसेच डिजिटल पुराव्यांमुळे न्यायालयीन प्रक्रियेत मदत होणार आहे. मिलिंद भारंबे (पोलीस आयुक्त, नवी मुंबई) तंत्रज्ञानाचा वापर करुन पोलीस दलाला अधिक कार्यक्षम बनवणे हा आमचा उद्देश आहे. बॉडी वॉर्न कॅमेऱ्यांमुळे पोलिसांच्या कामकाजात पारदर्शकता येईल आणि डॅश कॅमेऱ्यांमुळे गस्ती दरम्यानच्या घटनांचे अचूक दस्तऐवजीकरण होईल. यामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वासार्हता अधिक वाढेल.

## दादांना एकटं पाडलं जात होतं!

झापत होते. २७ तारखेलाही शेकडो कोटींच्या या कॉन्ट्रॅक्टबद्दल चर्चा झाली होती. काही ठाराविक नेत्यांची ती भूमिका होती की, हे काम चालूच राहिलं पाहिजे. मात्र, अजितदादांची त्यांच्या विरोधातली भूमिका होती. तटकरे त्याबद्दलच बोलत होते, असा मला अंदाज असल्याचं रोहित पवार म्हणाले. २७ तारखेला तटकरे साहेब स्वतः उशिरापर्यंत दादांसोबत थांबलेले होते, असंही पवार म्हणाले.

रोहित पवार पुढे बोलले, प्रफुल्ल पटेलांचा एका फाईलसाठी फोन आला होता, त्यामुळेच दादांना निघण्यास उशीर झाला, असं प्रमोद हिंदुराव म्हणालेले आहेत. दादांच्या बाजूने आज कुणीतरी बोलतंय, असं मला वाटतंय. असं म्हणत त्यांनी पटेल, तटकरे आणि अरोरा यांच्याकडे संशयाचं बोट केलं आहे.

## ‘व्हॅलेंटाइन डे’ला विवाहबद्ध होण्याची संधी हुकणार!

संस्मरणीय करण्याची इच्छा असलेल्या जोडप्यांसाठी यंदाचा ‘व्हॅलेंटाइन डे’ नोंदणी विवाहासाठी उपलब्ध नसला, तरी पर्यायी तारखांवर विवाह नोंदवून प्रेमाच्या नात्याला कायदेशीर मान्यता देण्याचा मार्ग खुला आहे.

## पर्यटकांना ‘सातखणी’चे आकर्षण

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा आगरकोट किल्ला हा पोर्तुगीज काळातील अभेद्य बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. समुद्रकिनाऱ्यालगतची तटबंदी, डॉमिनिकन व फ्रान्सिस्कन चर्चचे अवशेष, विविध बुरूज आणि विशेषतः सातखणी बुरूज पाहण्यासाठी येथे पर्यटकांची नेहमीच गर्दी असते.

आगरकोट किल्ल्याच्या वायव्येकडील बुरूजाजवळील लहान दरवाजापासून सुमारे ४५.७२ मीटर अंतरावर, तटबंदीच्या पश्चिम भिंतीत पडलेल्या भगदाडासमोर फ्रान्सिस्कन इमारतीच्या मध्यभागी हा सातखणी बुरूज उभा आहे. सुमारे १५३४ च्या सुमारास बांधलेल्या या बुरूजाचा आकार ६.०९ मीटर चौकोनी असून, पूर्वी त्याची उंची सुमारे २९.२६ मीटर असल्याची नोंद आहे. मात्र वरच्या भिंती कोसळल्याने सध्या उंची कमी झालेली दिसते. आजूबाजूच्या इमारतींच्या भिंती पडून फक्त अर्धवट अवशेष उरलेले आहेत. समुद्रमार्गे होणाऱ्या शत्रूच्या हालचालींवर करडी नजर ठेवण्यासाठी या बुरूजाची बांधणी करण्यात आली असावी, असे इतिहासतज्ज्ञांचे मत आहे. बुरूजाच्या माथ्यावरून दूरवरचा समुद्रकिनारा स्पष्ट दिसत असल्याने पहारा देण्यासाठी हा बुरूज अत्यंत उपयुक्त ठरत असावा. सध्या रेवदंडा मोठे बंदरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून सातखणी बुरूजाकडे सहज जाता येते. ऐतिहासिक वारसा अनुभवण्यासाठी पर्यटकांची नेहमीच गर्दी दिसून येते.


### जाहिर नोटीस

सर्व सामान्य जनतेस व सर्व संबंधितांस असे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. रोहन अजित ताम्हाणे आणि श्री.अजित ताम्हाणे तर्फे मे. ताम्हाणे आणि कं. ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर्स, यांच्या निदर्शनास ॲडव्होकेट गणेश गोविंद पाटील यांनी त्यांचे अशिल (१) अनिता कैलाश गांधी, (२) अलका अनिल पाटील, (३) संगिता पुरुषोत्तम शहा, (४) हेमांगी हेमंत साखळे, (५) सरिता संतोष ओसवाल आणि (६) संतोष पुरुषोत्तम शहा यांच्या वतीने दैनिक कृषीवल दिनांक १२.०२.२०२६ रोजीच्या वर्तमान पत्रात माझ्या अशिलांबरोबर केलेले करार व कागदपत्रे बेकायदेशीररीत्या रद्द केल्याचे जाहिर केले आहे. सदरची जाहिरात ही पूर्णपणे दिशाभूल चुकिची व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी आहे.

माझ्या अशिलांच्या वतीने मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की. श्रीमती अनिता गांधी व इतर यांनी खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत जी काही माझ्या अशिलांबरोबर करार व कागदपत्रे सही केलेली आहेत ते सर्व करार व कागदपत्रे वैध, अस्तित्वात असलेली आणि बंधनकारक (valid, subsisting and binding) आहेत, त्या संदर्भात त्यांनी माझे अशिल श्री. रोहन ताम्हाणे यांच्याकडून मोबदला देखील घेतलेला आहे व सदर सर्व कागदपत्रे ही कधीही रद्द न होणाऱ्या (irrevocable) स्वरुपाची आहेत. सदर करारातील अटी व शर्तीची पूतर्ता श्रीमती अनिता गांधी व इतर यांनी आजपावेतो केलेली नाही माझे अशिल सदरच्या करारांची पूर्ता करण्यास तयार (ready and wiling) आहेत.

त्या संदर्भात श्रीमती अनिता गांधी व इतर यांना माझ्या अशिलांकडून दिनांक १०.१२.२०२५ रोजीची कायदेशीर नोटीस दिली गेली होती. त्या नोटीसीच्या अनुशंगाने ॲडव्होकेट गणेश गोविंद पाटील यांनी त्यांच्या वरील अशिलांच्या वतीने दिनांक २०.०१.२०२६ रोजी त्यांचे पत्र देऊन वरील नमूद केलेल्या मिळकतीचे कागदपत्रे हे बेकायदेशीररीत्या व करारात नमूद केले नसताना रद्द केल्याचे बेकायदेशीररीत्या सांगितले आहे. सदर पत्रात त्यांनी सर्व कागदपत्रे श्रीमती अनिता गांधी व इतर यांनी निष्पादित केल्याचे कबूल केले आहे व मोबदला दिल्याचे देखील कबूल केलेले आहे, अशी वस्तुस्थिती असताना त्यानंतर दिनांक २०.०१.२०२६ रोजी माझ्यातर्फे माझ्या अशिलांनी वरील पत्रास प्रत्युत्तर दिलेले आहे.

वरील सर्व बाबींची शहानिशा न करता वरील वर्तमानपत्रात दिनांक १२.०२.२०२६ रोजीची जाहिरात आलेली आहे ती संपूर्ण चुकीची, खोडसाळ व दिशाभूल करणारी आहे.

सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, सदरचे करार, मुखत्यारपत्र व इतर कागदपत्रे जी माझ्या अशिलांच्या लाभात श्रीमती अनिता गांधी व इतर यांनी केली आहेत ती सर्व कागदपत्रे कधीही रद्द न होण्याच्या व वरील सर्वांनी स्वखुशीने कुठलाही दबाव न येता नोटरीसमोर सही करुन त्याबद्दलचा मोबदला घेतलेला आहे. सदरची कागदपत्रे ही कधीही रद्द न होणारी आहेत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

यासंदर्भात माझे अशिल यांनी यापूर्वीच ॲडव्होकेट सरिता शहा/ओसवाल व श्रीमती संगिता शहा यांच्या विरुद्ध योग्य त्या न्यायाधिकरणाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत. तसेच वरील ॲडव्होकेट गणेश गोविंद पाटील यांच्या सर्व अशिलांनी माझ्या अशिलांची बदनामी केल्यामुळे बदनामीच्या कारवाईस देखिल ते पात्र आहेत, त्या संदर्भात माझ्या अशिलांतर्फे वरील सर्वांना नोटीसेस जारी केलेल्या आहेत.

सदर नोटीसेस त्यांना पोचल्या असून त्याबाबत त्यांनी आजपर्यंत कुठलेही अवाक्षर काढलेले नाही. याचा अर्थ त्यांना सदर नोटीसेस मध्ये लिहिलेला मजकूर कबूल व मंजूर आहे.

श्रीमती अनिता गांधी व इतर यांच्या विरुद्ध माझे अशिल योग्य त्या न्यायालयात दाद मागणार आहेत.

तरी देखील वरील सर्व परिस्थितीचा विचार करता सदरच्या मिळकतीत श्रीमती अनिता गांधी व इतर यांचे अविभाज्य किंवा वैयक्तिक जे हक्क आहेत ते सर्व अधिकार त्यांनी माझे अशिल रोहन अजित ताम्हाणे यांना वरील नमूद केलेल्या करार व कागदपत्रात व साठेकरार आणि मुखत्यारपत्र दिनांक १०.१२.२०२४ रोजी दिलेले आहेत. सदरची कागदपत्रे ही कधीही रद्द होणारे नाहीत.

यामुळे दिनांक १२.०२.२०२६ रोजीची ॲडव्होकेट गणेश गोविंद पाटील यांची सदर जाहिरात ही दिशाभूल करणारी, चुकीची बेकायदेशीर व खोडसाळपणे केलेली आहे.

जर यदाकदाचित वरील जाहिरातीला भुलून जर कोणी श्रीमती अनिता गांधी व इतर यांच्याशी खालील मिळकतीतील त्यांच्या अविभाज्य हिश्श्याशी कुठलाही बेकायदेशीर व्यवहार केला तर सदर व्यवहार हा फसवणूकीचा व धोकाधाडीचा असा ग्राह्य धरुन माझे अशिल श्रीमती अनिता गांधी व इतर तसेच अन्य त्रयस्थ यांच्यावर कायदेशीर तसेच फौजदारी कारवाई करतील याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच, सदर जर कुठली कारवाई श्रीमती अनिता गांधी व इतर यांच्याकडून झाली तर सदरची कारवाई ही माझ्या अशिलांच्या निष्पादित केलेल्या कागदपत्रांच्या सापेक्ष राहिल. याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**पहिले परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरुषोत्तम हिराचंद शाह तर्फे श्रीमती अनिता गांधी व इतर यांचे १/३ अविभाजीत शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र | गट क्र. | क्षेत्र एच.आर.पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मांडवे-झिराड | २ | १ सी ३ | - | ०-२३-३ | ७.०२ |
| | | | | - | ०-०३-३ | |
| २. | - | ९ | १ए१बी२ | - | ०-१२-९ | ३.६८ |
| | | | | | ०-०२-६ | |
| ३. | - | ९ | १ए१ए४ | - | ०-२३-७ | ७.११ |
| | | | | | ०-०५-१ | |
| ४. | | ९ | १ए१ए३ | - | १-०९-९ | २.८९ |
| | | | | | ०-०१-८ | |
| ५. | - | ५ | २ | - | २-२६-९ | २.९९ |
| | | | | | ०-६८-१ | |
| ६. | - | ४ए | १ | - | ०-२२-० | ०.४७ |
| | | | | | ०-०६-० | |
| ७. | धोकवडे | - | - | ३५१ | ०-२३-९ | ४.१४ |
| | | | | | ०-०१-० | |

**दुसरे परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरुषोत्तम हिराचंद शाह तर्फे श्रीमती अनिता गांधी व इतर यांचे १/४ अविभाजीत शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर.पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | - | - | २९४ए | २-७०-४८ | ३.६६ |
| २. | | - | - | २६२ | ३-०६-० | ५.६२ |
| | | | | | ०-०८-० | |
| ३. | | - | - | २१४ बी | ०-०३-१८ | ४.८० |

**तिसरे परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरुषोत्तम हिराचंद शाह तर्फे श्रीमती अनिता गांधी व इतर यांचे अविभाजीत शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर.पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे | - | - | ४९१ | ०-६२-० | १.१२ |

दिनांक १३ फेब्रुवारी,२०२६.

**(संदिप सूर्यवंशी)**
सी-४, श्री वक्रतुंड कॉ.ऑप.हौ.सोसा.,
प्लॉट क्रं. ५६५, सेक्टर क्रं.५, चारकोप,
कांदिवली पश्चिम, मुंबई- ४०० ०६७.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मोहन लक्ष्मण ठाकूर, रा.मु.पो.मिठेखार, ता.मुरुड, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेहेर, ता.मुरुड | ३९/६/अ | ०.६३.३० | ०.४५ |

या मिळकती पैकी श्री. मोहन लक्ष्मण ठाकूर यांचे नावे असलेले ०.११.२० हे. आर.चौ मी. व पोटखराबा ०.०७.१० हे. आर. चौ मी. असे एकूण ०.१८.३० इतके क्षेत्र.

वर वर्णन केलेली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजरहित असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे.

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहान, दान, लीज, लीन, पोटगी, हवाला, साठेकारार, खरेदी, कर्ज, वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास त्यासंबंधीच्या कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व या नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार तसेच सदरची हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

याची सर्वांनी या जाहीर नोटीसीने नोंद घ्यावी.

अलिबाग.
तारीख : ..../...../२०२

**ॲड. उमेश एन.पाटील**
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड
मोबाईल :९८५०६७१९५७



### लिलाव जाहिरात

प्राथमिक शाळा खंडाळे यांजकडून ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे हद्दीतील सर्व ग्रामस्थ यांस कळविण्यात येते की, प्राथमिक शाळा खंडाळे मधील जुन्या इमारतीच्या साहित्यांचा लिलाव करणेचे ठरविण्यात आले आहे. सदरचा लिलाव शुक्रवार दि.२०.२.२०२६ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता प्राथमिक शाळा खंडाळे येथे मुख्याध्यापिका व शाळा व्यवस्थापन समिती खंडाळे यांचे समक्ष पुकारला जाणार आहे.

| अ.क्र | साहित्याचे नाव | संख्या | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सागाचे लाकूड | १२४ | १४२६६/- | |
| २ | रिप पट्टी | ९२ | ५२७८/- | |
| ३ | कौले | २४८ | २९८९/- | |

**अटी व शर्ती-**

१. उपस्थितांमधील रु. १०००/-लिलाव बोली रक्कम भरल्याखेरीज लिलाव बोलता येणार नाही तसेच लिलाव बोली भरलेली रक्कम २० दिवसांनी परत करण्यात येईल व ज्या लिलावधारकाच्या नावे लिलाव मंजुर होईल त्या लिलाव धारकास लिलाव बोली रक्कम परत मिळणार नाही.
२. लिलाव हा ठरलेल्या दिवशी व सदर वेळेतच होईल.
३. लिलाव मंजुर झाल्यानंतर सदरच्या वस्तू जागेवरून नेण्याची जबाबदारी लिलाव मंजुर झालेल्या लिलावधारकाची असेल.
४. लिलावधारकास निश्चित झालेली रक्कम लिलावाच्या दिवशी रक्कम भरणा करणेत यावी.
५. लिलावधारक हा गुप ग्रामपंचायत खंडाळे हद्दीतील ग्रामस्थ यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

वरील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास लिलाव रद्द करणेचा अधिकार मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन खंडाळे यांना ठेवणेत आला आहे.

**सही/-**
**अध्यक्ष**
**शाळा व्यवस्थापन समिती,शाळा खंडाळा**
**ता. अलिबाग, जि. रायगड.**

**सही/-**
**मुख्याध्यापक**
**रा.जि.प. शाळा, शाळा खंडाळा**
**ता. अलिबाग, जि. रायगड**



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील सर्व्हे नं. २७, पो.नं. अ ४ वर उभारण्यात आलेल्या नियोजित सिगल रेसिडेन्सी बिल्डींग नं.१ सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील ए विंग मधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं.३०१ क्षेत्र ४५७.९२ चौ. फूट (४२.५६ चौ.मी.) चटई क्षेत्र ग्रामपंचायत चेंढरे मिळकत क्र.१६८१/७ ही पार्वती महादेव सगर व मिनाक्षी राजू सगर यांचे नावे व ताबेकब्जा वहिवाटीत असलेली सदनिका विकत घेण्याचे ठरविले आहे.

संदर्भित निवासी सदनिका मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, अखत्यारपत्र, बक्षिस, ताबा, बोजा, असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन आमची खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १२.०२.२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८२२१८६७४०



### जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील ॲड.

**श्रीवर्धन येथील मा.कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात.**

अर्ज क्र. /२०२६

श्रीम.जरीना नसूरुद्दीन हसवारे
व्यवसाय- गृहिणी — अर्जदार
रा.बोर्लीपंचतन ता.श्रीवर्धन, जि.रायगड

**विरुद्ध**

१) मा.गटविकास पंचायत समिती
ता.श्रीवर्धन, जि.रायगड
२) मा.ग्रामपंचायत बोर्लीपंचतन, — सामनेवाला
ता.श्रीवर्धन, जि.रायगड

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, यातील अर्जदार श्रीम. जरीना नसूरुद्दीन हसवारे, रा.बोर्लीपंचतन ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील रहिवासी आहेत. माझा स्वतः चा जन्म दाखला दि.२७/०६/१९८४ रोजी मु. बोर्लीपंचतन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड झाला असून त्यांच्या जन्माच्या नोंदीबाबत दाखला मिळणेकरीता व तथा प्रकारचे निर्देश यातील सामनेवाला यांस में.कोर्टामार्फत देणेकरीता में कोर्टात जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करुन मिळणेकरीता में. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामाकरीता हवा आहे.

सबब या नोटीसीने कळविण्यांत येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरवल या तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व माझा मु. बोर्लीपंचतन स्वतः श्रीम. जरीना नसूरुद्दीन हसवारे यांचा जन्म दि.२७/०६/१९८४ रोजी ता.श्रीवर्धन, जि.रायगड झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा.न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाची तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण- श्रीवर्धन
दिनांक- १२/०२/२०२६

**मा.कार्यकारी दंडाधिकारी**
**ता.श्रीवर्धन, जि. रायगड**



**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**
**ता. माणगाव, जि. रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/ वस्तूचे नाव | कामाचे परिमाण (संख्या) | निधीचा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलामुलींना संगणक प्रशिक्षण देणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ५००००/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| २ | शाळेतील मुलांना स्कॉलरशिप व नवोदय पुस्तक देणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | १०७३२/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ३ | सर्व शाळांना खेळाचे साहित्य पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २४/२५ ग्राप स्तर | ३६९५७/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ४ | मेडीक्लोर घेणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ४५०००/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ५ | First and kit पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १००००/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | | |
| ६ | कविलवहाळ बु. शाळेला संरक्षण भिंत बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ९९२५५/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९९२ | २०० |
| ७ | कविलवहाळ खुर्द बौद्धवाडी स्मशानभूमीला शेड करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ९८९६४/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९८१ | २०० |
| ८ | कविलवहाळ बु. पाणीपुरवठा टाकीला रंगरंगोटी करणे व पायऱ्या दुरूस्ती करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १२५०००/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १२५० | २०० |
| ९ | कविलवहाळ बु. पाणीपुरवठा टाकीला कंपाऊंड व पी.सी.सी. करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | ५५०००/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५५० | १०० |
| १० | कविलवहाळ कोंड विहिरीकडे जाणारा रस्ता करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १४३१९२/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १४३१ | २०० |
| ११ | धनगरवाडी येथे अंतर्गत रस्ता करणे | १ | १५ वा वित्त आयोग २५/२६ ग्राप स्तर | १६७८३२/- | १ वर्ष | २०/०२/२०२६ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १६७८ | २०० |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. २३/०२/२०२६ रोजी स. ठीक ११.०० वाजता ग्रा.पं. कविलवहाळ बुद्रुक येथे मा. सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सा़ो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं. चे मा. सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

# निवडक



## रोख रक्कम चोरट्यांनी केली लंपास

**कोलाड** : मध्यरात्रीच्या सुमारास आंबेवाडी बाजारपेठेतील महादेव अंबाजी लोखंडे यांच्या जनता पान सेंटरच्या दुकानाचे शटर तोडून चोरट्याने रोख रक्कम व सिगारेटचा माल लंपास केल्याची घटना घडली. यामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण दिसून येत आहे. दिवसेंदिवस रोहा तालुक्यात चोरीच्या घटना वाढत असुन शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास आंबेवाडी बाजारपेठेतील महादेव अंबाजी लोखंडे यांच्या जनता पान सेंटरच्या दुकानाचे शटर तोडून दुकानातुन रोख रक्कम १५०० रुपये तसेच ३५०० रुपयाचा सिगारेटचा माल चोरट्यानी लंपास केला आहे. या अगोदर आंबेवाडी बाजारपेठेत रात्रीच्या सुमारास एका व्यापाऱ्याचे शटर तोडून चोरीचा प्रकार घडला आहे. मार्केटमध्ये आर्थिक मंदी सुरु असताना अशा घटना घडल्या जात असल्यामुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जितेंद्र म्हात्रे यांना मातृशोक

**उरण** : न्हावा येथील माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांच्या मातोश्री बबीबाई दामोदर म्हात्रे (वय९१) यांचे निधन झाले. हे समजताच सर्व राजकीय पक्षातील नेत्यांनी जितेंद्र म्हात्रे परिवाराचे



सांत्वन केले आणि सुख-दुःखात आपल्या मागे आम्ही खंबीरपणे आहोत, असा आशावाद दिला. दिवंगत बबीबाई म्हात्रे यांनी गरिबीतून वाटचाल करीत कुटुंब सावरले. जितेंद्र म्हात्रे हे सरपंच झाल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य गुरुवारी (दि.१२) न्हावा येथे राहत्या घरी होणार आहे.



## कर्नाळा खिंडीत मृत्यूचा सापळा

**मुंबई** : मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा खिंडीतला रस्ता दिवसेंदिवस धोकादायक बनत चालला आहे. रस्त्याच्या कडेला साचलेली धूळ व मातीमुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर ओव्हरलोड अवजड वाहने, प्रवासी वाहतूक आणि दुचाकींची सतत वर्दळ असते. मात्र कडेला साचलेल्या मातीवरून घसरून अनेक दुचाकीस्वारांचे अपघात झाले आहेत. काहींना जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग वाहतूक पोलीस आणि आरटीओ प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत. अपघात झाल्यानंतरच हालचाल होते, अशी नागरिकांची नाराजी आहे. या ठिकाणी तातडीने रस्ता स्वच्छता, धोकादायक भागांची दुरुस्ती आणि देखरेख गरजेची आहे. तसेच वेग मर्यादा दर्शविणारे स्पष्ट फलक व इशारा फलक लावणे अत्यावश्यक आहे. आणखी किती जीव गेल्यानंतर प्रशासन कायमस्वरूपी उपाययोजना करणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

## टंकलेखक परीक्षा होणार ऑनलाईन

रायगड : सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदाकरिता टिसीएस -आयओएन यांच्यामार्फत दि.१४ मार्च२०२६ रोजी दुपारी ०१.०० ते ०३.०० या वेळेत ऑनलाईन परीक्षा होणार आहे अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग यांनी दिली आहे.

# कुष्ठरोग निर्मूलन करणार ‘कुसुम’

## लक्षणे दिसल्यास तपासणी करण्याचे आवाहन; शून्य कुष्ठरुग्ण प्रसाराचा निर्धार

**| रायगड | प्रतिनिधी |**

केंद्र शासनाने २०२७ पर्यंत देशाला 'शून्य कुष्ठरुग्ण प्रसार' करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्‍चित केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरात 'कुसुम' (कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र) अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील वीटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरित मजूर, बांधकाम मजूर, आश्रम शाळा व वसतिगृहातील विद्यार्थी तसेच कारागृहातील कैदी अशा वंचित घटकांची प्रत्यक्ष शारीरिक तपासणी केली जात आहे.



**कुष्ठरोग आता 'नोटिफायबल डिसीज'**

कुष्ठरोगाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने याला 'नोटिफायबल डिसीज' जाहीर केले आहे. आता खासगी रुग्णालये किंवा डॉक्टरांकडे कुष्ठरुग्ण आढळल्यास त्याची माहिती सरकारला देणे कायद्याने बंधनकारक आहे. माहिती लपवणाऱ्यांवर कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी योग्य माहिती देण्याचे आवाहन होत आहे.

**वेळीच निदानाने होतो बरा**

कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा रोग आहे. मात्र, त्यावर वेळीच निदान व उपचार होणे गरजेचे आहे. जिल्ह्यात कुसुम या अभियानांतर्गत कुष्ठरोग शोधमोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी रोगाची माहिती न लपविता पुढाकार घ्यावा, वेळीच उपचारासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

**आजाराची लक्षणे**

त्वचेवर फिकट, तांबूस किंवा तेलकट चट्टा असणे. चट्टा असलेल्या ठिकाणी स्पर्शज्ञान नसणे किंवा घाम न येणे. हातापायांच्या नसा जाड होणे किंवा हातापायांत मुंग्या येणे. हातापायांतील ताकद कमी होणे.

**२०२७ पर्यंत शून्य प्रसार उद्दिष्ट**

केंद्र शासनाने २०२७ वर्षापर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे लक्ष्य ठरविले आहे. यासाठी नवे रुग्ण शोध मोहिमेसोबतच जनजागृती केली जात असून, नवीन रुग्ण आढळण्याचे प्रमाण पूर्णपणे थांबवण्याचे नियोजन आहे.

कुष्ठरोग हा मायकोबॅक्टेरीयम लेप्री या जंतुमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून त्वचा, परिघीय नसा, डोळे आणि इतर अवयवांवर त्याचा परिणाम होतो. या आजाराबद्दल समाजात अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव कायम आहेत. लवकर निदान न झाल्यास आणि उपचारात विलंब झाल्यास रुग्णांमध्ये विकृती निर्माण होते. त्यामुळे वेळेत निदान आणि संपूर्ण औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख घटक असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने सन २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र हे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरुग्णांविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. सद्यस्थितीत, सप्टेंबर २०२५ अखेर राज्यात ७,८६३ नव्या कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे.

**जिल्हास्तरापर्यंत जनजागृती**

या अभियानांतर्गत गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत विविध प्रकारे जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असून, आरोग्य तपासणी शिबिरे, माहितीपर कार्यक्रम, पोस्टर-बॅनरद्वारे प्रचार, शाळा-महाविद्यालयांतून जनजागृती तसेच लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

# ‘लेक शिकवा’ अभियानांतर्गत हळदी-कुंकू

## रांगोळी स्पर्धा आणि जनजागृतीपर मार्गदर्शनाने रंगला कार्यक्रम

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

नवघर शाळेमध्ये मलेक शिकवाफ अभियानांतर्गत हळदी-कुंकू कार्यक्रमाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळा परिसरात उत्साहाचे आणि प्रबोधनाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे माता-पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेली रांगोळी स्पर्धा. स्त्री शिक्षणाचा संदेश आणि सामाजिक विषयांवर आधारित सुंदर रांगोळ्यांनी शाळेचे अंगण सजले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत लेक वाचवा, लेक शिकवा हा संदेश घराघरात पोहोचवला.



या प्रसंगी नवघर येथील ज्येष्ठ नागरिक जोशी काकू यांनी उपस्थित माता आणि मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम आणि मुलींचे योग्य संगोपन या विषयांवर प्रकाश टाकला. मुलींना शिक्षण देऊन स्वावलंबी बनवणे हीच काळाची गरज आहे, असे विचार त्यांनी मांडले.

परंपरेचा वारसा जपत शाळेतील सर्व महिला शिक्षिका आणि विद्यार्थिनींनी नटून-थटून या सोहळ्यात सहभाग घेतला. एकमेकींना हळदी-कुंकू लावून आणि वाण वाटून सण साजरा करण्यात आला. केवळ धार्मिक विधी म्हणून नव्हे, तर मुलींच्या शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी एकत्र येण्याचे प्रतीक म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले गेले.

# श्रीवर्धनमध्ये पाणी गळती

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पातून शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला बसवण्यात आलेल्या एअर व्हॉल्वमधुन पाणी गळती होत असल्याने अनेक लिटर पाणी वाया जात आहे.

श्रीवर्धन येथे पाणी पुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांमधुन पाण्याबरोबर येत असलेली हवा बाहेर काढण्यासाठी आणि जलवाहिनी निकामी होऊ नये याकरिता अनेक ठिकाणी एअर व्हॉल्व बसविण्यात आले आहेत. एअर व्हॉल्व द्वारे जलवाहिनीतील हवा बाहेर काढली जाते, त्यामुळे जलवाहिनी फुटण्याची शक्यता कमी असते आणि गरजेनुसार हवा आत घेऊन जलवाहिनीत हवेची पोकळी निर्माण होऊ देत नाही.

श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे प्रवेशद्वार पासून शहरात सरळ मार्गावर जलवाहिन्या असल्याने ठराविक अंतरावर एअर व्हॉल्व टाकले गेलेत. उच्च दाबाची जलवाहिनी ज्या क्षेत्रात आहे त्या ठिकाणी एअर व्हॉल्व निकामी झाल्याचे दिसून येते. या व्हॉल्वमधुन सतत पाणी गळती होत असुन यामुळे पाणी वाया जाताना दिसते.श्रीवर्धन नगरपरिषदे कडून पाणी वाचवा पाण्याचा दुरूपयोग करू नका असे आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे. परंतु, नागरिक गळक्या एअर व्हॉल्व खाली बादल्या ठेवत पाणी वाचवत असल्याचे चित्र दिसत आहे.

# अलिबाग संगीत महोत्सवात विख्यात मृदुला दाढे यांचा कार्यक्रम

**| रायगड | प्रतिनिधी |**

मैफिल, अलिबाग या संस्थेतर्फे येथील आरसीएफ वसाहतीमध्ये १४-१५ फेब्रुवारी रोजी आयोजित दोन दिवसीय संगीत महोत्सवात विख्यात संगीत अभ्यासक आणि गायिका मृदुला दाढे यांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण होणार आहे.

याशिवाय या महोत्सवात युवा कलाकार अमन वरुडकर यांचे व्हायोलिन वादन तसेच ग्वाल्हेर घराण्याचे गायक पंडीत धनंजय हेगडे यांचे सुश्राव्य गायन अशी भरगच्च सांगीतिक मेजवानी आहे.

डॉ. मृदुला दाढे या हिंदी चित्रपट संगीतातील संशोधनासाठी प्रसिद्ध असलेल्या ख्यातनाम गायिका, संगीत अभ्यासक आणि लेखिका आहेत. चित्रपट संगीतावर पीएचडी पदवी मिळवणाऱ्या त्या भारतातील पहिल्या महिला आहेत.

# अचूक बिलिंग आणि वीजदरात सवलतीची सुवर्णसंधी

**| रायगड | प्रतिनिधी |**

तंत्रज्ञानाच्या युगात महावितरणने पाऊल टाकत राज्यातील ३ कोटी १६ लाख ग्राहकांसाठी स्मार्ट टीओडी मीटर लावण्यात येत असून, अचूक बिलिंग, पारदर्शकता आणि थेट वीजदरात सवलत देणारी ही योजना सध्या राज्यात गतिमानतेने राबविली जात आहे.

या तंत्रज्ञानामुळे ग्राहकांचा अनुभव पूर्णपणे बदलणार असून, स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेत ९ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर पंधरवडा सर्वत्र साजरा करण्यात येत आहे.

मानवी हस्तक्षेपाशिवाय मीटर रीडिंग थेट महावितरणच्या सर्व्हरवर पोहोचणार आहे. यामुळे चुकीचे रीडिंग, अंदाजे बिल किंवा घर बंद असल्याने बिल न मिळणे यांसारख्या तक्रारींना पूर्णविराम मिळेल. आयोगाच्या मान्यतेनुसार, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे सवलत मिळणार आहे. ही सवलत १ जुलै २०२५ पासून लागू झाली असून घरगुती ग्राहकांसाठी हे मोठे आर्थिक बचत करणारे पाऊल आहे. हे स्मार्ट मीटर बसवण्यासाठी महावितरणकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. ग्राहकांसाठी ही सेवा पूर्णपणे मोफत आहे.

स्मार्ट मीटरबाबत असलेला सर्वात मोठा गैरसमज म्हणजे ते प्रीपेड आहेत. मात्र, हे मीटर पोस्टपेडच असून सध्याप्रमाणेच वीज वापरल्यानंतर महिनाअखेरीस बिल भरावे लागणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत सौर पॅनेल बसवणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर उपयुक्त आहेत. सौर ऊर्जेची निर्मिती, वापर आणि ग्रीडला दिलेल्या विजेचा हिशेब स्मार्ट मीटरमुळे होणार आहे.

# माथेरानमध्ये विनापरवाना रस्त्यांच्या कामांची लगबग

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान नगरपालिका हद्दीतील बेबी डिसूजा मार्गावर काही बंगलेधारकांनी अनाधिकृतपणे रस्त्याचे काम सुरू केले असून त्याकडे पालिका प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष यामुळे या ठिकाणी मोठे अर्थकारण झाल्याचे नागरिकांचे म्हणणे असून पालिका प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधत येथे जोरदार बांधकाम सुरू आहे.

माथेरान हे इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये येत असल्याने येथे कोणतेही काम करावयाचे असल्यास सर्वोच्च न्यायालयाने गठीत केलेल्या सनियंत्रण समितीची परवानगी घ्यावी लागते व त्यानंतरच कोणतीही कामे केली जातात.माथेरानमध्ये अनेक ठिकाणी प्रेक्षणीय स्थळांवरील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे.येथील नागरिक अनेक वर्षांपासून हे रस्ते सुस्थितीत व्हावे याकरिता नगरपालिकेशी पत्र व्यवहार करीत आहेत परंतु परवानगीच्या नावाखाली ही कामे रेंगाळली आहेत.परंतु बेबी डिसूजा मार्गावरती खाजगी बंगलेधारकाने कायद्याची पायमल्ली करताना राजरोसपणे खोदकाम व रस्त्याचे काम सुरू केले आहे. विशेष म्हणजे वनविभागाकडूनही माती व दगड खोदकामास परवानगी नाही तरीही या ठिकाणी जोरदारपणे रस्ता बनविला जात आहे व भराव ही टाकला जात आहे.

या मार्गालगतच माथेरानचा मुख्य रस्ता असल्याने तेथून अधिकारी वर्गाची दररोजच ये-जा सुरू असते. तरीही या कामावरती कोणाचाही आक्षेप झाला नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. माथेरानच्या प्रवेशद्वारावर नगरपालिकेचा कर्मचारी तैनात असतो.

पालिकेने परवानगी दिलेल्या कामासाठीच बांधकामाचे साहित्य पाठविले जाते परंतु या ठिकाणी कोणत्याही परवानगीशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य आलेच कसे व कोणाच्या हुकुमाने येत आहे. माथेरानमधील प्रस्थापित ठेकेदारच ही कामे करीत असल्याची माहिती समोर येत आहे

# बेबीबाई ठाकूर यांचे वृद्धपकाळाने निधन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर मुळपाडा येथील बेबीबाई वसंत ठाकूर (८०) यांचे वृद्धपकाळाने सोमवारी (दि.९) निधन झाले.



सामाजिक कार्यकर्ते किरण ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत. तर प्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक संतोष ठाकूर, भगवान ठाकूर, ॲड. महेश ठाकूर यांच्या त्या काकी होत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चिरनेर पंचक्रोशीतील, नाट्यक्षेत्राबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून, त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात दोन पुत्र, एक कन्या, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.१८) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि.२०) चिरनेर मुळपाडा येथील राहत्या घरी होणार आहेत.

## नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन | दंड वसूल करण्याचा दिला इशारा

# बेकायदेशीर पाणी घेणाऱ्यांवर रोहा न.पा.कडून होणार कारवाई

**| रोहा | प्रतिनिधी |**

नगरपालिकेकडून पुरवठा करण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या नळाला थेट विजेचा पंप लावून बेकायदेशीररित्या पाणी घेण्याचे प्रकार सरार्सपणे घडत आहे. या नियमबाह्य आणि अनधिकृत पाणी चोरीमुळे रोहे अष्टमी शहरातील त्या-त्या भागातील पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम होत आहे. सदर नियमबाह्य विजेचा पंपाचा वापर करणे बंद न केल्यास त्या ग्राहकांवर नगर परिषद प्रशासनाकडून दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा पत्रकद्वारे तसेच दवंडीद्वारे नगर पालिका प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



रोहे अष्टमी भागात बेकायदेशीरपणे विजेचा पंपाचा वापर होत असल्याने संबधित भागात कमी दाबाने अथवा पाणी पुरवठा न होणे अशा तक्रारी नगर पालिकेकडे प्राप्त झाल्यानंतर नगर पालिकेने नियमबाह्य पद्धतीने पाणी घेणाऱ्या ग्राहकांविरोधात धडक मोहिम हाती घेतली आहे.बेकायदेशीर विजेचे पंप वापरून नियमबाह्य पाणी घेण्याचे प्रकार थांबविण्यासाठी नगर परिषद प्रशासनाकडून विशेष पथक तयार करण्यात आले आहेत.या विशेष पाथकांच्या माध्यमातून बेकायदेशीर विजेचे पंप बंद करण्याची व पंप जप्त करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. या कार्यवाही दरम्यान थेट नळ संयोजनाला वीज पंप जोडून पाणी घेत असल्याचे आढळून आल्यास संबधित वीज पंप तात्काळ जप्त करण्यात येणार आहे. नगर पालिके मार्फत पंप जप्त केल्यानंतरही पुन्हा विजेचा पंप जोडून पाणी घेत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर पंप जप्त करुन ५ हजार रु.दांडात्मक कारवाई व संबधित व्यक्ति विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी व ग्राहकांनी तात्काळ दक्षता घेऊन नियमबाह्य वीज पंप काढून नगर पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे, मुख्यधिकारी अजयकुमार एडके, उपाध्यक्ष अहमद दर्जी व पाणी पुरवठा सभापती महेंद्र दिवेकर यांनी केले आहे.

**शहरातील नागरिकांनी पाणी वाचवा, भविष्य वाचवा या संदेशाची जाणीव ठेवून दररोजच्या वापरात बचतीची सवय लावावी असे आवाहन करण्यात आले आहे. पाणी हा अमूल्य नैसर्गिक स्रोत असून त्याचे संवर्धन व योग्य व्यवस्थापन केल्यासच भविष्यातील पाणीटंचाई टाळता येईल असा विश्वास नगरपरिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे.**

**पहिल्यांदा नियमभंग केल्यास दंड आकारला जाईल तर वारंवार नियम मोडल्यास अधिक कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. पाण्याचा अपव्यय रोखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही नगरपरिषदेकडून नमूद करण्यात आले आहे.**

या बाबत नगर पालिकेकडून आज जाहीर आवाहन करणारे पत्रक सर्वत्र वाटप करण्यात आले आहे. तर प्रशासन व लोकप्रतिनिधी कडून देखील सोशल मीडियाद्वारे जनतेला आवाहन केले आहे.

रोहा-अष्टमी नगरपरिषद हद्दीत पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर वाढता ताण लक्षात घेता प्रशासनाने नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे.शहरात सध्या उपलब्ध पाणीपुरवठा मर्यादित असून अनावश्यक वापरामुळे भविष्यात पाण्याची टंचाईची निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन नगरपरिषदेमार्फत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पालिकेकडून पुरवठा होणाऱ्या पाण्यातून वाहन धुणे, अंगण धुणे, कपडे धुणे, बाथरूममध्ये अनावश्यक पाणी सोडणे तसेच नळ खुले ठेवणे यांसारख्या प्रकारांवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी नागरिकांनी नळाला फ्लोटिंग बॉल कॉक बसवणे,पाण्याच्या टाक्यांची वेळोवेळी तपासणी करणे, गळती त्वरित दुरुस्त करणे, तसेच घरगुती वापरात पाण्याचा गरजे पुरता वापर करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# भानगडीच भानगडी

नरेंद्र मोदी सरकारच्या भानगडी बाहेर येण्याचा मौसम पुन्हा एकदा सुरू झाला आहे. आधी सरसेनापती जनरल मनोज नरवणे यांच्या पुस्तकावरून वाद झाला. त्याच वेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी परस्पर तथाकथित व्यापार कराराची घोषणा करून टाकली. यामध्ये त्यांनी भारत यापुढे रशियाकडून तेल खरेदी करणार नाही, केले तर आम्ही पुन्हा त्याला शिक्षा करू असे स्पष्टपणे म्हटले. त्यातून स्वतःला विश्वगुरु समजणाऱ्यांचे कपडेच त्यांनी जणू उतरवले. त्यातच आता एपस्टीन फाईल्स आणि हा तथाकथित करार यांचा काही संबंध आहे का असा प्रश्न राहुल गांधी यांनी संसदेत उपस्थित केला आहे. किंबहुना, मोदींनी या कराराच्या निमित्ताने देशाला विकले आहे असा थेट आरोप केला आहे.सरकार राहुल यांच्या आरोपांचे थेट उत्तर न देता राहुल यांच्यावरच हक्कभंग आणू वगैरे बोलत आहे. एपस्टीन हा एक लिंगपिसाट माणूस होता. तो लहान मुलींना जाळ्यात अडकावून लैंगिक व्यापारात ओढत असे. जगातले मोठमोठे राजकारणी, उद्योगपती, राजदूत, बँकर्स इत्यादींशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी व त्यातून अब्जावधींची संपत्ती मिळवण्यासाठी त्याने या मुलींचा वापर केला. त्याबद्दल त्याला २००८ मध्ये शिक्षा झाली होती. पण तरीही त्याचे नेटवर्किंगचे उद्योग चालू राहिले. याच काळातल्या त्याच्या इमेल्स किंवा पत्रव्यवहाराच्या फाईल्स आता उघड करण्यात आल्या आहेत. अमेरिकेतील न्यायप्रिय लोकांनी यासाठी चिकाटीने लढा दिल्यामुळेच त्या उघड करणे ट्रम्पला भाग पडले. खुद्द ट्रम्प हाही एपस्टीनचा दोस्त होता व तोही या व्यवहारात अप्रत्यक्ष का होईना सामील होता असे दिसते. या पत्रव्यवहारात जगातील अनेकांची नावे आली. त्यातून इंग्लंड, फ्रान्स, नॉर्वे इत्यादी देशांमध्ये राजकीय भूकंप झाले व राजीनामे झाले. भारतात मात्र नरेंद्र मोदी, अनिल अंबानी, हरदीप पुरी इत्यादींचा यात उल्लेख असूनदेखील भाजपवाले त्यावर गप्प बसून पडदा टाकू पाहत आहेत.

## एपस्टीन नावाचा झोलर

एपस्टीन हा बड्या बड्या लोकांची कामे करणारा दलाल होता. अमेरिकेत एखादा माणूस, पक्ष, संघटना, देश किंवा कंपनी यांच्यासाठी सरकारदरबारी लॉबिंग करण्याला कायदेशीर मान्यता आहे. चांगल्या भाषेत याला वकिली म्हणत असले तरी प्रत्यक्षात ही झोलरगिरीच असते. आपल्याकडे मंत्रालयामध्ये मंत्र्याशी गाठ घालून देतो किंवा फाईल नक्की पुढे सरकवतो अशी कामे करणारे असंख्य झोलर असतात. एपस्टीन हा अमेरिकेतला सर्वात श्रीमंत (ज्याच्या मालकीचे स्वतःचे बेट व अनेक विमाने वगैरे होती) व पार पोचलेला झोलर किंवा दलाल होता. मोदी सरकार २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर बहुदा त्यांना वेगाने अमेरिकेच्या या उच्च सत्तावर्तुळात घुसायचे असावे. त्यासाठी त्यांनी एपस्टीन नावाच्या या दलालाचा हात पकडला असावा असा तर्क करायला जागा आहे. हरदीप पुरी हे पूर्वी राजदूत होते. नंतर त्यांनी राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला व मंत्री झाले. २०१४ व नंतर एपस्टीनशी त्यांनी संबंध जोडला. मोदी सरकार संगणकाची क्रांती करणार आहे असे ते एपस्टीनला पटवून देत होते. वास्तविक भारताने डिजिटल युगात केव्हाच झेप घेतलेली होती व ते अमेरिकेलाही ठाऊक होते. म्हणजेच हरदीप पुरी हे भारताची नव्हे तर मोदींची जाहिरात करीत होते. त्यांना वरच्या वर्तुळात घ्या असे सांगत होते. अनिल अंबानी हा तर एक नंबरचा बदनाम इसम आहे. भारतीय बँकांना बुडवल्याबद्दल त्याच्यावर खटले चालू आहेत. त्याचेही नाव या पत्रव्यवहारात आहे. हरदीप पुरी, भाजप, मोदी इत्यादींसाठी वकिली करण्याचे काम तो करीत होता की काय असा संशय आहे. याच अंबानीला राफेल करारात हजारो कोटींचे काम मिळणार होते. विमानाच्या दुरुस्तीचा कोणताही अनुभव नसताना त्याच्या कंपनीला राफेल लढाऊ विमान दुरुस्तीचे एक काम देण्यात येणार होते. नरेंद्र मोदींनी राफेलचा हा करार केला होता. पण पुढे वाद झाला तेव्हा अंबानीला हे काम देण्याशी आपला संबंध नाही असे म्हणून त्यांनी हात झटकले होते. याच अंबानीचे एपस्टीनशी संभाषणाचे बरेच कागद आहेत. या संदर्भात अनिल अंबानी हा अजून तुरुंगात का नाही असा रास्त सवाल काल राहुल यांनी लोकसभेत केला.

## मोदी उत्तर देतील?

एपस्टीनच्या लैंगिक गुन्ह्यांशी हरदीप, अंबानी किंवा मोदींचा संबंध नसेलही. पण हा एक खतरनाक गुन्हेगारी प्रकारचा इसम आहे हे सर्वांना ठाऊक होते. तरीही ही मंडळी त्याच्याशी संबंध जोडायला धडपडत होती. कायम निव्वळ धंद्याचा विचार करणारी मानसिकता बाळगणारी उलट्या काळजाची एक जमात असते. हरदीप किंवा अंबानी हे त्यापैकीच होते असे या कागदांवरून दिसते. आणि असल्या लोकांचा वापर करून आपला उद्देश साध्य करायला मोदींनाही काही वाटत नसावे असा निष्कर्ष निघतो. हे अत्यंत गंभीर आहे. कल्पना करा, या कागदपत्रांमध्ये राहुल, सोनिया किंवा काँग्रेसच्या कोणाही नेत्याचा दुरान्वयाने जरी उल्लेख असता तर आज देशात भाजपने काय केले असते. पण दुसऱ्याचे सतत नैतिक निवाडे करणारे, देशद्रोही ठरवणारे हे नालायक लोक आज गप्प आहेत. उलट, कहर म्हणजे हरदीप पुरी यांनी काल मिडियासमोर येऊन एपस्टीनसोबतच्या संबंधांचे समर्थन केले. आपण देशहितासाठीच एपस्टीनच्या संपर्कात होतो असे भासवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. म्हणजे खुद्द अमेरिकेसकट सगळे जग ज्याच्याशी लांबून जरी संबंध आला तरी मान खाली घालते आहे तिथे भारताचा एक माजी राजदूत आणि मोदी सरकारचा मंत्री ही गोष्ट अभिमानाने सांगतो आहे. सतत संस्कार, संस्कृती वगैरेंच्या गप्पा मारणाऱ्या मोहन भागवत यांचे यावर काय म्हणणे आहे हे ते पुढच्या आपल्या कीर्तनात सांगतील अशी अपेक्षा आहे. राहुल यांचे म्हणणे असे आहे की, मोदी यांच्याबाबतचे हे उल्लेख व इतर अनेक प्रकारची माहिती ट्रम्प यांच्याकडे आहे. त्याचाच वापर करून ते भारताला आपल्याशी करार करायला भाग पाडत आहेत व भारताला गपगुपान त्यांचे ऐकावे लागत आहे. हे अगदी असेच्या असे खरे नसले तरी मोदींनी ट्रम्प यांच्यापुढे गेल्या वर्षभरापासून जी शरणागती पत्करली आहे ती सर्व जगासमोर आहे. भारत व पाकिस्तान यांच्यातले युध्द आपणच थांबवले असे ट्रम्प वारंवार सांगत आहेत. आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असे भारताने कबूल केले आहे असे ते म्हणत आहेत. दोनच महिन्यांपूर्वी रशियाचे पुतीन भारतात आले होते. त्यावेळी त्यांच्याशी किती मैत्री आहे याचे प्रदर्शन मोदींनी केले होते. रशियाकडून तेल घेतल्याने आपल्याला दीड लाख कोटी रुपयांची बचत झाली आहे. आता अमेरिकेच्या दबावामुळे महागडे तेल तेही ट्रम्प सांगतील त्यांच्याकडून घ्यावे लागणार आहे. नरवणे प्रकरणात मोदींनी लोकसभेत उत्तर देण्याचे टाळले. आता एपस्टीन प्रकरण व रशियन तेलासंदर्भात तरी ते समोर येऊन खुलासा करण्याची हिंमत दाखवतात का हे पाहावे लागेल.

विचार

# वातावरण अस्थिर, वाढणार एफडीआय

***अर्थसंकल्पामुळे चर्चेत राहिलेल्या आठवड्यामध्ये काही आर्थिक बातम्या दखलपात्र ठरल्या. या संदर्भातील पहिली बातमी म्हणजे सोन्या-चांदीचे भाव येत्या काळात अस्थिर राहण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे बँकांमधील 'एफडीआय' वाढवण्याचा सरकारचा विचार समोर आला. तिसरी महत्वाची बातमी म्हणजे सरकार पानमसाल्याच्या उपकरातून तिजोरी भरण्याची तयारी करत आहे.***



**महेश देशपांडे**

अर्थसंकल्पामुळे चर्चेत राहिलेल्या आठवड्यामध्ये इतर अर्थवृत्तांकडे लक्ष जाणे तसे अवघडच. मात्र तरीही काही आर्थिक बातम्या दखलपात्र ठरल्या. या संदर्भातील पहिली बातमी म्हणजे सोन्या-चांदीचे भाव येत्या काळात अस्थिर राहण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे बँकांमधील 'एफडीआय' वाढवण्याचा सरकारचा विचार समोर आला आहे. तिसरी महत्वाची बातमी म्हणजे सरकार पानमसाल्याच्या उपकरातून तिजोरी भरण्याची तयारी करत आहे.

जागतिक अस्थिरतेमुळे गेल्या वर्षभरात सोने आणि चांदीच्या किमती विक्रमी उच्चांकावर पोहोचल्या असूनही, अलिकडच्या काळामध्ये भारतात सोने आणि चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. परिणामी, या घसरणीदरम्यान सोने आणि चांदी खरेदी करणे शहाणपणाचे आहे, की किमती आणखी घसरण्याची वाट पाहणे चांगले आहे, याचा विचार गुंतवणूकदार करत आहेत. या आठवड्यात विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर बुलियन मार्केटमध्ये झालेली लक्षणीय घसरण प्रामुख्याने अमेरिकन डॉलरची मजबूती आणि अमेरिकन चलनविषयक धोरणाबाबत वाढत्या अपेक्षांमुळे आहे. सोने आणि चांदीच्या किमती घसरण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे ट्रम्प प्रशासन केविन वॉर्श यांना 'यूएस फेडरल रिझर्व्ह'चे प्रमुख म्हणून नियुक्त करणार असल्याची वाढती अटकळ. यामुळे व्याजदर कपातीची अपेक्षा वाढली आहे. त्याचा थेट परिणाम डॉलर आणि मौल्यवान धातूंवर झाला. शिवाय, भू-राजकीय अनिश्चितता आणि दीर्घकालीन धोरण संकेतांचाही बाजारावर परिणाम झाला आहे. देशांतर्गत, २०२६ च्या अर्थसंकल्पात सोने आणि चांदीबाबत कोणत्याही मोठ्या घोषणा करण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे या धातूंना कोणताही मोठा आधार मिळाला नाही. यूएस रोजगार डेटा आणि पीएमआय यासंदर्भातील घडामोडींवर लक्ष केंद्रित करत आहेत. ते किंमती स्थिर होतील की आणखी चढउतार होतील हे ठरवतील.

तज्ज्ञांचा विश्वास आहे, की सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये अनिश्चितता सध्या तरी कायम राहील. 'मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस'चे वरिष्ठ विश्लेषक मानव मोदी यांच्या मते येत्या काही दिवसांत या धातूंच्या किमती चढ-उतार होत राहू शकतात, म्हणून गुंतवणूकदारांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. फ्युचर्स ट्रेडिंगमध्ये चांदीचे दर नऊ टक्क्यांनी घसरून २.६५ लाख रुपये प्रति किलो झाले, तर सोने तीन टक्क्यांनी घसरून १.४७ लाख रुपये प्रति तोळा झाले. मल्टीकमॉडिटी एक्सचेंज (एमसीएक्स) वर मार्च डिलिव्हरीसाठी चांदी कमी सर्किटवर बंद झाली. 'जेएम फायनान्शियल सर्व्हिसेस'च्या ईबीजी-कमोडिटी अँड करन्सी रिसर्चचे उपाध्यक्ष प्रणव मीर यांच्या मते, सोन्याचा भाव देशांतर्गत बाजारपेठेतील त्याच्या सर्वकालीन उच्चांकावरून सुमारे २० टक्क्यांनी घसरला आहे, तर चांदीचा भाव सुमारे ३७ टक्क्यांनी घसरला आहे. तो अलिकडच्या नफावसुली आणि किमतींमध्ये तीव्र वाढ झाल्यानंतर नैसर्गिक घसरण दर्शवतो.

दरम्यान, भारत सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) मर्यादा सध्याच्या वीस टक्क्यांवरून ४९ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी आंतर-मंत्रालयीन पातळीवर सक्रियपणे विचारविनिमय करत आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार अर्थ मंत्रालय गेल्या काही महिन्यांपासून देशाच्या बँकिंग नियामक, रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करत आहे, मात्र अद्याप प्रस्ताव अंतिम झालेला नाही. दुबईस्थित एमिरेट्स 'एनबीडी'ने खासगी कर्ज देणाऱ्या 'आरबीएल' बँकेतील ६० टक्के हिस्सा तीन अब्ज डॉलर्सच्या अधिग्रहणातून दिसून येतो. भारत सध्या खासगी बँकांमध्ये ७४ टक्क्यापर्यंत परकीय गुंतवणुकीला परवानगी देतो. रिझर्व्ह बँकेने विशेष सूट दिली नाही, तर कोणत्याही एका परदेशी संस्थेचे शेअरहोल्डिंग १५ टक्क्यांपर्यंत मर्यादित आहे. सार्वजनिक बँकिंग क्षेत्र सरकार आता सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी परदेशी गुंतवणूक नियमांमध्ये लक्षणीय उदारीकरण करण्याचा विचार करत आहे. देश सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये थेट परदेशी गुंतवणुकीची सध्याची मर्यादा दुप्पट करण्याची योजना आखत आहे.

परदेशी मालकीची मर्यादा वाढवल्याने येत्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अतिरिक्त भांडवल आकर्षित करण्यास मदत होईल. मार्च २०२५ पर्यंत भारतात १२ सार्वजनिक क्षेत्रातील बँका असतील, ज्यांची एकूण मालमत्ता १.७१ लाख कोटी (१.९५ ट्रिलियन डॉलर)रुपये असेल, जी बँकिंग क्षेत्राच्या ५५ टक्के आहे. सरकार या बँकांमध्ये किमान ५१ टक्के हिस्सा राखण्याची योजना आखत आहे. उच्चस्तरीय समितीची स्थापना प्रस्तावित थेट परकीय गुंतवणुकीच्या (एफडीआय) प्रोत्साहनांसह अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी भारताच्या बँकिंग क्षेत्राचा व्यापक आढावा घेण्यासाठी आणि सुधारणा-नेतृत्वाखालील वाढीच्या पुढील टप्प्याचा आराखडा तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याची घोषणा केली. बँकिंग प्रणाली आता भविष्याभिमुख सुधारणांसाठी चांगल्या स्थितीत आहे. सीतारमण म्हणाल्या, की वित्तीय क्षेत्रात, आज भारतीय बँकिंग क्षेत्र मजबूत ताळेबंद, ऐतिहासिकदृष्ट्या उच्च नफा, सुधारित मालमत्तेची गुणवत्ता आणि ९८ टक्क्यांपेक्षा जास्त व्याप्तीने वैशिष्ट्यीकृत आहे. या क्षेत्राला सुधारणाप्रेरीत विकासमार्गावर नेण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचे भविष्यकालीन मूल्यांकन करण्यासाठी आम्ही चांगल्या स्थितीत आहोत. समितीच्या शिफारशींच्या आधारे आम्ही त्यानुसार पुढे जाऊ. २०४७ चा रोडमॅप तयार करण्यात वित्तीय सेवा विभागदेखील महत्त्वाची भूमिका बजावेल.

सीतारमण यांनी विकसित भारताच्या सरकारच्या दृष्टिकोनातून बिगर-बँकिंग वित्त कंपन्यांसाठी, विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांसाठी एक स्पष्ट योजना सादर केली. त्यांनी काही 'एनबीएफसीं'ची पुनर्रचना करण्याचा आणि त्यांचे स्केल, कार्यक्षमता आणि वाढीव निधी सुधारण्यासाठी 'पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन' आणि ग्रामीण विद्युतीकरण महामंडळात विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला. शिवाय, परकीय चलन व्यवस्थापन (कर्ज नसलेली साधने) नियमांचे आधुनिकीकरण करण्याच्या आणि त्यांना गुंतवणूकदार-अनुकूल बनवण्याच्या उद्देशाने भारताच्या परदेशी गुंतवणूक नियमांचा व्यापक आढावा घेण्याचा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी मांडला. देशांतर्गत भांडवली बाजार मजबूत करण्यासाठी, सीतारमण यांनी कॉर्पोरेट बाँड बाजाराला चालना देण्यासाठी अनेक उपाययोजना जाहीर केल्या. त्यात बाजारनिर्मिती फ्रेमवर्क, कॉर्पोरेट बाँड निर्देशांकांवर आधारित डेरिव्हेटिव्ह्ज आणि एकूण परतावा स्वॅप यांचा समावेश आहे. हे तरलता, जोखीम व्यवस्थापन आणि गुंतवणूकदारांचा सहभाग सुधारण्यासाठी केले जात आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये पान मसाला उत्पादनावर आकारण्यात आलेल्या आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकरातून सरकारला १४ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. पान मसाल्यावर एक फेब्रुवारीपासून आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर लागू करण्यात आला आहे. तो ४० टक्के जीएसटीव्यतिरिक्त आहे. पान मसाला उत्पादन युनिटच्या उत्पादन क्षमतेच्या आधारे या उपकराची गणना केली जाईल. ४० टक्के जीएसटी लावल्यानंतर पान मसाल्यावरील एकूण कराचा बोजा ८८ टक्के राहील. अर्थसंकल्पाच्या कागदपत्रांनुसार सरकारला चालू आर्थिक वर्षाच्या उर्वरित दोन महिन्यांमध्ये (फेब्रुवारी आणि मार्च) आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकरातून २,३३० कोटी रुपये आणि २०२६-२७ मध्ये १४ हजार कोटी रुपये उभारण्याची अपेक्षा आहे. सरकारने तंबाखूजन्य उत्पादनांवरील उत्पादन शुल्क आणि कररचनेत वाढ केल्यामुळे या उत्पादनांचा वापर कमी होईल आणि यामुळे या उत्पादनांचा वापर करणाऱ्यांची संख्याही कमी होईल. देशभरात सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या आजारांमुळे १४ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. 'ग्लोबल अॅडल्ट टोबॅको सर्व्हे'नुसार, देशातील १३.५ लाख लोक आणि जगभरात ८० लाख लोकांचा मृत्यू होतो. देशभरातील ५५०० मुले दररोज तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यास सुरवात करतात.

# परीक्षा हे जीवनाचे अंतिम ध्येय नाही

विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी आणि शिकण्याची प्रक्रिया आनंददायी करण्यासाठी भारतात सुरू झालेला 'परीक्षा पे चर्चा' हा उपक्रम आज एक प्रमुख लोकसहभागाचा उपक्रम बनला आहे. २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विद्यार्थी यांच्यातील संभाषणातून सुरू झालेला हा उपक्रम आता करोडो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी मार्ग मोकळा करत आहे. या कार्यक्रमाने २०२५ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड तयार केला जेव्हा एकाच महिन्यात ३.५३ कोटींहून अधिक लोकांनी यात सहभागी होण्यासाठी नोंदणी केली. त्याची एकूण पोहोच २१ कोटींहून अधिक दर्शकांची होती, ज्यामध्ये परदेशातील भारतीय शाळांचाही समावेश होता. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना संदेश देतो की परीक्षा हे जीवनाचे अंतिम ध्येय नसून शिकण्याच्या प्रवासातील एक प्रमुख टप्पा आहे.



पंतप्रधान वारंवार यावर भर देतात की परीक्षा केवळ एका विशिष्ट क्षणी तुमची तयारी मोजतात, तर शिकणे सतत आणि आनंददायक असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये 'आजीवन शिक्षण' या संकल्पनेवर सखोल भर देण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा एक प्रमुख उद्देश असा आहे की गुणांची टक्केवारी मुलाच्या एकूण व्यक्तिमत्त्वाची व्याख्या करू शकत नाही. मुलांना विविध कौशल्ये शिकण्यासाठी पाठ्यपुस्तकांच्या पलिकडे जाण्यासाठी, नवीन क्रियाकलाप करून पाहण्यासाठी आणि आव्हानांना भीती न पाहता संधी म्हणून पाहण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. या उपक्रमात मानसिक आरोग्याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ५-४-३-२-१ ग्राउंडिंग तंत्र, पुरेशी झोप, पाणी, व्यायाम आणि ध्यान यांसारख्या निरोगी दिनचर्यासह, तणाव कमी करण्यासाठी तज्ञ विद्यार्थ्यांना सोप्या मार्गांची ओळख करून देत आहेत. ५-४-३-२-१ ही एक इंद्रिय-आधारित ध्यान सराव आहे ज्याची रचना सर्व पाच इंद्रियांचा उपयोग रेसिंग विचारांना शांत करण्यासाठी आणि शेवटी एका इंद्रियेपर्यंत कमी करण्यासाठी केली गेली आहे. असे केल्याने, तुमचे लक्ष चिंता निर्माण करणाऱ्या विचारांपासून वर्तमान क्षणाकडे वळते. हे तंत्र १८ व्या शतकात बेट्टी ॲलिस एरिक्सन यांनी विकसित केले होते. अनेक क्रीडा व्यक्तिमत्त्वांनी त्यांचे अनुभव शेअर करताना सांगितले होते की खेळामुळे अभ्यासात अडथळा येत नाही परंतु तणाव कमी करण्यात आणि लक्ष केंद्रित करण्यात मदत होते.

डिजिटल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे संज्ञानात्मक घट होत असून मानसिक आरोग्यावर

**सुयोग आंग्रे**

विपरीत परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. जगात ५.६६ अब्ज डिजिटल मीडिया प्रोफाइल आहेत. लोक डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्मवर सामग्री पाहण्यासाठी दररोज १५ अब्ज तास घालवतात, जे मानवी आयुष्याच्या १.७ दशलक्ष वर्षांपेक्षा जास्त समतुल्य आहे. अतिवापरामुळे 'डिजिटल डिमेंशिया' वाढतो, ज्यामुळे मेंदूच्या त्या भागांमध्ये ग्रे मॅटर नष्ट होते जे भावनिक नियमन आणि आवेग नियंत्रणासाठी जबाबदार असतात. आम्ही डिजिटल मीडिया नाकारण्याच्या स्थितीत नाही, म्हणून आम्ही त्याच्या वापरासाठी निरोगी मर्यादा निश्चित केल्या पाहिजेत.

तांत्रिक तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मोबाइल आणि डिजिटल टूल्स नियंत्रित पद्धतीने वापरण्याचा सल्ला दिला आहे, जेणेकरून तंत्रज्ञान उपयोगी होईल आणि ओझे नाही. परीक्षा पे चर्चा हा कार्यक्रम पालकांना एक महत्त्वाचा संदेश देतो की त्यांनी आपल्या मुलांचे लक्ष केवळ गुणांवर न ठेवता शिकण्याच्या प्रक्रियेवर केंद्रित केले पाहिजे. मुलांची इतरांशी तुलना करू नका आणि तुमच्या घरात असे वातावरण तयार करा जिथे मुले त्यांची भीती, आव्हाने आणि आशा मोकळेपणाने शेअर करू शकतील. पालकांचे सहकारी वर्तन मुलांना परीक्षेच्या तयारीत सर्वात जास्त मदत करते.

भारतीय शैक्षणिक तत्त्वज्ञानात, ज्ञानाची प्राप्ती ही एकल प्रक्रिया नसून सामायिक मार्ग मानली जाते. परिक्षा पे चर्चा कार्यक्रम शिक्षकांना रॉट लर्निंग कल्चरच्या पलीकडे जाण्याचे आणि टीकात्मक विचार आणि सर्जनशीलता वाढवण्याचे आवाहन करतो. हा कार्यक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असून, विद्यार्थी-केंद्रित, तणावमुक्त आणि अनुभवात्मक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. मूल्यांकन पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे जेणेकरुन परीक्षा केवळ स्मृतीच नव्हे तर आकलन, अनुप्रयोग आणि विकास मोजतात. शिक्षण अधिक सुलभ करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापरही महत्त्वाचा मानला गेला आहे.

या उपक्रमाची तत्त्वे प्रत्यक्षात उतरविण्याची जबाबदारीही शालेय व जिल्हास्तरीय शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. यासाठी शाळांमध्ये वेलनेस समित्या तयार करणे, तणाव व्यवस्थापन आणि अभ्यास कौशल्यांवर कार्यशाळा आयोजित करणे, पालक-शिक्षक संवाद वाढवणे आणि केवळ गुणांऐवजी विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांचे यश ओळखणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. हे सुनिश्चित करण्यासाठी, पंतप्रधानांनी लिहिलेल्या परीक्षा व वॉरियर्स सारखी संसाधने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी उपलब्ध करून देणे देखील महत्त्वाचे आहे. शेवटी, परीक्षा पे चर्चा हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर भारतीय शिक्षण व्यवस्थेतील सकारात्मक बदलाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्याचा संदेश स्पष्ट आहे - परीक्षा हे ओझे नसून स्वतःला शिकण्याची, वाढवण्याची आणि समजून घेण्याची संधी आहे.

लोकसंसद

## जागतिक रेडिओ दिन

नमस्कार श्रोते हो आपण ऐकत आहात आकाशवाणी. बहुजन हिताय बहुजन सुखाय आकाशवाणी. असे शब्द कानी पडल्यावर किंवा आज वाचताना समोर आल्यावर पहिल्यांदा आठवतो तो म्हणजे रेडिओ. दरवर्षी १३ फेब्रुवारी म्हणून जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जातो. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले होते. पहिला जागतिक रेडिओ दिन २०१३ पासून सुरू करण्यात आला होता. रेडिओचा शोध इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी लावला होता. भारतात २३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कोलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाने दोन केंद्रे सुरू झाली होती. २००१ मध्ये भारतात खाजगी रेडिओ स्टेशनची सुरुवात झाली होती. यावर्षीच्या म्हणजे २०२६ च्या रेडिओ दिनाची थीम आहे रेडिओ व कृत्रिम बुद्धिमत्ता. रेडिओचा वापर आजच्या मोबाईलच्या युगात जरी कमी झाला असला तरी प्रत्येकाच्या रेडिओच्या आठवणी निरनिराळ्या आहेत. रेडिओवरील विश्वसनीय बातम्या आजही ऐकल्या जातात, विविध भारतीचे गीत संगीत आजही ऐकले जाते, रेडिओचे आधुनिक रुप एफ एम वहिनी आजही सर्वत्र ऐकले जाते. रेडिओवरील संवादक, निवेदक कार्यक्रमाचा अभ्यास पूर्ण दर्जा, रेडिओवरील कॉमेंट्री ज्ञानविज्ञानाची माहिती असं सर्व देणारा रेडिओ. सरकारच्या सर्व योजनांची माहिती देणारा व दूरदूर पर्यंत अगदी देशाच्या सीमेपर्यंत, आपल्या सैनिक बांधवांपर्यंत पोहोचणारा असा हा रेडिओ मनोरंजन करणारा, ज्ञानवर्धन करणारा असा हा रेडिओ. माननीय पंतप्रधानांची मन की बात सर्वांपर्यंत पोहोचवणारा असा हा रेडिओ. रेडिओ ऐकणारा श्रोता त्याला सन्मानाने पाहतो. एक विश्वासू प्रसारमाध्यम म्हणून पाहतो. एक अभ्यास मंडळ म्हणून पाहतो.अशा या सर्व दृष्टीने आदर्श असणाऱ्या रेडिओचे महत्व आजही आहे व पुढेही असणार. **– नरेंद्र सोनार, अलिबाग**

दिनविशेष

# जागतिक रेडिओ दिन

आज माणसं जिथं जातात तिथं मोबाइल नेतात, तसा एकेकाळी शहरापासून अगदी खेडेगावापर्यंतच्या माणसांच्या हाती रेडिओ दिसायचा. रेडिओवरील भूपाळी अन् सकाळच्या बातम्यांनी घरा-घरात सूर्य उजाडायचा. अनेक घरात तर रेडिओवरच्या बातम्या सुरु होण्याआधी उठण्याचा दंडक असायचा. 'आप की पसंत' कार्यक्रमात आपल्या माणसासाठी गाणं ऐकवण्यासाठी हजारो पत्र यायची. लोकप्रिय दहा गाणी ओळखण्यासाठी पैजा लावल्या जायच्या. आज टीव्ही, मोबाइलवर हवं ते ज्ञान मिळवता येतं, हवं ते गाणं कधीही ऐकता येतं. मात्र विश्वसनीयतेसाठी आजही ओळखली जाते ती रेडिओ म्हणजेच आकाशवाणी. याच आकाशवाणीचा अर्थात रेडिओचा आज जागतिक स्तरावरील हक्काचा दिवस. १३ फेब्रुवारी जागतिक रेडिओ दिन. जगातला पहिला रोडिओ बनवला मार्कोनी या इटलीच्या शास्त्रज्ञानं. १८९५ मध्ये त्यानं रेडिओचा शोध लावला आणि त्याचं पेटंटही मिळवलं. मार्कोनीला 'फादर ऑफ रेडिओ' असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेलं. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्यानं कम्युनिकेशनसाठी वापरलं जात होतं. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारततही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. २३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाने दोन केंद्र सुरु झाली. त्यानंतर १९३२ मध्ये भारत सरकारनं भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरु केला. १९३६ मध्ये त्याचं नाव ऑल इंडिया रेडिओ असं ठेवण्यात आला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात रेडिओने महत्त्वाची भूमिका बजावली. १९४२ मध्ये जेव्हा राष्ट्रीय काँग्रेस रेडिओचे प्रसारण सुरु झाले, तेव्हा महात्मा गांधींनी या रेडिओ स्टेशनवरूनच ब्रिटिशांना भारत छोडो. अशी घोषणा दिली. एवढेच नाही तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीही 'तुम मुझे खून दों, मै तुम्हे आझादी दुंगा' ही घोषणाही जर्मनीतील रेडिओद्वारेच दिली होती. इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याची इच्छा प्रत्येक भारतीयाच्या मनात जागृत करण्यासाठी स्वातंत्र्य योद्ध्यांनी रेडिओवरूनच घोषणा दिल्या. स्वातंत्र्यानंतर १९५७ साली ऑल इंडिया रेडिओचे नाव बदलून आकाशवाणी असे ठेवण्यात आले. हळू हळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडिया रेडिओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवांपैकी एक बनली आहे. २००१ मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलाही सुरुवात झाली. एक काळ असा होता जेव्हा टीव्ही आणि स्मार्टफोनसारखी उपकरणे अस्तित्वात नव्हती. त्यावेळी रेडिओ हेच मनोरंजनाचे आणि माहिती देण्याचे सर्वांत प्रभावी माध्यम होते. आज डिजिटल युगात असूनही रेडिओची जादू कायम आहे. रेडिओचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो अगदी दुर्गम भागातही पोहोचतो, जिथे इंटरनेट किंवा टेलिव्हिजन पोहोचणे कठीण असते. भारतासारख्या विस्तीर्ण आणि बहुभाषिक देशात रेडिओ संवादाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. हिमालयातील बर्फाच्छादित प्रदेश असो वा वर्दळीची महानगरे, रेडिओचा आवाज सगळीकडे ऐकू येतो. रेडिओच्या माध्यमातून केवळ मनोरंजनच नाही तर शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, सरकारी उपक्रम आणि सामाजिक संदेशही लोकांपर्यंत पोहोचवले जातात. विविध एफएम चॅनेल्स आणि डिजिटल रेडिओ सेवांमुळे ते आजच्या काळातही प्रचंड लोकप्रिय आहे. रेडिओ हा केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नाही तर त्यात नाव, प्रसिद्धी आणि पैसाही आहे. तुम्ही जर उत्तम संभाषणकलेचे धनी असाल, तुमचा आवाज प्रभावी असेल आणि लोकांशी संवाद साधण्याची तुमची कला असेल, तर रेडिओ जॉकी म्हणून करिअर घडवता येते.

# भात खरेदी केंद्रांना अद्याप टाळे

## ●आदिवासी विकास महामंडळाचा भोंगळ कारभार ● कवडीमोल दरात भाताची विक्री



**। ठाणे । प्रतिनिधी ।**

व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबावी, यासाठी राज्य शासन दरवर्षी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून योग्य हमीभाव देऊन भात खरेदी करते. याचा शेतकऱ्यांना फायदा होतो. मात्र यावर्षी सरकारने बळीराजाला फसवले असून फेब्रुवारी अर्धा संपला तरी अद्याप आधारभूत भात खरेदी केंद्रांना लावलेले टाळे उघडलेले नाही. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाच्या भोंगळ कारभारामुळे बळीराजाला कवडीमोल दरात व्यापाऱ्यांना भात विकावा लागत आहे.

भातपिकावर प्रापंचिक गरजा भागविण्याऱ्या शेतकऱ्यांची कोंडी सरकारने केली आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या भोंगळ कारभाराचा फटका येथील शेतकरीवर्गाला चांगलाच बसला आहे. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबावी, यासाठी राज्य शासन दरवर्षी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून २३५९रुपये क्विंटल हमीभाव देऊन भात खरेदी करते. याचा शेतकऱ्यांना फायदा होतो. मात्र, यावर्षी फेब्रुवारी महिना उजाडला तरी सरकारच्या भात खरेदी केंद्रांचे टाळे उघडले नाही. शेतकऱ्यांची आर्थिक लूट थांबवण्यासाठी महामंडळाने ऑनलाइन नोंदणीची मुदत वाढवून भट खरेदी केंद्रे लवकर सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

मुरबाड तालुक्यातील माळ, धसई, न्याहाडी आणि पाटगाव येथील भात खरेदी केंद्रे अद्यापही सुरू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना नाइलाजाने बी-बियाणे, खतांसाठी केलेली उसनवारी फेडण्यासाठी कवडीमोल भावात व्यापाऱ्यांना धान्य विकावे लागत आहे.

### कर्ज फेडायचे कसे?

सरकारने अतिवृष्टी नुकसानभरपाईमधून ठाणे जिल्हा वगळला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीपिकाचे झालेले नुकसान शासनाकडून मिळणार नाही. शेतकऱ्यांनी बँक व सोसायटीकडून घेतलेले पीक कर्ज कसे फेडायचे हा मोठा प्रश्न असतानाच बँकेने कर्ज वसुलीची प्रक्रिया चालू केलेली आहे. त्यातच फेब्रुवारी महिना उजाडला तरी भात खरेदीचे काटे न लागल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. चंद्राबाई चाहू वाघपंजे, स्मरणार्थ, वाघोली, अलिबाग**

## अवैध गावठी दारूवर छापा

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

पळूण तालुक्यातील रामपूर येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई केली आहे. गणेश विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या पायवाटेवर ही कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी घटनास्थळावरून गावठी हातभट्टीची दारू जप्त केली आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास चिपळूण पोलिसांना रामपूर, रोहिदासवाडी परिसरात अवैध दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी रोहिदासवाडी येथील गणेश विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या पायवाटेच्या बाजूला छापा टाकला. यावेळी भागुराम सावर्डेकर (५३) हा विनापरवाना आणि बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीची दारू विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगून असताना दिसून आला. चिपळूण पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल किरण सुभाष केदार यांनी ही कारवाई केली असून या कारवाईत आरोपीकडून ४ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली आहे.

## पिकअपची चोरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बहिणीच्या लग्नासाठी पैशाची गरज असल्याने मालकाचा पिकअप चोरी करणाऱ्याला आरे पोलिसांनी अटक केली. ब्रजेशकुमार रामगोपाल असे त्याचे नाव आहे. तक्रारदार हे व्यावसायिक असून त्यांचा डेकोरेशनचा धंदा आहे. गेल्या वर्षी त्यांच्या भावाने व्यवसायासाठी एक पिकअप खरेदी केला होता. १७ जानेवारीला त्यांनी आरे कॉलनी येथे पिकअप पार्क केला. दुसऱ्या दिवशी त्यांना पिकअप दिसला नाही. याप्रकरणी त्यांनी आरे पोलीस ठाण्यात तक्रार केली असता पोलिसांनी ब्रजेशकुमारला ताब्यात घेतले.

## पोलिसांचे आरोग्य धोक्यात

### मानपाडा पोलीस ठाण्याच्या दारात सांडपाणी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

चितळसर मानपाडा पोलीस ठाण्याच्या दारातच सांडपाणी तुंबले आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांसह सर्वसामान्यांना अक्षरशः नाक मुठीत घेऊन येथून ये-जा करावी लागते. दररोज सकाळी पालिकेचे कर्मचारी कचरा उचलतात. मात्र इमारतीतील नागरिक पुन्हा पोलीस ठाण्याच्या आवारात कचरा टाकत असल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. घाण आणि दुर्गंधीमुळे पोलिसांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

चितळसर मानपाडा येथे पोलीस ठाणे असून या ठिकाणी ८० कर्मचारी काम करतात. सुमारे पाच लाख नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेणाऱ्या पोलिसांचेच आरोग्य धोक्यात आले आहे. पोलीस ठाण्याच्या दारातच गटारगंगा वाहत आहे.

पुनर्वसन झालेले नागरिक प्लास्टिकच्या पिशव्या, बॉटल, कागदाच्या प्लेट पोलीस ठाण्याच्या आवारात टाकत असल्यामुळे जागोजागी कचऱ्याचे ढीग पसरले आहे. पालिकेचे कर्मचारी दररोज कचरा उचलत असले तरी रहिवासी पुन्हा कचरा टाकत असल्याने परिस्थिती जैसे थे आहे.

पालिकेकडे तक्रारी करूनही कारवाई होत नसल्यामुळे संताप व्यक्त होत आहे. हे पोलीस ठाणे आहे की कचराकुंडी, असा प्रश्न तक्रारी देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना पडतो आहे.

गटार तुंबल्याची माहिती मिळताच पालिकेचे कर्मचारी घटनास्थळी येऊन गटार दुरुस्तीचे काम करतात. मात्र दुरुस्ती केल्यानंतर अवघ्या तीन-चार दिवसांत गटाराचे सांडपाणी पुन्हा रस्त्यावर येते. त्यामुळे दुरुस्तीच्या नावाखाली थुकपट्टी लावली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## चंद्राबाई गोंधळी यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील रहिवासी चंद्राबाई मारुती गोंधळी यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. निधनासमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुलगे,तीन मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिवारावर शोककळा पसरली आहे.

## औषधांअभावी रूग्णांची गैरसोय




**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

सरकारी दवाखाना हा गरिबांसाठी आधार ठरणारा असतो. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयातील आयुष विभागातील युनानी औषधांचा साठा पूर्णपणे संपला आहे. त्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. एकीकडे सरकार पर्यायी औषधोपचार पद्धतीला प्रोत्साहन देण्याच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे प्रत्यक्षात मात्र औषधाअभावी रूग्णांची मोठी ससेहोलपट होत आहे. जिल्हा रूग्णालयातील या विभागात दररोज सरासरी १० ते १५ रूग्ण मोठ्या आशेने उपचारासाठी येतात. युनानी तज्ञ डॉक्टरदेखील दररोज बाह्य रूग्ण विभागात (ओपीडी) वेळेवर उपस्थित राहतात. मात्र केवळ औषधे उपलब्ध नसल्याने डॉक्टर फक्त तपासणी करून रूग्णांना सल्ला देण्यापलिकडे काहीही करू शकत नाहीत. विशेष म्हणजे युनानी औषधे ही सहजासहजी खाजगी मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे औषधे नेमकी आणायची कुठून असा संतप्त सवाल रूग्ण आणि त्यांचे नातेवाइक विचारत आहेत.

## महाराष्ट्र बारव दीपोत्सवाचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक जलवारसा जतन व संवर्धनाच्या उद्देशाने यंदा महाराष्ट्र बारव दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त, तसेच महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी, रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील ऐतिहासिक बारव (पायऱ्यांची विहीर) येथे दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशभरातील मंदिर, घाट, बारव व जलस्रोतांचे जतन आणि पुनरुज्जीवन करून भारतीय सांस्कृतिक वारसा संवर्धनासाठी अमूल्य योगदान दिले. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याची स्मृती जपण्यासाठी आणि महाराष्ट्रातील ऐतिहासिक बारवांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा दीपोत्सव आयोजित करण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यातील विविध जिल्हे, तालुके व गावांमध्ये असलेल्या बारवांना पारंपरिक दिवे, रांगोळी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रकाशमय करण्यात येणार आहे. स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था, दुर्गसंवर्धन गट, विद्यार्थी व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आहेत.

या दीपोत्सवामागील प्रमुख उद्दिष्टांमध्ये ऐतिहासिक बारवांचा शोध, नोंद व संवर्धन जनजागृती करणे, जलसंवर्धन व जलसाक्षरतेचा संदेश समाजात पोहोचवणे. सांस्कृतिक वारशाबद्दल अभिमान व जबाबदारीची भावना निर्माण करणे. 'बारव ते भवितव्य' हा संदेश देत, हा दीपोत्सव केवळ उत्सव नसून आपल्या जलवारशाच्या पुनरुज्जीवनाची सामूहिक चळवळ ठरत आहे.



## विकासकामांमुळे रस्ते बनले धोकादायक

**। पालघर । प्रतिनिधी ।**



वसई-विरार शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गटार दुरुस्ती, जलवाहिन्या टाकणे आणि रस्त्यांचे काँक्रिटीकरण ही कामे सुरू असली, तरी सुरक्षेच्या उपाययोजना अपुऱ्या असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

शहरातील अनेक भागात रस्ते खोदून तसेच ठेऊन देतात. तसेच खोदकामानंतर बाजूला टाकलेली माती आणि दगड यामुळे पादचाऱ्यांना रस्त्यातून चालणे कठीण होते. वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांवर खोल खड्डे तयार झाले आहेत. काही ठिकाणी इशारा फलक किंवा पुरेशी प्रकाशयोजना नसल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका वाढला आहे. या कामांमुळे अनेक रस्ते अरुंद झाले असून वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. समोरासमोरून येणाऱ्या वाहनांना मार्ग देताना अडचणी निर्माण होत आहेत. मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी ही कामे आवश्यक असली तरी ती नियोजनपूर्वक आणि सुरक्षितपणे पूर्ण करावीत, अशी मागणी नागरिक करत आहेत.

## ट्रॉमा केअर सेंटरमधील एक्स-रे मशिन बंद

**संगमेश्वर :** संगमेश्वर ग्रामीण रूग्णालयातील एक्स-रे मशिन गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याने रूग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेले हे ग्रामीण रूग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटर अपघातग्रस्त रूग्णांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. मात्र, अत्यावश्यक असलेली एक्स-रे तपासणीची सुविधा बंद असल्याने रूग्णसेवेवर गंभीर परिणाम होत आहे. राष्ट्रीय महामार्गावर अपघात झाल्यानंतर रूग्णांना एक्स-रे मशिन नादुरूस्त असल्याने पुढील तपासणीसाठी अन्य शासकीय अथवा खाजगी रूग्णालयात जावे लागत आहे.

### राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा निर्णय | प्रत्येक व्यवहाराची होणार डिजिटल नोंद

# एसटी प्रवासातील सवलतीसाठी 'एनसीएमसी' अनिवार्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसमधील तिकीट खरेदी आणि विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) अनिवार्य केले आहे. एसटी सेवा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि डिजिटल करण्याच्या दृष्टीने राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांसाठी हा मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी एसटी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस आणि एनएसडीएल पेमेंट्स बँकेशी करार केला आहे. राज्यातील सर्व आगारांमध्ये लवकरच नोंदणी मोहीम सुरू होणार असून, प्रवाशांना टप्प्याटप्प्याने हे कार्ड दिले जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



एसटी महामंडळाकडून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग, स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, पुरस्कारार्थी अशा सुमारे ३५ प्रकारच्या प्रवाशांना विविध सवलती दिल्या जातात. परंतु काही ठिकाणी खोट्या ओळखपत्रांच्या आधारे सवलती घेतल्या जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे शासनाला आर्थिक नुकसान होत होते. हे गैरप्रकार थांबवण्यासाठी आणि योग्य व्यक्तीलाच सवलत मिळावी यासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या कार्डमुळे प्रत्येक व्यवहाराची डिजिटल नोंद राहणार आहे. त्यामुळे सवलतींची अचूक माहिती, शासनाकडून मिळणारी परतफेड आणि रोखविरहित व्यवहार एकाच प्रणालीतून होणार आहेत.

शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड, अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड, दिव्यांग प्रवाशांना यूडीआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड देण्यात येणार आहे.

### कार्डचे शुल्क आणि रिचार्ज

**एनसीएमसी स्मार्ट कार्ड घेण्यासाठी प्रवाशांना १९९ रुपये शुल्क भरावे लागणार आहे. भविष्यात कार्ड जुने किंवा खराब झाल्यास ते परत जमा केल्यावर १४९ रुपयांत नवीन कार्ड मिळणार आहे. तसेच कार्ड सक्रिय ठेवण्यासाठी त्यामध्ये किमान १०० रुपयांची शिल्लक असणे अनिवार्य राहणार आहे. तसेच, कार्डचा रिचार्ज ५० रुपयांच्या पटीत करता येणार असून, त्यासाठी ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाइल ॲप तसेच नियुक्त अधिकृत एजंट यांच्या माध्यमातून सहजपणे रिचार्जची सुविधा उपलब्ध असणार आहे.**

### प्रवास सोपा, सुरक्षित होण्यास मदत

**ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३,००० हून अधिक एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. तर ग्रामीण भागातील प्रवाशांनाही बसस्थानकावर नोंदणी करण्याच्या सुविधेचा फायदा होईल. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या या उपक्रमामुळे प्रवास सोपा आणि सुरक्षित होईल.**

## निवडक

### टीएमटी बसला आग



**ठाणे :** सिडको येथून काल्हेरकडे जाणाऱ्या ठाणे परिवहन सेवेच्या बसचा सायलेन्सर गरम होऊन बसला किरकोळ आग लागली होती. ठाणे परिवहन सेवेची बस दुपारी एकच्या दरम्यान २० ते २५ प्रवासी घेऊन काल्हेरच्या दिशेने जात असताना कळवा साकेत पूल येथे बसचा सायलेन्सर गरम होऊन किरकोळ आग लागली. राबोडी वाहतूक विभागाच्या पोलिसांनी या घटनेची माहिती जवाहरबाग अग्निशमन केंद्राला दिल्यानंतर अग्निशमन विभागाच्या जवानांनी ही आग आटोक्यात आणली. या बसने २० ते २५ प्रवासी प्रवास करत होते. आग लागल्याची माहिती मिळताच वाहक, पोलीस आणि चालक यांनी प्रवाशांना खाली उतरवले. त्यामुळे प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही. किरकोळ आग अग्निशमन दलाच्या जवानांनी पूर्णपणे विझवली.

### संतोष नाईक पुरस्काराने सन्मानित



**खरोशी :** सार्वजनिक विद्यालय पेण येथील प्राचार्य यांना राज्यस्तरीय आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराचा कार्यक्रम विवा कॉलेज माणगाव जिल्हा रायगड येथे पार पडला. माहिती तंत्रज्ञान, संगणक, डिजिटल कॅमेरा, मोबाईल इंटरनेट यासारख्या विविध माध्यमांच्या पसाऱ्यात मर्यादशील राहून काळाबरोबर झोकुन देऊन समाजप्रती आपली निष्ठा आणि प्रेम समाजाच्या विविध क्षेत्रात वैविध्यपूर्ण केलेल्या कार्याचा गौरव म्हणून पेण तालुक्यातील प्रसिद्ध असलेले सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य संतोष हिराजी नाईक यांना विवा कॉलेज माणगावचा आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. प्राचार्य संतोष हिराजी नाईक यांना राज्यस्तरीय आदर्श शैक्षणिक भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेचे चेअरमन सदस्य यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकांनी तसेच कॉलेजमधील मुला-मुलींनी त्यांचे अभिनंदन केले.

### कारची एसटी बसला धडक



**चिपळूण :** मुंबई-गोवा महामार्गावरील फरशीनाका परिसरात एसटी बस आणि कारचा अपघात घडला. वाहनाला बाजू काढण्याच्या प्रयत्नात भरधाव कारने समोरून येणाऱ्या एसटी बसला धडक दिली. या अपघातात कार चालक जखमी झाला असून कारसह एसटी बसचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात कारचालक गणेश गोपिनाथ राणे हे जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. बोरिवली ते कणकवली या मार्गावर धावणाऱ्या एसटी बसचे चालक शिवराम सुधाकर राणे (रा. कणकवली) हे होते. एसटी बस फरशीनाका येथील पुलाजवळून जात असताना कार चालकाने पुढील वाहनाला बाजू काढण्यासाठी अचानक भरधाव वेगात कार वळवली. यावेळी नियंत्रण सुटल्याने कार थेट एसटी बसवर आदळली. अपघाताची माहिती मिळताच चिपळूण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमी कारचालकाला रुग्णालयात हलविण्यात आले असून चिपळूण पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.

### लोकलमधून तरुण नदीपात्रात पडला

**पालघर :** धावत्या लोकल ट्रेनमधून वैतरणा नदीपात्रात एक तरुण पडल्याची घटना समोर आली आहे. बोईसर येथील उद्यन वांगड हा तरुण पश्चिम रेल्वेच्या विरार-डहाणू लोकल ट्रेनमधून प्रवास करत होता. पश्चिम रेल्वेच्या सफाळे ते वैतरणा रेल्वे स्थानकादरम्यान असलेल्या वैतरणा नदी नदीवरील पुलावरून लोकल ट्रेन जात असताना हा तरुण थेट वैतरणा नदी पात्रात पडला. मंगळवारी रात्री दहा ते अकरा वाजताच्या सुमारास ही घटना घडली. नदीपात्रात तरुण पडला असल्याची बाब रेल्वे कर्मचारी रमेश सिंग यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने वाढीव येथील गुरु पाटील यांच्याशी संपर्क साधला आणि घटनेची माहिती देऊन त्यांना मदतीसाठी पाचारण केले. त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता गुरु पाटील, साई पाटील यांच्यासह इतर सहकारी स्वतःची बोट घेऊन वैतरणा नदीपात्रात गेले. नदी पात्रात पडलेला उद्यन याने नदीपात्रात पडल्यानंतर रेल्वे पुलाच्या एका खांबाचा आधार घेतला होता. तातडीने बोटीच्या सहाय्याने तेथे जाऊन नदीपात्रात पडलेल्या उद्यन याला पाण्यातून बाहेर काढून बोटीवर घेण्यात आले. बोट नदीकिनारी आल्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करून प्रथमोपचार करण्यात आले.

### 'सेफ हाऊस' ठरले जीवनदायी

**सिंधुदुर्ग :** आंगणेवाडी येथील श्री भराडी देवीच्या जत्रोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातर्फे भाविकांच्या सेवेसाठी सज्ज केलेले 'सेफ हाऊस हॉस्पिटल' खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरले. जत्रोत्सवात दि. ८ ते १० फेब्रुवारी या कालावधीत कार्यरत असलेल्या या अत्याधुनिक केंद्रात एकूण ७३ गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना तातडीने उपचार देऊन दिलासा देण्यात आला. अति महत्त्वाच्या व्यक्ती आणि सर्वसामान्य भाविकांच्या आपत्कालीन आरोग्य सेवेसाठी या सेफ हाऊसची निर्मिती करण्यात आली. यामध्ये अत्याधुनिक उपकरणे, मशिनरी आणि जीवनरक्षक औषधांची उपलब्धता करण्यात आली. अत्यंत गंभीर आणि तीव्र हृदयविकार असलेल्या रुग्णांवर प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले. जत्रोत्सवादरम्यान ईसीजी व हृदयविकार १४ रुग्ण, अतिसार, उलट्या, गॅस्ट्रो व अन्नबाधा १६ रुग्ण, तीव्र निमोनिया, सर्दी, खोकला (बालरुग्ण) १४ रुग्ण, तीव्र खोकला व सर्दी (प्रौढ) १३ रुग्ण, दमा व निमोनिया ८ रुग्ण, अस्थिव्यंग व फ्रॅक्चर ७ रुग्ण यांना सेवा देण्यात आली. अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी तृप्ती धोंडमिसे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सेफ हाऊसमुळे जत्रोत्सवानिमित्त आलेल्या भाविकांना दिलासा मिळाला.

# अवैध पार्किंगमुळे पालीकर त्रस्त

## फलकाच्या शेजारीच वाहने उभी; दंडात्मक कारवाई करण्याची मागणी

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

पाली शहरात वाहतूक शिस्त लावण्याच्या उद्देशाने पाली नगरपंचायतीकडून वाहन चालकांना गाडी कुठे उभी करावी व कुठे करू नये, याबाबतचे फलक विविध ठिकाणी लावण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती पाहता 'नो पार्किंग'च्या फलकाच्या अगदी शेजारीच वाहने उभी असल्याचे चित्र दिसून येत असून, फलक आणि वास्तव यातील दरी ठळकपणे समोर येत आहे. त्यामुळे आधी पार्किंगची व्यवस्था आणि अतिक्रमण हटवा, त्यानंतरच फलक लावा, असा थेट सवाल पालीकर नागरिक नगरपंचायतीला विचारत आहेत.



नगरपंचायतीने फलक लावले म्हणजे जबाबदारी पूर्ण झाली आणि पुढील सर्व कारवाई पोलिसांची, असा पळवाटीचा दृष्टिकोन योग्य नसल्याची भावना व्यक्त होत आहे. नियम असतील, तर त्यांची अंमलबजावणीही तितक्याच कडकपणे झाली पाहिजे. फलक लावूनही नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई होत नसेल, तर ते फलक म्हणजे नगरपंचायतीच्या निर्णयांचा उघड अपमान ठरत असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. पोलीस प्रशासनाने अशा ठिकाणी तातडीने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

पालीतील अनेक मुख्य रस्त्यांवर दुकाने पुढे आलेली असून अतिक्रमणामुळे रस्ते अरुंद झाले आहेत. यामुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि अपघातांचा धोका वाढत आहे. मात्र, अतिक्रमणांबाबत नगरपंचायतीकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

अतिक्रमणावर मौन बाळगून फक्त 'नो पार्किंग'चे फलक लावले जात असतील, तर तो केवळ वाहन चालकांवर होणारा अन्याय असल्याची भावना तीव्र होत आहे. पार्किंगसाठी नियोजनबद्ध जागा निश्चित करा, त्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्या आणि त्यानंतरच नियमांची कडक अंमलबजावणी करा, अशी स्पष्ट अपेक्षा पालीकर नागरिक व्यक्त करत आहेत. नगरपंचायत आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय साधूनच वाहतूक नियम राबवले गेले, तरच शहरात शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण होईल, असे नागरिकांचे मत आहे.

पाली हे वर्दळीचे आणि बाजारपेठेचे शहर असल्याने दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अशा परिस्थितीत नगरपंचायतीने वाहन पार्किंगसाठी स्वतंत्र, अधिकृत आणि पुरेशी जागा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.

> "पार्किंगची ठोस सोय नसताना थेट रस्त्यांवर 'नो पार्किंग'चे फलक लावणे म्हणजे सामान्य वाहन चालकांना अडचणीत टाकण्यासारखे असल्याची भावना आहे. पालीत पार्किंगसाठी जागा उपलब्ध असतानाही तिचे नियोजन व विकास न होणे ही प्रशासनाची मोठी त्रुटी मानली जात आहे.
> -पी. सी.पालकर, पाली"

## निवडक



### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील नेहुली-खंडाळे येथील को.ए.सो माध्यमिक शाळेतून सन १९९५ साली इयत्ता दहावीच्या वर्गातून उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यर्थी विद्यार्थीनींचा स्नेहमेळावा नुकताच रसाणी टेकडी येथे पार पडला. माजी विद्यर्थी जवळजवळ ३१ वर्षानंतर पुन्हा एकदा एकत्र आले होते. यावेळी अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत १९९५ पासुन २०२६ पर्यंतचा प्रवास आपापल्या मनोगतात व्यक्त केला. यामुळे शाळेतील जुने दिवस जुन्या आठवणी असे एक एक क्षण त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले होते. प्रत्येकानी आपल्या मनोगतात शिक्षकांबद्दल कृतघ्नता व्यक्त केली. दिवंगत शिक्षक आणि कुटुंबियांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली. गप्पा, खेळ, नृत्य आणि गाण्यांमुळे वातावरण प्रसन्न झाले होते. शेवटी केक कापून पुन्हा दरवर्षी भेटण्याचा संकल्प करून या मेळाव्याची सांगता करण्यात आली.

### रोजगार मेळावा उत्साहात

नवीन पनवेल : आदर्श शैक्षणिक समूहाच्या प्रांगणात भविष्याला दिशा देणारा, स्वप्नांना बळ देणारा आणि तरुणाईच्या आशांना नवे आकाश देणारा भव्य रोजगार मेळावा उत्साहात संपन्न झाला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पदवीधर प्रकोष्ठ, आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल आणि युवा शक्ती फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास निरंजन डावखरे, कैलाश मोरे, डॉ. सतीश पवार, वामन नाखले, प्रशांत कांबळे, संगीता विसपुते तसेच विविध क्षेत्रांतून उद्योजक, कंपनी प्रतिनिधी, पालक व हजारो युवक, युवती उपस्थित होते. मेळाव्यासाठी ५० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. दिवसभर झालेल्या मुलाखतींमधून असंख्य युवकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली, तर अनेक उमेदवारांना तात्काळ ऑफर लेटर देण्यात आले.



### 'उद्योग निर्माण करून प्रगती करा'

**आगरदांडा :** चांगले जीवन जगायचे असेल आणि सुखवस्तू मिळवायच्या असतील तर उद्योग-व्यवसाय करा. स्वतःचे उद्योग निर्माण करून प्रगती करण्याचा संकल्प करा. आत्मविश्वासाने पुढे या. कामात चिकाटी ठेवा, जिद्दीने उभे राहा असे आवाहन शेकाप पक्षांचे युवा नेते जगदीश भोसले यांनी मुंबई बाजार उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी संदेश काते, मंगेश काते, जगदीश भोसले, निलेश काते, शैलेश काते, कौशल काते, सोहम काते, निविदीता काते श्वेता काते, जान्हवी महाडिक, श्रध्दा काते, प्रसन्न जाळगावकर, संतोष तवसाळकर, अरुण कोतवाल आदिंसह मान्यवर उपस्थित होते. मुंबई बाजार या दुकानाची पूजा संदेश काते व श्रध्दा काते यांच्या हस्ते करण्यात आली. तद्नंतर संदेश काते यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून श्रध्दा काते यांनी फित कापून उद्घाटन करण्यात आले.

### निलेश खामकर यांची अध्यक्षपदी निवड

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील सर्वे येथील नऊगांव कुणबी समाज सर्वे-विहूर विभागाच्या सर्वे येथील नऊगांव कुणबी समाजाच्या सभागृहात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीच्या निवडीत निलेश काशिनाथ खामकर यांची



सर्वे-विहूर विभाग अध्यक्षपदी सर्वांनुमते सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याने सर्वत्र कौतुक व समाधान व्यक्त होत आहे. नऊगांव कुणबी समाज सर्वे-विहूर विभागाची वार्षिक सर्व सभा बुधवारी (दि.११) रोजी समाजाच्या सभागृहात निलेश खामकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी समाजाच्या विविध समस्यांवर चर्चा विचार विनिमय करण्यात आला. यावेळी समाजाच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये नऊगांव कुणबी समाज (सर्वे-विहूर) विभाग अध्यक्षपदी निलेश खामकर, उपाध्यक्षपदी मिलिंद महाडिक, सचिव अमित महाडिक, सहसचिव विलास मोरे, खजिनदार संतोष पोटले, सहखजिनदार दिपक नाईक, सल्लागार सुशील खोपकर यांची निवड करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांनी नवनिर्वाचितांचे अभिनंदन करुन पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार- १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१
- कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- मेघा टॉकीजसमोर स्वामी समर्थ बंगला १५०० SF. Reputed Bank Back office साठी उत्तम.
- Vintage दगडी सागवानी बंगलो मांडवा-सारळ समुद्रापासून २ मिनीट स्वीमिंग पूल गार्डन वगैरे सोयीसह. भाड्याने देणे आहे Contact- 9373747354
- मुले/मुली पाहिजेत. जय संतोषी मां. पंप, वाडगाव फाटा, सीएनजी पंप, मो. ९१३०५४४१२८, ८४११००९९९९
- नामांकित FM.GG कंपनीसाठी PSR आणि सेल्समन पाहिजे, आकर्षक पगार+ इंन्सेटीव्ह संपर्क :९८८१४१८४४८/०२१४१२२३०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




### शिवजयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथीनुसार (फाल्गुन कृष्ण पक्ष तृतीया) होणारा जयंती उत्सव शुक्रवार दिनांक ६ मार्च २०२६ रोजी सर्वच ठिकाणच्या शिवप्रेमींकडून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुसारच नागोठण्यातील शिव-सेना शाखेच्या वतीने दरवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या या शिवजयंती उत्सवासाठी येथील मोहल्ला भागातील इम्रान पानसरे यांची अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नागोठण्यातील शिवजयंती उत्सव समितीच्या कार्यकारिणीमध्ये कार्याध्यक्ष मुकेश भोय व कैलास गोरे, उपाध्यक्ष संजय पाटील व अजित दळवी, सचिव श्रीराम मांगले, सह सचिव अविनाश भोसले, खजिनदार संदीप राऊत, सहखजिनदार बाळू रटाटे, सल्लागार कीर्ती कुमार कळस, जितेंद्र कजबजे, सुहेल पानसरे, मनोज कोळी तर सदस्य म्हणून संतोष घोसाळकर, सचिन रोडेकर, मंगेश वाघमारे, प्रसाद कोळी, नागेश सुर्वे, सलीम अखतार, प्रवीण चितळे, दिनेश वादळ, संदीप शिर्के, रुपेश जगताप या सर्वांची निवड करण्यात आली आहे.

शिवजयंती उत्सव समितीच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे राजेश सुर्वे, पंकज कामथे, मुकेश भोय, बाळू रटाटे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### महिला दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**नवीन पनवेल :** पनवेलमधील एकता महिला मंडळाच्या वतीने सरोजिनी नायडू यांची जयंतीनिमित्त संस्कृती रक्षक व समाजभान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम १३ फेब्रुवारीला काँग्रेस भवन येथे होणार आहे. कार्यक्रमास डॉ. नीता ताटके उपस्थित राहणार आहेत. तर डॉ.जयश्री पाटील अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. राष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून दादर येथील समर्थ व्यायाम मंदिरातील महिलांचे मल्लखांब प्रात्यक्षिक हे कार्यक्रमाचे आकर्षण असेल. समाज भान पुरस्कार २०२६ संगीता लाड यांना तर संस्कृती रक्षक पुरस्कार २०२६ प्रचिती देसाई, ईशा देसाई यांना प्रदान करण्यात येणार आहे.



### श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

**| पाली | प्रतिनिधी |**

श्रीबल्लाळेश्वर देवस्थान पाली यांच्या वतीने भक्तांसाठी व व येणाऱ्या भाविकांसाठी दि. ७ ते १३ फेब्रुवारी दरम्यान माघ मासानिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले. या सप्ताह सोहळ्यासाठी युवा भागवत कथाकार मयुरेश केळकर यांनी भक्तांना कथेचे कथन केले. सदर सप्ताह सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न होत असताना अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला. यावेळी ५६ प्रकारचे पदार्थ्यांचे भोग ठेवण्यात आले होते. हा सप्ताह दि. ७ ते १२ फेब्रुवारी दरम्यान दुपारी ३:३० ते सायंकाळी ७:३० या वेळेत होता. तर शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत असणार आहे. तर बुधवारी दि. ११ रोजी सायंकाळी ७ वाजता विशेष हंडीचे आयोजन करण्यात आले होते. सदर सप्ताह सोहळा जुनी मठी श्रीदेव श्रीबल्लाळेश्वर मंदिर पाली याठिकाणी आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गंद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, शेखर सोमण व सर्व विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तांकारिता आयोजित करण्यात आला होता.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

### राजिप गुढवणवाडी शाळेच्या नवीन वर्ग खोल्यांचे लोकार्पण

**| कर्जत | प्रतिनिधी |**

अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमी आणि सुवर्णा जोशी यांच्या विशेष प्रयत्नातून राजिप गुढवणवाडी शाळेस दोन नवीन वर्ग खोल्या बांधून लोकार्पण सोहळा संपन्न झाला. अतिशय दुर्गम भागातील गुढवण वाडीतील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कित्येक वर्ष दोन खोल्यांमध्ये १ ली ते ७ वी इयत्तेतील ८०-८५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमीच्या सीएसआर फंडमधून शैक्षणिक साहित्य वाटपास आलेल्या गौरी साठे आणि सुवर्णा जोशी यांच्याकडे तत्कालीन मुख्याध्यापक राजेंद्र कोळी आणि त्यांचे सहकारी यांनी वर्ग खोल्यांची मागणी केली होती. त्यानंतर ज्ञानेश्वर वाडीले, श्रीकृष्ण सुपे, पंढरीनाथ पाटील, घुले, ग्रामस्थ या सर्वांनी वेळोवेळी माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्याकडे पाठपुरावा करत अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमी सीएसआर फंडमधून दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण करून देण्यात त्यांना यश आले आहे.

वर्ग खोल्यांचे सोमवारी (दि.११) रोजी लोकार्पण सोहळा अवधूत साठे यांच्या हस्ते करण्यात आले. सोहळ्यासाठी गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे, विस्तार अधिकारी अरुण पारधी, प. शि. म्हात्रे, दिलीप घुले, श्रीकृष्ण सुपे, ज्ञानेश्वर वाडीले, पंढरीनाथ पाटील, अर्जुन सपकाळ, शंकर फोडसे, संतोष मगर, कशेळे केंद्रातील सर्व शिक्षक वृंद, शाळेचे माजी शिक्षक, दिनेश खडे, विद्यार्थी मित्र उपस्थित होते. अवधूत साठे, गौरी साठे, सुवर्णा केतन जोशी, अभिजीत शिर्के, संदीप भोईर यांचे यावेळी आभार व्यक्त केले.

### नेरळ विद्या भवन शाळेत विविध गुण दर्शन सादर

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ कळंब रस्त्यावर धामोते येथील नेरळ विद्या भवन शाळेमधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याची सांस्कृतिक परंपरा विविध गुण दर्शन करताना साकारली. शाळेच्या वार्षिक गुणगौरव समारंभात महाराष्ट्राची लोकधारा सादर करण्यात आली. तसेच कामगार नेते नारायण फेणाणि पब्लिक वेल्फेअर ट्रस्ट मुंबई संचालित धामोते येथील नेरळ विद्या भवन माध्यमिक विद्यालय या मराठी माध्यमिक शाळेचा वार्षिक गुणगौरव सोहळा नेरळ कळंब रस्त्यावरील डिस्कव्हर रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला होता. याप्रसंगी महेश विरले, रोशन म्हसकर, जनार्दन निरगुडा, शिल्पा रांगणेकर, ज्योत्स्ना विरले, डॉ. विवेक भगत आदी मान्यवर उपस्थित होते.



तसेच २०२५ मधील गुणवंत विद्यार्थी हर्षला धुळे, प्रतिक्षा विरले, सोहम तरे, शैक्षणिक वर्षात शासकीय रेखाकला परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, विविधांगी कला, क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धांत प्रावीण्य संपादन एकूण ७८ विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

सांस्कृतिक समितीचे सदस्य संतोष कांबरी, पुष्पा सोनवणे, विद्या भुसाळ यांनी महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले.

### गजानन तांबुसकर बेपत्ता

**नवीन पनवेल :** कळंबोली येथून ८० वर्षीय गजानन कृष्णा तांबुसकर सेक्टर ५ हे बेपत्ता झाल्याने ते हरवले असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली.



त्यांचा रंग सावळा असून टक्कल पडलेले आणि दाढी पांढरी आहे. त्यांना मराठी, हिंदी भाषा बोलता येते. या ज्येष्ठ नागरिकाबाबत काही माहिती असल्यास पोलीस एम बी पवार यांच्याशी संपर्क साधावा.

### पैठणीच्या मानकरी ठरल्या पूनम-दीपाली

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान शहरातील सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात कार्य करणाऱ्या मैत्री ग्रुपचे वतीने तिळगुळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात महिलांसाठी विविध खेळ आयोजित करण्यात आले होते. त्यात खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या खेळामध्ये मानाची पैठणी पूनम सकपाळ यांनी जिंकली तर दीपाली कदम दुसऱ्या पैठणीच्या मानकरी ठरल्या आहेत.

माथेरान शहरातील महिलांनी एकत्र येऊन मैत्री ग्रुप स्थापन केला आहे. या ग्रुपकडून असेम्ब्ली हॉलचे मैदानावर महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. विधवा महिलांना या हळदीकुंकू निमंत्रित करण्यात येते. यावेळी संगीत खुर्ची, चमचा लिंबू, फुगा फेकणे तसेच अन्य खेळ खेळले गेले. या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेले महिला मानाच्या पैठणीच्या मानकरी ठरल्या.

### नामदेव मोरे अनंतात विलीन

**वावोशी :** वावोशी गावचे नामदेव वाळकू मोरे (वय ७४) यांचे ४ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



त्यांचे पुण्यानुमोदन शोकसभा कार्यक्रम १५ फेब्रुवारी रोजी खोपोलीतील नालंदा बुद्धविहारात आयोजित करण्यात आला आहे. १४ फेब्रुवारी रोजी दत्ता पाटील यांचे प्रवचन घरी सिद्धार्थ नगर येथे होणार आहे.

## नागरिकांना जीव मुठीत धरुन प्रवास ट्रेलर तातडीने हटवण्याची मागणी

# महामार्गालगत बंदावस्थेत अवजड वाहन

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गाला लगत वाळंजवाडी येथील रस्त्याकडेला एक कॉइल घेऊन जाणारा ट्रेलर मागील पाच दिवसांपासून बंदावस्थेत आहे. रस्त्याच्या वळणावरच हा ट्रेलर उभा असल्याने बंद पडल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. तर, यामुळे नागरिकांची मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. कोलाडकडून सुतारवाडीमार्गे विळा-भागाड येथील एका कंपनीकडे १०० टन वजानाच्या दोन कॉइल्स घेऊन जाणारा ट्रेलर शनिवार (दि.७) पासून वाळंजवाडी रस्त्याकडेला बंद अवस्थेत उभा आहे.



मुख्य रस्त्यावरील हे वळण अत्यंत अरुंद असून, तिथेच हे अवजड वाहन उभे राहिल्याने दोन्ही बाजूने येणाऱ्या वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे इशारा देणारे फलक लावलेले नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहन एकमेकांवर आदळण्याची शक्यता आहे. तसेच, बंदावस्थेतील या ट्रेलरला वाहने धडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे नागरिकांनी लवकरात लवकर हा ट्रेलर हलवून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली आहे.

या परिसरात मोठ्या प्रमाणावर क्रशर खाणी असल्याने खडीने भरलेल्या डंपरची सतत वर्दळ असते. यासोबतच अवजड वाहनांचीही मोठी रहदारी असते. त्यातच हा ट्रेलर वळणावरच उभा असल्याने वाहतूक कोंडी होत आहे.

कोलाड-सुतारवाडी दरम्यान प्रवास करणाऱ्या स्थानिक नागरिक आणि प्रवाशांना यामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे.

भरा फाटा ते विले भागाड एमआयडीसी मुख्य रस्त्यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. अशा परिस्थिती रस्त्यालगत बंद अवस्थेत असलेल्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. अपघातात घडू नये म्हणून या पुढे अशा वाहन चालकांना समज दिली जाईल. अन्यथा संबधित वाहन चालकांवर सक्त कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कोलाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांनी दिली आहे.

#### सुरक्षा धोक्यात

वाळंजवाडी ते कुडली दरम्यान अशा प्रकारे कॉइल्स वाहून नेणारे ट्रेलर वारंवार बंद पडण्याचे प्रकार घडत आहेत. यामुळे सुरक्षा धोक्यात आली असून नागरिकांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो. याप्रकरणी संबंधित ट्रेलर मालक आणि चालकावर कठोर कारवाई करावी आणि हा ट्रेलर तातडीने रस्त्यावरून हटवावा, अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

# जाळ्यात अडकलेल्या कासवाला जीवदान

**आगरदांडा :** बाळु हरी भिकारी वाशी हावेली आपली दोन सिलेंडरची बोट घेऊन आपले खलाशी भालचंद्र खानजी आणि हरी भिकारी यांना घेऊन मच्छी पकडण्यासाठी आगरदांडा दिघी बंदराजवळील समुद्रात गेले होते. यावेळी त्या ठिकाणी मच्छिमारी करताना जाळ्यात अडकलेल्या अंदाजे २५ किलो वजनाचा महाकाय कासवाला पहिले. त्यांनी प्रथम त्या कासवाला होडीत घेऊन त्याची जाळ्यातून सुटका केली. त्यानंतर पुन्हा त्याला समुद्रात सोडून दिले. बाळु भिकारी यांनी सांगितले की, समुद्रातील कासवे खाडीमध्ये शेवाळ या खाण्यासाठी येतात.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलकडे ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सतेज बाळकृष्ण नाईक रा. बेलकडे ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली मालकी हक्काची व त्यांचे खुद्द ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बयाणा पावती विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बेलकडे ता.अलिबाग जि.रायगड | २५७ | ०-०६-६०<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण क्षेत्र ०-०९-६० | १.५६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-१२/०२/२०२६

सही /-
**ॲड. सोनाली कल्पेश गुरव**
रा.मु.पो.सासवने
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबाईल नं. ९२६०२३४३१२

## सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये RTE अंतर्गत इयत्ता पहिली करिता प्रवेश प्रक्रिया सुरु माणगांव,

या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता RTE अंतर्गत २५ टक्के आरक्षण संदर्भात इयत्ता पहिली करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक ०९/०१/२०२६ पासून सुरु झाली आहे.

सदरचे प्रवेश हे वंचित घटक (SC, ST, NT, OBC, SBC) दिव्यांग बालके, एच.आय.व्ही. बाधित किंवा एच.आय.व्ही. प्रभावित बालके, अनाथ बालके, कोव्हीड प्रभावित बालक (ज्याचे पालक एक किंवा दोन्ही यांचे निधन १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत कोव्हीड प्रादुर्भावामुळे झाले आहे) या वंचित गटातील बालकांच्या प्रवेशाकरीता वार्षिक कमाल उत्पन्नाची मर्यादा लागू नाही) तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असणारे) तसेच घटस्फोटित महिला, विधवा महिला यांची बालके यांच्यासाठी आरक्षित आहेत.

सदर प्रवेश प्रक्रियेकरिता रहिवासी (निवासी) पुरावा, विद्यार्थ्यांच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र (असेल तर), उत्पन्नाचा दाखला, जन्माचा दाखला, घटस्फोटित महिलाकरिता न्यायालयाचा निर्णय, विधवा महिलाकरिता पतीचे मृत्युचे प्रमाणपत्र, अनाथ बालकांकरिता पालनकर्त्यांचे हमीपत्र, विद्यार्थ्यांचे छायाचित्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. (सदरची कागदपत्रे ऑनलाईन फॉर्म भरण्यापूर्वीची आवश्यक आहेत तसेच विद्यार्थ्यांचा आधारकार्ड अनिवार्य आहे)

सदरची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. पालकांनी स्वतः ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा आहे व त्याकरिता खालील वेबसाईट वर अर्ज व सर्व माहिती उपलब्ध आहे.

वेब साईटः- https://student.maharashtra.gov.in-RTE 25% Portal
or https://rte25admission.maharashtra.gov.in/adm_portal/Users/rteindex

तरी पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मिडीयम स्कूल, माणगांव, तर्फे करण्यात आले आहे.

सही/-
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सुधाकर नारायण शिपूरकर इंग्लिश मिडीयम स्कूल, माणगांव, जि. रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत जासई
### मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधीतून वस्तू खरेदी कामी मान्यता प्राप्त पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ६ मधील अशोक म्हात्रे यांचे घरापासून ते संजय म्हात्रे यांच्या घराजवळील मेन गटारपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ४,०४,२८२/- | ४,०४२/- | ५००/- | २ महिने |
| २ | वॉर्ड क्र. ३ गुरूनाथ घरत यांचे घरापासून ते दिपक रमन घरत यांचे घरापर्यंत गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | १,०८,६८४/- | १.०८६/- | ५००/- | २ महिने |
| ३ | घनकचरा संकलनासाठी मोठ्या कचरा कुंड्या खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ बंधित | १.७४,९०३/- | - | - | २ महिने |
| ४ | सार्वजनिक कचरा कुंडी खरेदी करणे (नग-१०) | १५ वा वित्ता आयोग सन २५/२६ बंधित | ७०,११०/- | - | - | २ महिने |
| ५ | कार्बोलिक व हार्बेल पावडर व जंतुनाशक औषधे खरेदी करणे | १५ वा वित्ता आयोग सन २५/२६ अबंधित | ५३,४४६/- | - | - | २ महिने |
| ६ | ग्रामपंचायत जासई हद्दीत योगा शिबिर घेणे | १५ वा वित्ता आयोग सन २५/२६ अबंधित | ५०,०००/- | - | - | २ महिने |
| ७ | ग्राम पंचायत हद्दीमध्ये स्मशानभुमी व इतर सार्वजनिक ठिकाणी बसण्याकरीता बेंचेस खरेदी करणे (नग-१०) | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | १,५०,०००/- | - | - | २ महिने |
| ९ | आदिवासीवाडी येथील कमान दुरूस्ती व रंगरंगोटी करणे | ग्रामनिधी १५% मागासवर्गीय सन २०२५/२०२६ | ५०,०००/- | - | - | २ महिने |
| १० | ग्रा.पं.हद्दीतील वैयक्तीक शौचालयाच्या सेप्टीक टँकच्या एअर पाईपला जाळी बसविणे, संख्या- २००० | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | २,००,०००/- | - | - | २ महिने |

१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक १३/०२/२०२६ ते १९/०२/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २०/०२/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण:- जासई
दिनांक:- १३/०२/२०२६

**ग्राम पंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत जासई**

## ग्रुप ग्रामपंचायत वळके

जा.क्र. १५२ दिनांक- ११/०२/२०२६

### अल्प मुदतीची निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत वळकेने १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. १६/०२/२०२६ रोजी संध्या ठीक ५:०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा दि. १७/०२/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील, त्यावेळी उपस्थित रहावे. निविदा फार्म दि. १६/०२/२०२६ रोजी संध्या ठीक ०५:०० वाजेपर्यंत दिले जातील, त्यानंतर उशिरा आलेल्यांना दिले जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ताडगाव विहिर शेड दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ११२०००/- | ११२०/- | ५६००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| २ | वळके विहिर शेड दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ११२०००/- | ११२०/- | ५६००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ३ | सातिर्डे तलाव पायऱ्या बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग | १०००००/- | १०००/- | ५०००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ४ | सातिर्डे विहिर शेड दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १०००००/- | १०००/- | ५०००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ५ | श्री. नारायण बाबाजी मळेकर यांच्या घराकडे जाणाऱ्या नाल्यावर पायऱ्या बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ६ | ताडवाडी गटार नाळा दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ७ | ग्रा.पं. दुकान गाळे दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | १०००००/- | १०००/- | ५०००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ८ | ताडगाव आदिवासी वाडी समाज मंदिर दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ३४७९६/- | ३४८/- | १७४०/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ९ | ग्रा.पं. कार्यालय वरती सभागृह हॉल बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग | २१९६४४/- | २१९६/ | १०९८२/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १० | शिरगाव येथे दोन विद्युत पोल बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ११ | शिरगाव येथील धनंजय सातामकर यांच्या घरापर्यंत दोन विद्युत पोल बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १२ | शंकर पद्माकर भगत यांच्या घरापासून ते सुधिर सावंत यांच्या घरापर्यंत पायऱ्या बांधकाम करणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १३ | महेंद्र सातामकर यांच्या घराकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १५ वा वित्त आयोग | ५६०००/- | ५६०/- | २८००/- | १००/- | १६/०२/२०२६ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |

**अटी व शर्ती-**
१) १ टक्के इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
२) कोरे निविदा फॉर्म फी रू. १००/- इतकी राहिल.
३ ) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४) प्राप्त निविदा दि. १७/०२/२०२६ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात वळके येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे हस्ते उघडणेत येईल.
५ ) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्ट्रेशनचे दाखले हे सत्यप्रत केलेले असावेत व सोबत चालू आर्थिक वर्षात केलेले कामाचा समक्ष प्राधिकाऱ्यांचा दाखला असावा. प्रथम प्राधान्य नोंदणीकृत ठेकेदारांस दिला जाईल.
६) कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच वळके यांनी राखून ठेवला आहे.
७) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा. शाखा अभियंता साहेब बांधकाम पं. स. मुरूड यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्राम पंचायतीचे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यरंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
८) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९) जी.एस.टी नंबर आवश्यक आहे.
१०) पॅन कार्ड नंबर आवश्यक आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक योगेश तातुराम घरत यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २४/९ | ००-०५-०० | ५०.०० |
| २२/१ | ००-०७-०० | ७०.०० |
| २३/३ | ००-०७-३० | ७३.०० |

सबब सदर वर वर्णन केलेली बिनशेती मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १२ फेब्रुवारी २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे वाळवटी खुर्द, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील भुमापन क्र. व उपविभाग १६, एकूण क्षेत्र ००-६२-४०, आकार १२.५०, पो.ख. ०.०१.७०, लागवड - सुपारी पैकी एकूण क्षेत्र ००-२७-३५, आकार ५.६३, लागवड - सुपारी इतक्या क्षेत्राच्या मिळकतीचे विद्यमान मालक लियाकत अली अहमद कारभारी यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांसोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : १३/०२/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे धोकवडे येथील पुढील वर्णनाची मिळकत सौ.भारती सत्यजित दळी यांच्या मालकीची आहे.

| गट क्रमांक | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६७२ | ०-६९-९०<br>पोटखराबा.०-०५-३०<br>एकूण ०-७५-२० | १६=१५ |

सदर मिळकत विद्यमान वर नमूद मालकांकडून कायम विकत घेणेबद्दल प्राथमिक बोलणी आमचे अशील आणि विद्यमान मालक यांचे दरम्यान चालू आहेत. सदर मिळकत निर्वेध असलेची माहिती विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, साठेकरार, कुळहक्क, लीज वगैरे हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांचे मुदतीत सदर हक्क/हितसंबंध शाबीत होईल अशा स्वरूपात लेखी पुराव्यासह आमचेकडे दाखल कराव्यात. विहित मुदतीत काहीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकतींबाबत विचार केला जाणार नाही याबद्दल सर्वांनी नोंद घ्यावी.

ता.१२/०२/२०२६

**ॲड. संजय आचार्य.**
**चौल, अलिबाग.**

## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सुचना

"हिंद-दि-चादर" श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागम शताब्दी जयंती हा कार्यक्रम खारघर येथील सेंट्रल पार्क मैदानावर २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. सुमारे १२-१५ लाखांचा समुह सदर ठिकाणी उपस्थित राहण्याची अपेक्षा असल्याने आपत्ती व्यवस्थापनाकरीता आराखडा तयार करणे, सर्व महत्वाच्या आस्थापनांशी संपर्क साधुन गर्दीचे नियोजन करणे व इतर आपतकालीन व्यवस्था इ. कामाकरीता पनवेल महानगरपालिकेच्यामार्फत सल्लागार नियुक्त करण्यात येणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनाचा व अशा प्रकारचे कार्यक्रम हाताळले असल्याचा अनुभव असलेल्यांनी सदर कामाकरीता अंदाज दरपत्रक ०३ दिवसाच्या आत सादर करावे.

अंदाज दरपत्रक खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे.
पत्ता :- उपायुक्त मुख्यालय (I), पनवेल महानगरपालिका, पनवेल.
याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशिलवार माहिती www.panvelcorporation.com या दिनांक १३/०२/२०२६ रोजी पासुन संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र./पमपा/अग्नि/२९५/२०२६
दिनांक :- १२/०२/२०२६

सही/-
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय-I)**
**पनवेल महानगरपालिका**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे आडोशी, ता. खालापूर, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली बिनशेती मिळकत तिचे मालकाकडून खरेदी करणेचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आडोशी, ता. खालापूर, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| बिनशेती सर्व्हे /हिस्सा नं. | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमिन मालक |
|---|---|---|---|
| ३४९ | एकुण क्षेत्र ११६.७०.०० पैकी ४०.००.०० | ११६७.०० ४००.०० | पिरामिड रिसायकलींग ॲण्ड रिप्रोसेसिंग प्रा.लि.तर्फे डायरेक्टर असलम सादुल्ला खान |

या बिनशेती मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणत्याही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येवून आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कर्जत
दिनांक १३/०२/२०२६

**ॲड.साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड.राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता: ओम श्री भाग्योदय को.ऑप.हौ.सो. कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकतीचे मालक श्री. रविंद्र विठ्ठल गंधे रा. नांगुर्ले यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांगुर्ले, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २७/३ एकुण क्षेत्र ०.८४.०० गुंठे पैकी ०.०१६.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १३/०२/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे : खंडाळे ता.अलिबाग,जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मालक: श्री सुधाकर,श्री विष्णु, श्री. राजाराम व श्री प्रमोद नारायण ठाकुर यांच्या नावे कबजात आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गांव | गट नंबर । हि. नं | क्षेत्र है आर | आकार रुपये , पैसे |
|---|---|---|---|
| खंडाळे | 299/1 73/1<br>299/2 73/2 | 0.25<br>0.41 | 0.56<br>0.85 |

**घर नंबर : 288**


वरील संपूर्ण क्षेत्र आमचे ताबेकबजात आहे. तरी नमुद मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्यकोणाचीही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षिस, वारसाहक्क, पोटगी,लिन, चार्ज, ताबा वाहिवाट, साठेकरार, फारोक्त, इजमेंट, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 14 **(चौदा) दिवसात्** खाली सही करणार यांचे पत्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी.
वरील मुदतीस कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो सोडून दिला आहे. सदरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. तसेच त्या मिळकतीमध्ये खरेदी-विक्रीचे व्यवहार करू नये. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहित. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**ठिकाण: खंडाळे, अलिबाग, रायगड**
Contact Number: 9422494611

सही
पी.एन. ठाकूर


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## ग्रुप ग्रामपंचायत वळके

जा.क्र. १५२ दिनांक- ११/०२/२०२६

### साहित्य दरपत्रक मागणी निविदा

ग्रुप ग्रामपंचायत वळके कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या साहित्य खरेदी बाबत महाराष्ट्र शासन निर्णय व रा.जि.प. यांजकडील नोंदणीकृत स्थानिक पुरवठादार/दुकानदारांकडून खालील कामांच्या मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी स्तर | अंदा. दर |
|---|---|---|---|
| १ | मेडीक्लोर खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ९००००/- |
| २ | टी.सी.एल./ब्लिचींग पावडर खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ३८४१८/- |
| ३ | कापडी पिशव्या खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | १६६९००/- |
| ४ | चुना पावडर खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- |
| ५ | ग्रामपंचायत हद्दीत सौरपथ दिवे बसविणे. | १५ वा वित्त आयोग | १३४५१८/- |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय संगणक खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ९००००/- |
| ७ | जंतूनाशक फवारणी करणे. | १५ वा वित्त आयोग | ९९०००/- |
| ८ | ग्रा.पं. कार्यालय मध्ये गॅस शेगडी खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | १७०००/- |
| ९ | महिला प्रशिक्षण | १५ वा वित्त आयोग | ८५४७३/- |
| १० | ग्रा.पं.कार्यालयमध्ये RO फिल्टर बसविणे. | १५ वा वित्त आयोग | १५०००/- |
| ११ | ग्रा.पं.हद्दीतील सर्व याची लाईट बील व साहित्य पुरविणे. | १५ वा वित्त आयोग | ८६९८९/- |
| १२ | वळके, सातिर्डे आणि शिरगाव RO दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | १०००००/- |

टिप -
१) दिनांक -१६/०२/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत दरपत्रक सादर कराव्या उशिरा आलेल्या दरपत्रक/अर्ज स्विकाराल्या जाणार नाही. सदर दरपत्रकबाबत मंजुरीनुसार परस्पर नोटीस बोर्डावर प्रसिद्धी करण्यात येईल.
२) पुरवठादार/दुकानदार जी. एस. टी धारक नोंदणीकृत असावेत.
३) ग्रामपंचायत वळकेकडे उपलब्ध निधी नुसारच बिल देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४) १ किंवा सर्व दरपत्रकअर्ज फेटालण्याचे सर्व अधिकार तसेच दरपत्रकमंजुरीचा सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत वळके यांसकडे ठेवण्यात येत आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त सप्ताहाचे आयोजन

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील वरसगाव येथे महाशिवरात्री निमित्त दि.१५ ते दि.२२ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. खा. सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आ. अनिकेत तटकरे यांच्या प्रेरणेने व ग्रामस्थांच्या विशेष सहकार्याने संपन्न होणार आहे. या सप्ताह सोहळ्यात दररोज पहाटे काकड आरती, सकाळी व दुपारी ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण, सायंकाळी प्रवचन, हरिपाठ, हरिकिर्तन तद्नंतर हरिजागर आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. रविवारी (दि.२२) रोजी श्रींचा पालखी सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे. या सप्ताहाचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ वरसगाव, आदिनाथ सेवा मंडळ, हरिपाठ मंडळ, श्रीसापया क्रीडा मंडळ वरसगाव आदी मोलाचे सहकार्य करीत आहेत.

# शासकीय कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

## नागरिकांनी कार्यालयाकडे फिरवली पाठ; निवासी नायब तहसीलदार राठोड यांना निवेदन

। रसायनी । प्रतिनिधी ।

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी खालापूर तहसील कार्यालयाच्या आवारात शासकीय कर्मचारी यांनी आंदोलन करून धरणे धरले होते, त्यामुळे गुरुवारी (दि.१२) रोजी सर्वसामान्य जनतेच्या कामाचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसत होते. नागरिक यांनीही कार्यालयाकडे पाठ फिरवली होती.

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी कर्मचारी, शिक्षक, कामगार संयुक्त कृती समिती यात सामील होती. निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्याकडे निवेदन देण्यात आले. देशातील विविध कामगार-कर्मचारी संघटनांच्या निर्णया नुसार देशातील पाच कोटी कामगार-कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांच्या आग्रहासाठी एक दिवसीय देशव्यापी संप, आंदोलन पुकारले आहे.




आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी महाराष्ट्रातील १७ लाख कर्मचारी शिक्षक तसेच संघटित व असंघटित कामगार सुध्दा सामील झाले आहेत. चार कामगार संहिता रद्द करा, पीएफआरडीए कायदा रद्द करा, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, आठव्या वेतन आयोग तात्काळ लागु करा, रिक्त पदे भरा, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस विमा योजना लागू करा, महागाई कमी करा, खासगीकरण कंत्राटीकरण रद्द करा, नवीन शैक्षणिक धोरणाचा पुर्नविचार करा, शिक्षकांची टीईटी परीक्षा रद्द करा, केंद्र सरकारने मनरेगा कायद्यात केलेला बदलाला विरोध, माथाडी कामगार व असंघटित कामगारांकरीता स्वतंत्र कायदा तयार करावा, अशा महत्वाच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

### जनतेच्या कामाचा बट्ट्याबोळ

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी कर्मचारी, शिक्षक,कामगार संयुक्त कृती समिती यात सामील होती. या आंदोलनांमुळे सर्वसामान्य जनतेच्या कामाचा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसत होते.

बेरोजगारी कमी करण्याकरीता उपाययोजना करावी, सर्वच विभागात कर्मचारी संख्या कमी असूनही रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया अत्यंत मंदगतीने सुरु आहे. एक कर्मचारी दोन चार कर्मचाऱ्यांचे काम करीत आहे. सर्व कर्मचारी अधिकाऱ्यांना कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी व्यापक स्वास्थ विमा योजना लागू करणे बाबत अद्याप निर्णय झालेला नाही, कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, कंत्राटी करण व खासगीकरण धोरण रद्द करून कायम स्वरुपी रोजगार द्यावा. एकूण १८ मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खालापूर तहसील कार्यालयाच्या मार्फत देण्यात आले. यावेळी तालुका अध्यक्ष अमोल वाघ, अशोक सुसलादे, गणेश मुंढे, समाधान पाटील, कसबे, कविता साळवी, विद्या हिरवे, केंद्रे, अविनाश गुर्ले, दीपाली पवार यांच्यासह कार्यालयातील सर्वच कर्मचारी उपस्थित होते. काम बंद आंदोलन नसले तरी आपली नियमित कामे, समस्या घेऊन येणारे नागरिकांनी मात्र कार्यालयाकडे पाठ फिरवली होती, असेच चित्र होते, कार्यालयाच्या आवारात हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच लोक दिसत होते.

## निबंध स्पर्धाचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अलिबाग शाखेतर्फे, राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त, निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. खुल्या गटासाठी मराठी निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचे विषय देशाला नुसते मतदार नकोत, सुज्ञ नागरिक हवेत, सुशिक्षितांमधील वाढती अंधश्रद्धा. निबंधासाठी शब्दमर्यादा, एक हजार ते बाराशे शब्द आहेत. इच्छुक सहभागींनी वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहून, २१ फेब्रुवारीपर्यंत पुढील पत्त्यावर पाठवावा. निबंध हस्तलिखित स्वरूपात असावा. शब्दमर्यादा पाळावी. स्वतःचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक निबंधाचे शेवटी लिहावा. संपर्कासाठी पत्ता: शुभांगी जोगळेकर, शासकीय वसाहतीमागे, शिवाजीनगर, चेंढरे, अलिबाग. संपर्कासाठी मोबाईल क्रमांक ९२७३३४३१७७, ९८८१०७२२९० असे शाखाध्यक्ष शुभांगी जोगळेकर यांनी सांगितले आहे.

## निवडक



### घनकचरा व्यवस्थापनाचे तीन तेरा

**उरण :** उरण नगर परिषदेमध्ये अनेक वर्षांपासून दलीत, आदिवासी गोरगरीब कंत्राटी सफाई कामगार कार्यरत आहेत. या कंत्राटी कामगारांनी कोवीडमध्ये देखील जीवाची बाजी लावून काम केले. या कर्तव्यदक्ष व प्रामाणिक कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून त्यांच्या विविध मागण्या प्रलंबित आहेत त्या पूर्ण होत नसल्याने या कामगारांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगर परिषदमधील कचरा साफ सफाई कामगारांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी लाखो रूपये अधिकचे खर्च करून काम दिले जाते. मात्र, कमीत कमी कामगार वापरून अधिकाधीक नफा मिळवण्याचे काम राजरोसपणे ठेकेदार करत आहे. उरण नगर परिषद प्रशासन मात्र या बाबतीत मौन पाळून शांत का? हा प्रश्न जनतेच्या मनात येत आहे. उरण शहरात कचर्याचे साम्राज्य असतानाही ठेकेदार कामगारांना कामावर घेत नाही. या आडमुठ्या धोरणा विरोधात जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मागे हटणार नाहीत असा आक्रमक पवित्रा उपोषण कर्त्यांनी घेतला आहे. या बाबतीत प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन कामगार वर्गांना न्याय द्यावा अशी मागणी सर्वच स्तरातून होताना दिसून येत आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांना याबाबतीत निवेदन देण्यात आले आहे. लवकरच हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.




### पीएम श्री शाळेत मार्गदर्शन शिबीर

**रसायनी :** रसायनीतील पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (स्वायत्त) येथे पीएम श्री शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय प्रादेशिक नवोपक्रम मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. शिबीर शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद आणि शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच वाधवानी फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. शिबिराचा मुख्य उद्देश शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे हा होता. कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण विभागाच्या संचालिका भावना राजनूर, मयूर बोरकर, मकरंद वेलणकर, अंजली नाईक यांच्या उपस्थितीत झाले. शिबिरामध्ये समूह कृती, कार्यशाळेचा समावेश होता. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. जगदीश डब्ल्यू. बकल यांच्या नेतृत्वाखाली तसेच डॉ. गजेंद्र व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, डॉ. डॅफ्नी पिल्लई, डॉ. प्रियम पिल्लई आणि प्रनव पिल्लई यांचा विशेष सहभाग होता. या शिबिरात १७० हून अधिक शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

### प्रतीक्षा बडे यांचे टीईटी परीक्षेत यश

**सुतारवाडी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा महाटीईटी परीक्षा (दि.२३) नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडली. शुक्रवारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने अंतरिम निकाल जाहीर केला यामध्ये राजिप शाळा गोवे येथे कार्यरत असलेल्या उप शिक्षिका प्रतीक्षा बाळासाहेब बडे यांनी यश संपादन केले. त्यांनी इयत्ता १ ली ते ५ वी साठीचा पेपर १ व इयत्ता ६ वी ते ८ वी साठी असलेला पेपर २ दोन्ही परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पात्र केल्या आहेत. बडे या ज्ञानार्जनाबरोबर अनेक शैक्षणिक उपक्रम, सातत्याने राबवत असून आपला विद्यार्थी शैक्षणिक व अन्य स्पर्धात्मक परीक्षांमध्ये कसा हिरिरीने भाग घेऊन जास्तीत जास्त गुणांनी कसा यशस्वी होईल याकडे त्यांचे सातत्याने लक्ष असते. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रोहा, केंद्रातील सर्व शिक्षक शिक्षिका, तसेच ग्रामस्थांनी विशेष अभिनंदन केले आहे.



## कोन ग्रामपंचायतीत घंटागाडीचे लोकार्पण

। रसायनी । प्रतिनिधी ।

ग्रुप ग्रामपंचायत कोन यांच्यावतीने गावातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने खरेदी करण्यात आलेल्या नवीन कचरा गाडीचे लोकार्पण गुरुवारी (दि.१२) रोजी पार पडले. हर्षदा अतुल घरत यांच्या हस्ते व ग्रामस्थांच्या साक्षीने हा सोहळा संपन्न झाला.



कार्यक्रमास अश्विनी जितेश शिसवे, निकिता आदेश घरत, सविता म्हात्रे, दिपक म्हात्रे, अक्षय घरत, साहिल म्हात्रे, धनराज बडे, निता म्हात्रे, अस्मिता गायकर, संजय जाधव, ताईबाई पाटील, अंजनी पाटील, रमेश तारेकर, जितेश शिसवे, अतुल घरत, कैलास म्हात्रे, नितीन म्हात्रे, आदेश घरत, संतोष गाताडे, मारुती घरत, आनंद कोंडिलकर, विनायक शिसवे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. गावातील घरोघरी निर्माण होणारा ओला व सुका कचरा वेळेवर व योग्य पद्धतीने संकलित व्हावा, गाव स्वच्छ, सुंदर व निरोगी राहावे, या उद्देशाने ही नवीन गाडी खरेदी करण्यात आली. स्वच्छ गाव - सुंदर गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे संयुक्त सहकार्य आवश्यक असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक घरत यांनी केले. ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

## वाकडाई देवी मंदिराचा वर्धापन दिन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या मौजे उतेखोल, उतेखोलवाडी येथील श्री वाकडाई देवी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य पालखी महोत्सवाचे आयोजन उतेखोलमध्ये शनिवार (दि.१४) रोजी करण्यात आले आहे. पालखी महोत्सवास सर्व भाविकांनी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहण्याचे अवाहन ग्रामस्थ व महिला मंडळातर्फे करण्यात आले आहे. यादिवशी वाकडाई देवी अभिषेक, वाकडाई देवी मंदिर ते हनुमान मंदिर पालखी मिरवणूक, देवीची महाआरती, असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

## स्वीकृत सदस्यपदी राजेश कोठारी, रोहित ओसवाल यांची निवड




। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदांच्या निवडणुकीची सभा संपन्न झाली. राष्ट्रवादी कॉंग्रेस -उद्धव सेना प्रणित परिवर्तन विकास आघाडीकडून राजेश कोठारी आणि शिवसेना-भाजपा -आरपीआय महायुतीकडून रोहित ओसवाल यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली होती. गुरुवारी(दि.१२) रोजी झालेल्या सभेत या दोघांची निवड करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. कर्जत नगरपरिषदेची २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाली होती.

मात्र, पावणे दोन महिने झाले तरी स्वीकृत नगरसेवकपद निवड, विविध समित्या सभापती, उपसभापती, सदस्य निवड झाली नव्हती. मात्र, गुरुवारी(दि.१२) रोजी नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली होती. त्यात राजेश कोठारी आणि रोहित ओसवाल यांची निवड जाहीर करण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी चव्हाण यांनी दोन्ही नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवकांना भारतीय संविधानाची प्रत सन्मानपूर्वक देण्यात आली.

याप्रसंगी उपगराध्यक्ष संतोष पाटील, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नगरसेवक किशोर कदम, अरुणा वायकर, संकेत भासे, कोयल कन्हेरीकर, अंजली कडू, महेंद्र चंदन, सुमिता गायकवाड, विजय हजारे, राधिका पवार, सुवर्णा जोशी, प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, नेहा शिंदे, रामदास गायकवाड, सुचिता खोत, कुमेश मोरे, जान्हवी देवघरे, अशोक राऊत, हर्षाली गायकवाड, मानसी कानिटकर उपस्थित होते.

नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करण्यासाठी पुंडलिक पाटील, दीपक श्रीखंडे, स्वप्नील पालकर, ॲड. संपत हडप, सुरेखा शितोळे, सायली शहासने, दिनेश जैन, महेश पटेल, कैलास पोटे, रंजन दातार, प्रभाकर करंजकर, सतीश पिंपरे, जयवंत म्हसे, उमेश गायकवाड, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रशांत उगले, रवींद्र कशेळीकर, विनोद पांडे, अमीर माणियार, शिवसेवक गुप्ता, गजानन पाटील, आण्णा घारे आदींसह व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राणीजन्य आजारांवर जनजागृती | पशु पालकांना स्वच्छता संच वितरण

। पाली । प्रतिनिधी ।

पंचायत समिती पाली सुधागड येथे मंगळवारी (दि.१०) फेब्रुवारी रोजी IC-R प्रकल्प -INP on One Health -pproach to Zoonotic Diseases अंतर्गत झुनॉटिक आजार (प्राण्यांपासून माणसांना होणारे व माणसांपासून प्राण्यांना होणारे आजार) एक दिवसीय जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रम मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई तसेच पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती, सुधागड, पाली, जिल्हा रायगड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात सुधागड तालुक्यातील ४३ लाभार्थ्यांना स्वच्छता संच वितरित करण्यात आले.



सदर कार्यक्रमास मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय मुंबई डॉ. शैलेश इंगोले, प्राध्यापक डॉ. रविंद्र झेंडे, डॉ. प्रशांत कांबळे, डॉ. सचिन देशपांडे, डॉ. अजय कांबळे, गट विकास अधिकारी सुधागड लता मोहिते यांनी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमासाठी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन खालापूर डॉ.अशोक गाढवे, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) सुधागड डॉ. सुयोग म्हस्कर यांनी झुनॉटिक आजारांविषयी जनजागृतीवर मार्गदर्शन केले. डॉ. विलास वैद्य, यांनी झुनॉटिक आजारांचे प्रतिबंध व नियंत्रण तसेच वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व यावर व्याख्यान दिले. डॉ. जगदीश गुडेवार व सहप्रकल्प प्रमुख यांनी सामान्य झुनॉटिक आजारवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पशुधन विकास अधिकारी पाली डॉ. नम्रता काठोळे, पशुधन पर्यवेक्षक युवराज सुरकुले, प्रकाश बुलबुले, पल्लवी भालेराव व वृशाली कदम यांनी मोलाचे योगदान दिले.

## रस्ता नुतनीकरणाच्या विलंबामुळे प्रवासी त्रस्त

**रेवदंडा:** साळाव ते तळेखार रस्ता नुतनीकरणास विलंब होत आहे. गेल्या वर्षभर सुरू असलेले रस्ता नुतनीकरणाचे काम पावसाळयापुर्वी पुर्ण होणे स्थानिक ग्रामस्थांना अपेक्षीत होते. परंतु अजूनही या रस्ताचे नुतनीकरणाचे काम पुर्ण झाले नसून रस्ता नुतनीकरणाच्या विलंबाने प्रवासीवर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे वतीने, नव्याने करण्यात येत आहे. सदर रस्ता नुतनीकरणाचे काम लवकरात लवकर मार्गी लावावे अशी मागणी स्थानिक व प्रवासीवर्ग करत आहेत.

## रोह्यात चोरीच्या पार्श्वभूमीवर गस्त वाढविण्याची मागणी

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहे शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात घरफोडी व चोरीच्या सतत घटना घडत असल्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. या चोरीच्या घटना रोखण्यासाठी रोह्यातील पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांची भेट घेऊन या भेटीत वाढत्या गुन्हेगारी घटनांबाबत चिंता व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली असून या संदर्भात लेखी निवेदन देण्यात आले आहे.

या शिष्टमंडळात अमित घाग, रोशन चाफेकर, सचिन मोरे, वैभव कुलकर्णी, दिपक मोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



भेटीदरम्यान रोहा शहर व तालुक्यातील काही भागांमध्ये घडलेल्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या भावनेबाबत पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. रात्रीची गस्त अधिक प्रभावी करणे, संशयितांवर विशेष लक्ष ठेवणे,

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

सीसीटीव्ही कॅमेरे फुटेजची बारकाईने तपासणी करणे तसेच संवेदनशील भागात अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी या प्रकरणांचा तपास वेगाने सुरू असून डॉग स्क्वाड व तांत्रिक पथकाच्या मदतीने तपासाची प्रक्रिया गतीमान करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच नागरिकांच्या सहकार्याने आरोपींना लवकरात लवकर जेरबंद करण्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी रोहा पोलीस प्रशासनाकडून तातडीने आणि जबाबदारीने सुरू असलेल्या कारवाईचे शिष्टमंडळाने कौतुक केले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

दरम्यान, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहावे, संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित ११२ या हेल्पलाईनवर किंवा स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. रोहा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज असून गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### शिक्षणतज्ज्ञांच्या माध्यमातून प्रशिक्षकांना प्रशिक्षण | आगामी शैक्षणिक वर्षात आणखी योजना

## भिवपुरीत विद्यार्थ्यांची जागरुकता

। उरण । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुभवात्मक विज्ञान शिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, टाटा पॉवरने भिवपुरी परिसरातील गौलवाडी शाळेत एक समर्पित विज्ञान केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक वर्गखोल्यांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृतीद्वारे विज्ञान शिकण्याच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. टाटा पॉवरच्या या सामाजिक उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

विज्ञान केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत ५५० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले असून विविध शाळांमध्ये विज्ञानविषयक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक दिवस व महिन्यांपर्यंत चालणाऱ्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील संकल्पना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समजावून देण्यात येत आहेत. आगामी शैक्षणिक वर्षात हा उपक्रम आणखी विस्तारण्याची योजना कंपनीने आखली आहे.



गौलवाडी शाळेत कार्यरत असलेले हे विज्ञान केंद्र इयत्ता ६ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांसाठी असून येथे विज्ञान मॉडेल्स, प्रयोग किट्स, प्रात्यक्षिक साधने तसेच संवादात्मक शिकण्याची संसाधने उपलब्ध करून देण्यात आली. केंद्र प्रयोग आणि शोधाचे केंद्र म्हणून कार्य करते, जिथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शित कृतींच्या माध्यमातून वैज्ञानिक संकल्पना अधिक प्रभावीपणे समजून घेता येतात.

या उपक्रमाचा दीर्घकालीन आणि शाश्वत प्रभाव सुनिश्चित करण्यासाठी, भागीदार संस्था आणि शिक्षणतज्ज्ञांच्या माध्यमातून शिक्षक आणि प्रशिक्षकांना देखील प्रशिक्षण देण्यात आले आहे. आधुनिक अध्यापन पद्धती आणि प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकवण्याच्या तंत्रांचा वापर करून वर्गात अनुभवाधारित विज्ञान शिक्षण सुरू ठेवण्यास त्यांना सक्षम करण्यात आले आहे.

नियमित शैक्षणिक प्रक्रियेत व्यत्यय न आणता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, शाळेच्या वेळापत्रकानुसार सकाळी आणि दुपारी अशा दोन सत्रांमध्ये वर्गांचे आयोजन करण्यात येते, कायमस्वरूपी पायाभूत सुविधा, मोबाइल पोहोच उपक्रम आणि शिक्षक क्षमतावृद्धी यांचा समन्वय साधून, टाटा पॉवर ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी समावेशक आणि विस्तारक्षम शिक्षण परिसंस्था निर्माण करत आहे. यामुळे शैक्षणिक दरी कमी होत असून ग्रामीण विद्यार्थ्यांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सक्षम केले जात आहे.

टाटा पॉवर समावेशक आणि विस्तारक्षम शिक्षण परिसंस्था निर्माण करत आहे. यामुळे शैक्षणिक दरी कमी होऊन विद्यार्थ्यांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सक्षम केले जात आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. दिलासादायक घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : स्वमताग्रह टाळायला हवा. महत्त्वाची कामं तुर्तास लांबणीवर पडतील. मानसिक अस्वास्थ राहील.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. लेखी करारात पुरेशी काळजी घ्यावी. व्यवसायात प्रगती होईल.
- **कर्क** : सरकारी कामं मनाजोगी होतील. आप्तेष्टांच्या भेटीने समाधान लाभेल. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **सिंह** : नव्या विचारांना चालना मिळेल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कन्या** : रखडलेल्या योजना मार्गी लागतील. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. विद्यार्थ्यांचा विकास होईल.
- **तूळ** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. परिश्रमाचा योग्य मोबदला मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे करार विचारानं करावेत. उपजत कला-गुणांचा विकास होईल. उष्णतेचा त्रास संभवतो.
- **धनु** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. विचारांची दिशा योग्य राहील. गैरसमजाबाबत काळजी घ्या.
- **मकर** : मोठ्या खरेदीचे बेत सफल होतील. ताण-तणाव दूर झाल्याने समाधान लाभेल. चिंता नसावी.
- **कुंभ** : इतरांना विचारपूर्वक सल्ला द्या. भागीदारी व्यवसायात वाद-विवाद संभवतात. प्रकृतीची काळजी घ्या.
- **मीन** : आजचा दिवस व्यवसायवृध्दीचा राहील. आर्थिक आवक समाधानकारक राहील. प्रगती होईल.

## दिनविशेष

### १३ फेब्रुवारी

**२०१३** : 'सेबी'ने 'सहारा' समूहाची बँक खाती गोठवण्याचे आदेश दिले.

**२०१४** : निवडणूक आयोगाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना चाळीस लाख रुपये खर्च करण्याची मुभा दिली.

**२०१८** : वाढत्या दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या तिन्ही दलांसाठी १५ हजार ९३५ कोटींची शस्त्रास्त्रं खरेदी करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

## आरोग्यमंत्र

### हे चक्रही जाणून घ्या

जैविक घड्याळ ही संकल्पना रुढ असून सजीवांचा मूळ घटक असणाऱ्या पेशींही याचं पालन करत असतात. हे घड्याळ नसतं तर फुलं दिवसाच्या विशिष्ट वेळेलाच कशी फुलली असती, फळझाडांना विशिष्ट ऋतूतच मोहर कसा आला असता, प्राण्यांचा विणीचा हंगाम विशिष्ट दिवसांपुरताच कसा राहिला असता? हे घड्याळ आहे म्हणूनच आपल्याला विशिष्ट वेळेसच झोप येते. झोपेतूनही विशिष्ट वेळेसच जाग येते. या सगळ्यामागील कारण म्हणजे आपण राहतो त्या वातावरणाचाही नैसर्गिक ताल असतो. दिवस-रात्रीचं चक्र आपल्या ओळखीचं आहेच त्याचबरोबर निरनिराळ्या ऋतुंचंही चक्रही पर्यावरणात नांदत असतं. या चक्राशी जुळवून घेण्यानंच जगणं अधिक सुसह्य होतं, हे सजीव फार पूर्वीच शिकले आहेत. उत्क्रांतीच्या ओघात जुळवून घेण्याची ही प्रक्रिया अंगी रुजली आहे. त्यामुळे आपल्या अनेक शरीरक्रियाही अशाच प्रकारे चक्राकार होत असतात.



झोप, भूक यासारख्या शरीरक्रियांमधील ताल आपल्या माहितीचाच आहे. त्याचबरोबर शरीराचं तापमान, रक्तदाब, संप्रेरकांचा पाझर हाही या तालानुसार होत असतो. वैज्ञानिकांनी यालाच 'सर्केडियन ऱ्हीदम' असं नाव दिलं आहे. आपण याला एक दिवसाचं चक्र म्हणू शकतो. याव्यतिरिक्त एका दिवसाहून कमी कालावधीचंही चक्र असतं तसंच दिवसाहून अधिक कालावधीचंही चक्र असतं. त्याचीही माहिती घेणं आवश्यक ठरतं.

## हेल्थ वेल्थ

### असं जपा आरोग्य

✲ खाण्याच्या प्रमाणावरही लक्ष द्या. एखादा पदार्थ खा. सँडविच किंवा बर्गर खूप मोठं असतं. त्यामुळे ते शेअरही करता येईल. मित्र-मैत्रिणींसोबत गेला असाल तर पदार्थ वाटून खा.

✲ कोल्डड्रिंक, भरपूर साखर घातलेले फळांचे रस, एनर्जी ड्रिंक अजिबात पिऊ नका. त्याऐवजी पाणी किंवा लो कॅलरी दूध प्या.

✲ रेस्टॉरंटमध्ये खाताना विशेष काळजी घ्या. एका प्लेटमध्ये खूप जास्त अन्न येतं. त्यामुळे एकाच वेळी भरपूर मागवू नका. विविध प्रकारची सॅलड्स किंवा सँडविचमध्ये सॉस घातले जातात. त्यातही बऱ्याच कॅलरी असतात. त्यामुळे सॉस वेगळे ठेवायला सांगा. आवश्यकतेनुसार खा.

✲ बटर किंवा मार्गारिनऐवजी ऑलिव्ह ऑईलममधले पदार्थ खा. बेक, ग्रील किंवा उकडलेले पदार्थ खा. तळकट पदार्थांपासून लांब रहा. फ्रेंच फ्राइजऐवजी स्टार्टर म्हणून सॅलड्स मागवा. अशा प्रकारे बाहेरचं खातानाही आपलं आरोग्य जपता येईल.

## स्टाईल स्टेटमेंट

### स्टायलिश बॉटम्स

कुर्तीसोबत आपण सलवार किंवा लेगिंग्ज घालतो. ही फॅशन कायमस्वरूपी टिकणारी असली तरी सध्या विविध प्रकारच्या बॉटम्सचा ट्रेंड आहे. एकापेक्षा एक हटके बॉटम्स खूप छान दिसतात. यामुळे एकच कुर्ती वेगवेगळ्या स्टाईलने कॅरी करता येते. ऑफिस असो किंवा लग्न समारंभ, या ट्रेंडी बॉटम्स तुम्ही कुठेही कॅरी करू शकता. कुर्तीवर घालता येण्यासारखे बॉटम्सचे विविध पर्याय...

✲ सध्या धोती पँटची खूप क्रेझ आहे. बॉलिवूडमधल्या बऱ्याच अभिनेत्री सध्या ही स्टाईल कॅरी करतात. त्यांच्याकडून स्टायलिंग टिप्स घेता येतील. कुर्तीला साजेशी धोती पँट शिवून घेता येईल. तयार धोती पँटचा पर्यायही आहे. या पँटवर लाँग किंवा शॉर्ट कुर्ती घालता येईल. यावर अनारकली स्टाईल शॉर्ट कुर्ती खूप छान दिसेल. **(क्रमशः)**

## पंचांग

**शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६**

विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, माघ कृ. ११, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : मूळ, योग : वज्र, सूर्योदय ७.१०, सूर्यास्त ६.३६

## फॉरवर्डस

**कारीगर हूं साहेब, शब्दों की मिट्टी से महफ़िल सजाता हूँ...**

**किसी को बेकार, किसी को लाजवाब नज़र आता हूँ...!**

## फॅशन पॅशन

मित्रांनो, राउंड नेक टी-शर्ट घालून कंटाळला असाल तर पोलो शर्टचा पर्याय निवडायला हरकत नाही. पोलो शर्ट म्हणजे टी-शर्टचं क्लासी व्हर्जन. हे शर्ट देखील तितकेच कॅज्युअल आणि आरामदायी असतात. एकीकडे राउंड नेक टी-शर्ट फक्त कॅज्युअल ऑकेजन्सना शोभून दिसत असताना बऱ्यापैकी फॉर्मल वाटणारा पोलो शर्ट मात्र कुठेही घालता येतो. स्टायलिश असल्याने राउंड नेकच्या तुलनेत पोलो शर्टची सध्या चलती आहे. कोणत्याही बॉटमवर मॅच होणं ही याची खासियत. वेगवेगळ्या पद्धतींनी पोलो शर्ट कसा कॅरी करायचा याविषयी... **(क्रमशः)**

## सल्ला मोलाचा

### लाभदायी शॉपिंगचा कानमंत्र

स्त्रियांना खरेदीची उपजत आवड असते. त्यामुळे त्या सतत काही ना काही कारणांसाठी शॉपिंगसाठी बाहेर पडत असल्याचं पहायला मिळतं. खरं तर खरेदी करणं ही मुळात एक कला आहे. खरेदीची म्हणजे शॉपिंगची कला कशी विकसित करायची याविषयी...

✲ बरेच लोक रविवारी किंवा इतर सुट्टीच्या दिवशी खरेदीला बाहेर पडतात. फिरण्यासाठी किंवा फॅशनविश्वातले नवे ट्रेंड्स समजून घेण्यासाठी हा दिवस योग्य असला तरी खरेदी करण्यासाठी इतर दिवशी बाहेर पडायला हवं.

✲ योग्य फिटिंगचे कपडे खरेदी करणं खूप आवश्यक असतं. सहज म्हणून कपड्यांची खरेदी करायची आणि घरी आल्यावर ते सैल झाले तर बदलून आणणं जीवावर येतं. त्यामुळे कपडे खरेदी करण्याआधी ते घालून बघावे. म्हणून ट्रायल रुम असणाऱ्या दुकानातूनच खरेदी करा.

✲ नियमित वापरासाठी कपड्यांची खरेदी करणार असाल तर ड्राय क्लीन करायला लागणाऱ्या कपड्यांऐवजी घरी धुता येण्यासारखे आणि कमी देखभालीची गरज असणारे कपडे घ्या.

✲ दागिन्यांची खरेदी करताना नेमकं काय घ्यावं असा प्रश्न पडत असेल तर नव्या ट्रेंड्सची माहिती करून घ्या. मगच खरेदीसाठी बाहेर पडा. यामुळे तुमचा वेळ वाचेल. खरेदीही झटपट होईल आणि मनपसंत वस्तू घरी आणता येईल.

## खेचाखेची

### करायला गेलो भलं

काल वडिलांना मी फॉरेक्स ट्रेडिंग आणि क्रिप्टो करन्सीबद्दल अभ्यासपूर्ण माहिती सांगितली.

.

.

.

आज वडिलांनी माझ्या नावावर असलेलं ५ एकर शेत आपल्या नावावर करून घेतलं.

## वेगळं काही

अमेरिकेतल्या शिकागोमधल्या 'इलिनोइस' विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी अनोखं कृत्रिम पान तयार केलं आहे. हे पान नैसर्गिक पानांच्या तुलनेत दहापट जास्त ऑक्सिजनची निर्मिती करेल, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे. इतकंच नाही, तर इंधनासाठी दहापट अधिक चांगला कार्बन मोनॉक्साइडही तयार करेल. कृत्रिम पानाचं कामही नैसर्गिक पानाप्रमाणेच चालतं. झाडांची पानं सौर ऊर्जा, कार्बन डायॉक्साइड आणि पाण्याच्या माध्यमातून 'फोटो सिंथेसिस' प्रक्रियेद्वारे कार्बोहायड्रेट आणि ऑक्सिजन तयार करतात. सध्या या कृत्रिम पानापासून प्रयोगशाळेतच ऑक्सिजन आणि इंधननिर्मिती केली जात असली तरी भविष्यात बाहेरही हे शक्य होईल, असं शास्त्रज्ञ सांगतात. **(क्रमशः)**

## सौंदर्यसाधना

### लाभ कोरीयन उपचारपध्दतीचे

विविध संस्कृतींमध्ये सौंदर्यसाधनेच्या वेगवेगळ्या पद्धती आढळतात. उपयुक्तता समजल्यानंतर त्या जगभर लोकप्रिय होतात. याच धर्तीवर लोकप्रियतेच्या निकषावर खरी उतरलेली एक पद्धती म्हणजे कोरीयन उपचारपद्धती. यात सौंदर्यवर्धनासाठी व्होल्कॅनिक अॅशचा वापर केला जातो. व्होल्कॅनिक अॅश हा खनिजांनी समृद्ध असलेला मातीसारखा एक प्रकार आहे. यामुळे त्वचा आतून आणि बाहेरून स्वच्छ होते. त्वचेतलं तेल, धूळ, मळ काढून टाकण्याची क्षमता या अॅशमध्ये असते. ही अॅश जंतूनाशक आहे. विविध उत्पादनांमध्ये तिचा वापर केला जातो. व्होल्कॅनिक अॅश पाण्यामध्ये विरघळत नाही. फेसवॉश, फेस स्क्रब्ज, फेस पॅक्समध्ये तिचा वापर केला जातो. तेलकट आणि मुरमं असणाऱ्या त्वचेसाठी ही अॅश वरदान ठरू शकते. फूट आणि बॉडी स्क्रब्जमध्ये तिचा वापर केला जातो. या अॅशमुळे त्वचा स्वच्छ होते, मृत पेशी दूर होतात आणि त्वचा तजेलदार आणि सतेज दिसते. ही अॅश आठवड्यात दोनदा वापरली तरी तुम्हाला फरक जाणवेल. त्यामुळेच या पर्यायाचा अवलंब करा आणि त्वचेचं सौंदर्य द्विगुणीत करा.



## सुडोकू ६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ६ | | | | | |
| | | ९ | १ | २ | | | | |
| | | | | | | ३ | ६ | |
| ६ | | | २ | ३ | ४ | | ८ | ७ |
| १ | | | | ६ | | | | २ |
| २ | ७ | | ८ | २ | ९ | | | ५ |
| | ८ | ३ | | | | | | |
| | | | | ४ | १ | ९ | | |
| | | | | | ६ | | | ३ |

**टीप -**

✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | ८ | ९ | १ | ५ | ४ | ३ | ६ |
| १ | ३ | ४ | ६ | ८ | २ | ९ | ५ | ७ |
| ५ | ९ | ६ | ७ | ३ | ४ | २ | १ | ८ |
| २ | ५ | ७ | ८ | ६ | १ | ३ | ४ | ९ |
| ८ | ४ | १ | २ | ९ | ३ | ६ | ७ | ५ |
| ९ | ६ | ३ | ५ | ४ | ७ | १ | ८ | २ |
| ३ | ७ | २ | १ | ५ | ६ | ८ | ९ | ४ |
| ४ | ८ | ५ | ३ | २ | ९ | ७ | ६ | १ |
| ६ | १ | ९ | ४ | ७ | ८ | ५ | २ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक ६३

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ५ | ६ | ■ | ७ | ८ | | ■ |
| ९ | | ■ | १० | | | ■ | ११ | | १२ | | | ■ | १३ |
| १४ | | १५ | | ■ | १६ | १७ | | ■ | | ■ | १८ | | |
| | ■ | | ■ | १९ | | | ■ | २० | | २१ | | ■ | |
| ■ | २२ | | २३ | ■ | २४ | | | | ■ | | ■ | २५ | ■ |
| २६ | | ■ | २७ | २८ | ■ | | ■ | २९ | ३० | ■ | ३१ | | ३२ |
| ३३ | | ३४ | ■ | ३५ | ३६ | ■ | ३७ | | | ३८ | | ■ | |
| ■ | ३९ | | ४० | ■ | ४१ | | | ■ | ४२ | | | ■ | |
| ४३ | ■ | ४४ | | ४५ | | ■ | ४६ | | ■ | | ■ | ४७ | ■ |
| ४८ | ४९ | | ■ | | ■ | ५० | | ■ | ५१ | | | | |
| ■ | ५२ | | ५३ | | ५४ | | ■ | ५५ | | | ■ | | ■ |
| ५६ | ■ | ५७ | | ■ | | ■ | ५८ | ■ | | ■ | ५९ | | ■ |
| ६० | | | ■ | ६१ | | | | ■ | ६२ | | | ■ | ६३ |
| | ■ | | | ६४ | | ■ | ६५ | | | ■ | ६६ | | |

**आडवे शब्द :-**

१) तात्पर्य, सारांश

३) संपत्ती, पैसाअडका

७) संथगतीने चालणारा उभयचर प्राणी

९) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ

१०) शोभा, सौंदर्य

११) कायद्याप्रमाणे

१४) जपतप

१६) तमाशातील शृंगार गीत

१८) जंगल

१९) नोकरी नसलेला, निरुपयोगी

२०) वर्षाच्या बोलीने नेमलेला शेतमजूर

२२) खराब, चांगलेच्या विरुद्ध

२४) बारीक झणझण

२६) जननी

२७) अर्धी ओंजळ

२९) लबाडीचा हेतू

३१) रात्री प्रकाशित होणारा किटक

३३) नेहमी, नित्य

३५) वचक, दरारा

३७) घराचा मागचा दरवाजा

३९) दृष्टी

४१) विजयादशमी

४२) रमविणारा, पती

४४) झटकन, त्वरेने

४६) भीती

४८) तांदळाची एक जात

५०) किंमत, निष्ठा

५१) स्वार्थी, मतलबी

५२) कारखान्याचा मालक

५५) बदल

५७) चामखीळ

५९) वाळवंट

६०) नौका, आगबोट

६१) नादी लावणे

६२) आवडता, प्रिय

६४) हात

६५) हत्तीचा छावा

६६) कळलाव्या मुनी.

**उभे शब्द:-**

१) भावाची बायको

२) वितरण

३) पैसा

४) नकलाकार

५) लसूणाची पाकळी

६) शरीर

७) बनारस

८) मंत्रीमंडळ

१०) चांदी, रजत

१२) अडत्या

१३) जन्म

१५) मुलीचा नवरा

१७) वरपांगी

२०) कर्ज देणारा

२१) न्याय

२२) खिडकी, गवाक्ष

२३) गाडीचे छत

२५) संध्याकाळ

२६) एक सुगंधी वनस्पती

२८) निष्कपटी, छक्केपंजे नसलेला, सोपा

३०) दिवस

३१)सबब

३२) वितरण

३४) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास

३६) मान, प्रतिष्ठा

३७) पराजय

३८) मूळ रकमेच्या डबल

४०) ध्वनी, आवाज, नाद

४३) छिद्र

४५) अर्धवर्तुळाकार

४७) उपास

४९) संधी

५०) वजन, बोजा

५१) फार मोठा फायदा

५३) विशेष

५४) दावा लावणारा, शत्रू

५६) शोभणारा

५८) गणपतीचे एक नाव

५९) वर्तमानपत्रातील कप्पा, खण

६१) श्वसनेंद्रिय

६३)आनंद, हर्ष

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | र्धां | गी | ■ | न | ग | र | से | व | क | ■ | भा | स्क | र |
| र्ध | ■ | त | ज | वी | ज | ■ | ना | र | ळ | पा | क | ■ | वि |
| सा | म्य | ■ | य | ■ | रा | वा | ■ | प | सा | रा | ■ | द | वा |
| म्रा | ■ | सा | ज | रा | ■ | स | म | क्ष | ■ | वा | रं | वा | र |
| हि | मा | ल | य | ■ | भा | र | त | ■ | क | र | ■ | खा | ■ |
| क | ल | ■ | वं | द | न | ■ | दा | द | ला | ■ | म | ना | ई |
| ■ | दा | ■ | ती | र | ■ | खा | र | ■ | का | र | ण | ■ | श्व |
| म | र | वा | ■ | वा | जं | त्री | ■ | स | र | ण | ■ | प | र |
| हा | ■ | क | ब | जा | ■ | ला | गी | र | ■ | बा | ज | री | ■ |
| म | ठ | ■ | ल | ■ | सा | य | ■ | वा | स | व | ■ | क्षा | र |
| हो | ■ | स | क | ल | ■ | क | स | ■ | व | रा | त | ■ | क्ष |
| पा | ळ | त | ■ | व | र्ण | ■ | र | ज | त | ■ | पा | त | क |
| ध्या | ■ | त | ब | क | ■ | ख | ब | र | ■ | क | स | र | ■ |
| य | क्ष | ■ | क | र | क | री | त | ■ | ता | ट | ■ | ट | प |

# निवडक

## अभिषेक शर्माला रुग्णालयातून डिस्चार्ज



**नवी दिल्ली :** टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत टीम इंडियाने विजयाने सुरूवात केली. पहिल्याच सामन्यात भारताने अमेरिकेला पराभूत केलं. या सामनयात अभिषेक शर्माकडून फार अपेक्षा होत्या. मात्र पहिल्याच सामन्यात त्याला खातंही खोलता आलं नाही. पण त्याची तब्येत बिघडल्याने क्रीडाप्रेमीची धाकधूक वाढली आहे. कारण स्पर्धा नुकतीच सुरू झाली आहे. त्यात अभिषेक शर्मासारखा बुरूज ढासळणं टीम इंडियासाठी चांगली गोष्ट नाही. अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात क्षेत्ररक्षण करताना त्याला अस्वस्थ वाटू लागलं. पोटात गडबड जाणवत असल्याने त्याने मैदान सोडलं. त्यानंतर मैदानात क्षेत्ररक्षणासाठी उतरलाच नाही. त्यानंतर त्याला थेट रूग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. त्यामुळे लवकर बरा होईल ना अशी चिंता क्रीडाप्रेमींना लागून होती. अभिषेक शर्माला रुग्णालयातून डिस्चार्ज दिला गेला आहे. अभिषेक शर्माला डिस्चार्ज दिला असला तरी दुसऱ्या सामन्यात खेळेल की नाही हे स्पष्ट नाही. नामिबियाविरुद्ध भारताचा दुसरा सामना आहे. या सामन्यानंतर भारताचा सुपर ८ फेरीचा मार्ग खुला होणार आहे. त्यामुळे या सामन्यात काहीही करून मोठा विजय अपेक्षित आहे.

## भवानी नडगांव येथे क्रिकेटचा महासंग्राम!

**मुंबई :** महाड तालुक्यातील भवानी नडगांव येथील कला, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या तरुण मित्र मंडळ आणि भवानी नडगांव क्रिकेट संघ यांच्या पुढाकाराने भवानी नडगांव ग्रामस्थ मंडळ, मुंबई मंडळ, महिला मंडळ यांच्या सहकार्याने गेली ९ वर्ष सातत्याने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करत आहे. यंदाचे १० वे वर्ष असून सदर स्पर्धा भैरी भवानी क्रीडा संकुल भवानी नडगांव या ठिकाणी दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी एकदिवसीय कालावधीत हा क्रिकेटचा थरार रंगणार असून, परिसरातील क्रिडाप्रेमींसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे. एक गाव एक संघ स्वरुपात ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण २४ संघांदरम्यान सामने आयोजित करण्यात आले आहेत.सदर स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय विजेत्या संघाला पारितोषिकांसोबत एक आकर्षक चषक देखील देण्यात येणार असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या व्यतिरिक्त, सामन्यांमध्ये मालिकवीर, उकृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांची निवड करून आकर्षक चषक देण्यात येणार असून आयोजकांच्या माध्यमातून अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली असल्याचे तरुण मंडळाचे अध्यक्ष मयुर बैकर व भवानी नडगाव क्रिकेट संघाचे कर्णधार अमर बैकर यांनी सांगितले.

## रोहित शर्मा विश्वचषक खेळण्यासाठी तयार

**दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माने त्याच्या एकदिवसीय भविष्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकातील त्याच्या सहभागाबद्दल रोहितने मोठे विधान केले आहे. टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झालेला रोहित आता केवळ एकदिवसीय फॉरमॅटमध्येच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळतो. २०२७ मध्ये जेव्हा विश्वचषक दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये सुरू होईल, तेव्हा रोहित ४० वर्षांचा असेल. तथापि, रोहितने स्पष्ट केले आहे की त्याचे ध्येय अजूनही संघासोबत विश्वचषक ट्रॉफी उचलणे आहे आणि तो यासाठी स्वतःला तंदुरुस्त ठेवण्यासाठी कठोर परिश्रम करण्यास तयार आहे.एका आयसीसी कार्यक्रमादरम्यान रोहित म्हणाला, मला निश्चितपणे तिथे जायचे आहे आणि माझ्या देशासाठी विश्वचषक जिंकायचा आहे. हे असे काहीतरी आहे जे मी नेहमी पाहिले आहे. मी ५० षटकांचा विश्वचषक पाहत मोठा झालो आहे. तेव्हा कोणताही टी-२० विश्वचषक किंवा आयपीएल नव्हते. हे क्रिकेटचे शिखर होते जे दर चार वर्षांनी होत असे, रोहित शर्माने आपली इच्छा व्यक्त करत सांगितले की, त्या एका ट्रॉफीसाठी खूप प्रतीक्षा आणि आतुरता होती. तो म्हणाला, मला ती ट्रॉफी हवी आहे, त्यामुळे मी माझ्या शक्ती आणि क्षमतेनुसार कठोर परिश्रम करून ती मिळवण्याचा पूर्ण प्रयत्न करेन. रोहित शर्मासाठी सर्वात मोठे आव्हान वय आणि फिटनेस असेल. २०२७ पर्यंत त्यांचे वय ४० च्या पुढे जाईल. क्रिकेट तज्ञांचे मत आहे की, रोहित ज्या फॉर्ममध्ये आहे, जर त्याने आपली फिटनेस कायम ठेवली, तर २०२७ मध्ये तो भारतासाठी सलामीची जबाबदारी सांभाळू शकतो. सध्या त्यांचे पूर्ण लक्ष २०२५ मध्ये होणारी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि त्यानंतरच्या वर्ल्ड कपच्या रोडमॅपवर आहे.

## राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये मनमाडचा डंका

**नाशिक:** उत्तर प्रदेशातील मोदी नगरात नाशिक जिल्ह्यातील मनमाडच्या खेळाडुंनी आपल्या कामगिरीचा डंका वाजविला आहे. मनमाडच्या खेळाडुंकडून अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली आहे. मोदी नगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये मनमाडचे खेळाडू चांगली कामगिरी करतील, असा विश्वास प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांनी केला होता. त्याप्रमाणे मनमाडच्या खेळाडुंनी एक सुवर्णपदक, रौप्यपदक आणि कांस्यपदकाची नोंद केली आहे. महाराष्ट्रात वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात आपला दबदबा निर्माण करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील मनमाडने पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला आहे. उत्तर प्रदेशातील मोदीनगर येथे ४ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय युथ ज्युनिअर आणि सिनिअर वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप सुरु आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या संघात मनमाडच्या सहा खेळाडुंचा समावेश आहे. मनमाडसाठी ही गौरवास्पद बाब मानली जाते. वेटलिफ्टिंगसारख्या काहीशा त्रासदायक खेळाकडे मुलांना आणि त्यांच्या पालकांना आकर्षित करणे, खरोखरच दिव्य मानावे लागेल. त्यातही असे प्रयत्न मनमाडसारख्या ग्रामीण भागात होत असतील तर त्यांच्या या प्रयत्नांना निश्चितच दाद द्यावयास हवी. प्रतिकूल परिस्थितीत वेटलिफ्टिंग हा क्रीडा प्रकार मनमाडमध्ये रुजविणे आणि तो बहरात आणणे, अशी कामगिरी प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# वेस्ट इंडिजने इंग्लंडला नमवले



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि वेस्ट इंडिज हे दोन माजी वर्ल्ड कप विजेते संघ समोरासमोर आल्यावर चुरस पाहायला मिळणे अपेक्षित होतेच. वेस्ट इंडिजने बुधवारी ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील दुसऱ्या विजयाची नोंद करताना इंग्लंडला पराभूत केले. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर चौकार-षटकारांचा पाऊस पाहायला मिळाला, परंतु विंडीजचा संघ वरचढ ठरला. या विजयासह वेस्ट इंडिज क गटात ४ गुणांसह अव्वल स्थानी पोहोचला आहे, तर इंग्लंड तिसऱ्या स्थानी कायम राहिला आहे. आजच्या सामन्याने क गटातील चुरस रंगतदार झाली आहे. स्कॉटलंडही २ गुणांसह ८ च्या शर्यतीत आहे. त्यामुळे इंग्लंड वि. स्कॉटलंड हा सामना नॉक आऊट बनला आहे.

ब्रेंडन किंग आणि कर्णधार शे होप यांना स्वस्तात बाद केल्यानंतरही इंग्लंडसमोर आव्हानात्मक लक्ष्य ठेवण्यात वेस्ट इंडिजला यश आले. शिमरोन हेटमायर व रॉस्टन चेस यांच्या खेळीने विंडीजला सावरले. त्यानंतर शेर्फाने रुथरफोर्ड व जेसन होल्ड या जोडीने इंग्लंडला धक्के दिले. रुथरफोर्डने आधी रोव्हमन पॉवेल सह २९ चेंडूंत ५१ धावांची भागीदारी केली. नंतर होल्डरसह ३२ चेंडूंत ६१ धावा जोडल्या. जोसेफ १७ चेंडूंत १ चौकार व ४ षटकार खेचून ३३ धावांवर शेवटच्या षटकात झेलबाद झाला. रुथरफोर्डने ४२ चेंडूंत २ चौकार व ७ षटकारांचा पाऊस पाडून ७६ धावांची नाबाद खेळी केली. विंडीजने ६ बाद १९६ धावा केल्या.

इंग्लंडच्या आदिल राशीदने प्रभावी गोलंदाजी करताना ४ षटकांत १६ धावा देत २ विकेट्स घेतल्या. जेमी ओव्हरटननेही ३३ धावांत २ बळी टिपले. फिल सॉल्टने १४ चेंडूंत ३० धावा चोपून इंग्लंडला दमदार सुरुवात करून दिली. रोमारियो शेफर्डने चौथ्या षटकात त्याची विकेट घेतली. रॉस्टन चेसने त्याच्या पहिल्या षटकात जॉस बटलरला बाद केले. विंडीजने त्यांच्या फिरकीपटूचा सुरेख वापर केला आणि गुदाकेश मोतीने दोन धक्के देताना जेकब बेथेल व टॉम बँटन यांना बाद करून सामन्याचे चित्र पालटले. सॅम कुरन व हॅरी ब्रूक ही जोडी डोकं वर काढत होती, परंतु गुदाकेशने इंग्लंडला आणखी एक धक्का दिला. ब्रूक गुदाकेशला सोपा झेल देऊन बसला. गुदाकेशने ४ षटकांत ३३ धावांत ३ बळी टिपले. रॉस्टन चेसने पुढच्या षटकात विल जॅक्सला पायचीत करून इंग्लंडची कोंडी केली. जॅक्सची विकेट पडली तेव्हा इंग्लंडला ३२ चेंडूत ६३ धावा हव्या होत्या. अकील होसैनने इंग्लंडला सातवा धक्का देताना जेमी ओव्हरटनलाबाद केले, रोव्हमॅन पॉवेलने सीमारेषेवर चतुराईने कॅच टिपला.

इंग्लंडला १८ चेंडूंत ४७ धावा हव्या असताना १८व्या षटकात जेसन होल्डरने स्वतःच्याच गोलंदाजीवर जोफ्रा आर्चरला नॉन स्ट्राईक एंडवर डायरेक्ट हिटद्वारे रन आऊट केले. १२ चेंडूत ३७ धावा हव्या असताना शेमार जोसेफने १९ व्या षटकात सलग दोन चेंडू निर्धाव टाकले. तिसऱ्या चेंडूवर लिएम डॉसन रन आऊट झाला. जोसेफने त्या षटकात ६ धावा देताना दोन विकेट्स मिळवल्या. विंडीजचा संपूर्ण संघ १९ षटकांत १६६ धावांत तंबूत परतला आणि १० वर्षांनी वर्ल्ड कपमध्ये विंडीजने इंग्लंडवर विजय मिळवला. विंडीजने ३० धावांनी हा सामना जिंकला.

# दादरमध्ये 'समर्थ' चा जयघोष

- शतकोत्तर वर्षात दमदार क्रीडा जल्लोष!
- ३० व्या समर्थ खो-खो शिबिरात सुवर्णसंधी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

दादरच्या क्रीडांगणावर पुन्हा एकदा जोश, जिद्द आणि जाज्वल्य परंपरेचा संगम रंगणार आहे. भारतातील अग्रगण्य क्रीडा संस्था असलेल्या श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादरने शतकोत्तर वर्षात पदार्पण करताना क्रीडाप्रेमींसाठी आणली आहे खास मेजवानी. ३० वे समर्थ खो-खो शिबीर! खो-खोच्या मैदानावर शिस्त, चपळता आणि संघभावनेचा अनोखा संगम अनुभवण्याची सुवर्णसंधी यंदाही खेळाडूंना मिळणार आहे.

श्री समर्थ व्यायाम मंदिर ही केवळ संस्था नसून भारतीय क्रीडा क्षेत्रातील एक प्रेरणादायी पर्व आहे. खो-खो क्षेत्रातील नामांकित संघ म्हणून समर्थची देशभरात ओळख आहे. संस्थेतील खेळाडू व प्रशिक्षकांनी पद्मश्री पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, क्रीडा संघटक शिवछत्रपती पुरस्कार, एकलव्य पुरस्कार, वीर अभिमन्यू पुरस्कार अशा मानाच्या सन्मानांनी गौरव प्राप्त केला आहे. या तेजस्वी परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

### खो-खो शिबिराचे आयोजन व वेळापत्रक

३० वे समर्थ खो-खो शिबीर हे मंगळवार दि. १७ ते गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. समर्थ क्रीडा भवन पटांगण, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, दादर (पश्चिम), मुंबई येथे हे शिबीर सायंकाळी ७ ते ८ या कालावधीत शिबिरार्थ्यांना संस्थेचे राष्ट्रीय व राज्य पातळीवरील खेळाडू मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरार्थींना प्रामुख्याने खो खो, लंगडी, शरीरतापन, सूर्यनमस्कार, आसने इत्यादी शिकविले जाणार आहे. या कालावधीत राष्ट्रीय व राज्य स्तरावरील समर्थचे अनुभवी खेळाडू शिबिरार्थींना थेट मार्गदर्शन करणार आहेत. तसेच खो खो सह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर या शिबिरास भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत.

# क्रिकेट प्रेमींच्या जीवाशी खेळ


- उरलेलं कोल्ड्रिंक पुन्हा बाटल्यात भरल्याचा प्रकार
- दिल्लीतील स्टेडियमचा व्हिडिओ व्हायरल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली सध्या आयसीसी टी २० विश्वचषकाची स्पर्धा सुरु आहे. मात्र, दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियमवर एक संतापजनक प्रकार समोर आला असून, याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. स्टेडियममधील खाद्यपदार्थ आणि पेये विक्री करणाऱ्या केंद्रावर उरलेले शीतपेय पुन्हा बाटल्यांमध्ये भरून विकले जात असल्याचा खळबळजनक आरोप एका प्रेक्षकाने केला आहे.

१० फेब्रुवारी रोजी अरुण जेटली स्टेडियमवर नेदरलँड विरुद्ध नामिबिया हा सामना पार पडला. सामना संपल्यानंतर स्टेडियमबाहेर पडत असताना एका प्रेक्षकाला अत्यंत घाणेरडा प्रकार दिसला. स्टेडियममधील काही कर्मचारी प्रेक्षकांनी अर्धवट सोडून दिलेले किंवा उरलेले थम्स अप गोळा करत होते. हे उरलेले शीतपेय एका मोठ्या कॅरेटमध्ये जमा करून पुन्हा प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये भरले जात होते. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये कर्मचारी उरलेले कोल्ड्रिंक पुन्हा बाटल्यांमध्ये भरताना स्पष्ट दिसत आहेत. व्हिडिओ बनवणाऱ्या व्यक्तीने म्हटले की, अरुण जेटली स्टेडियममध्ये थम्स अपच्या उरलेल्या बाटल्या पुन्हा भरल्या जात आहेत. पुढच्या सामन्यात या जुन्याच बाटल्या पुन्हा विकल्या जातील.

# फुटबॉल फॉर स्कूल कार्यक्रम संपन्न





**। माणगाव । सलीम शेख ।**

जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे अखिल भारतीय फुटबॉल महासंघ व भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, शिक्षा मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने राबवला जात असलेला फुटबॉल फॉर स्कूल हा उपक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून नितीन बडे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक माणगाव निवृत्ती बोराडे तसेच प्राचार्य नवयुग स्कूल महाड अश्विनीराजे जाधवराव हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वती यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना फुटबॉल खेळाची आवड निर्माण व्हावी त्याचबरोबर शारीरिक, मानसिक, भावनिक, सांघिक एकता व निर्णय क्षमता इत्यादी कौशल यांची वृद्धी व्हावी हा आहे.

आजच्या आधुनिक युगात विद्यार्थी शारीरिक खेळापासून दूर जात आहेत. मोबाईलच्या आहारी जाताना दिसून येत आहेत. आनंदमय आणि सुखी जीवनासाठी विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक खेळाची नितांत आवश्यकता आहे.

विद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार, विद्यालयाचे शारीरिक व्यायाम शिक्षक अरविंद्र सिंह यादव तसेच पूर्वा जोशी यांच्या कुशल नेतृत्वात जवळजवळ रायगड जिल्ह्यातील २३ विद्यालयातील शिक्षक प्रतिनिधींना १८६ फुटबॉल वितरित करण्यात आले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राघमवार, मुख्य अतिथी नितीन बडे, विशेष अतिथी निवृत्ती बोराडे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात खेळाचे महत्त्व या विषयावर आपल्या उद्बोधनातून सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन विद्यालयाचे मराठी शिक्षक कैलास वाघ यांच्याकडून करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार शारीरिक व्यायाम शिक्षिका पूर्वा जोशी यांच्याकडून करण्यात आले.

## ऑस्ट्रेलियासमोर आयर्लंड निष्प्रभ

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाने सलामीच्या लढतीतच आयर्लंडवर ६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. कोलंबोतल्या आर.प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने आयर्लंडचा धुव्वा उडवला. ऑस्ट्रेलियाने अडखळत १८२ धावांची मजल मारली. मात्र त्यानंतर ॲडम झंपा आणि नॅथन एलिस या जोडगोळीसमोर आयर्लंडच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. त्यांना ११५ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. मात्र प्रेमदासाच्या संथ आणि धीम्या खेळपट्टीवर ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे या सामन्यात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं.

# तेंडुलकरांच्या घरात लगीनघाई



**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा २०२६पासून सुरू आहेत. अर्जुन तेंडुलकर सानिया चंडोकबरोबर लग्न करणार आहे आणि त्यांच्या लग्नाची तारीखही रिपोर्ट्समध्ये समोर आली होती. अर्जुन व सानिया यांनी २०२५ मध्ये खाजगी समारंभात साखरपुडा उरकला होता. या लग्नाच्या चर्चांदरम्यान सचिन तेंडुलकरने पोस्ट शेअर करत लग्न होणार असल्याच्या चर्चांवर शिक्कामोर्तब केला आहे.

अर्जुन तेंडुलकर व सानिया चंडोक यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये खाजगी सोहळ्यात साखरपुडा केला होता. दोन्ही कुटुंबीय व जवळचा मित्रपरिवार यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला होता. तेंडुलकर व चंडोक कुटुंबियांनी गुपचूप साखरपुडा उरकल्यानंतर आता २०२६ मध्ये लग्नसोहळा पार पडणार आहे. यासाठी तेंडुलकर व चंडोक परिवार भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निमंत्रित करण्यासाठी गेले होते.

अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक ५ मार्च रोजी लग्न बंधनात अडकणार आहेत. लग्नापूर्वीचे विधी ३ मार्चपासून सुरू होतील. तर ४ मार्चला होळीचा सण देखील असणार आहे, त्यामुळे सणादरम्यान लग्नसोहळा असल्याने जोरदार सेलिब्रेशन होईल. या लग्नसोहळ्याला अनेक दिग्गज व्यक्ती उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# महिला क्रिकेटमध्ये नाशिकचा तेजस्वी तारा

**। नाशिक । वृत्तसंसथा ।**

महाराष्ट्र वरिष्ठ महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना नाशिकची एक खेळाडू सातत्याने आपल्या बॅटचे पाणी प्रतिस्पर्ध्यांना पाजत आहे. तिच्या दमदार फलंदाजीमुळे महाराष्ट्राने या स्पर्धेत सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे.

नाशिकच्या तेजस्विनी बाटवालने याआधी उत्तर प्रदेशवरील विजयात जोरदार ८३ धावा केल्या होत्या. उत्तर प्रदेश संघाने प्रथम फलंदाजी करत ४९.१ षटकांत २७६ धावा केल्या होत्या. महाराष्ट्रातर्फे यष्टीरक्षक तेजस्विनी बाटवालने यष्टीमागे दोन गडी बाद करण्यात वाटा उचलला. महाराष्ट्राने विजयासाठीच्या २७७ धावा सलामीच्या तेजस्विनी बाटवालच्या १० चौकारांसह ८३, कर्णधार अनुजा पाटीलच्या नाबाद ५३ व मुक्ता मगरेच्या ४८ धावांच्या जोरावर ४८.१ षटकांत ६ गडी राखून पार करत लागोपाठ दुसऱ्या विजयाची नोंद केली. तेजस्विनीने पहिल्या गड्यासाठी ८४ व दुसऱ्या गड्यासाठी ८९ धावांच्या महत्वपूर्ण भागीदाऱ्या केल्या.

स्पर्धेतील पहिल्या सामान्यात तेजस्विनी बाटवालने पुदुचेरीवरील विजयात अर्धशतक झळकावून मोठा वाटा उचलला. पुदुचेरी संघाने प्रथम फलंदाजी करत ४८.२ षटकांत १७९ धावा केल्या.यष्टीरक्षक तेजस्विनी बाटवालने ३ झेल टिपले. तेजस्विनीने पहिल्या दोन गड्यांसाठी अर्धशतकी भागीदारी केल्या.तेजस्विनी बाटवालच्या फलंदाजीतील या सातत्यपूर्ण कामगिरीबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.

शनाका-रत्नायके ठरले विजयाचे हिरो | ओमानचे सुपर-८ चे स्वप्न धुळीस

# श्रीलंकेचा ओमानवर दणदणीत विजय

**। कोलंबो । वृतसंस्था ।**

श्रीलंका संघाने टी-२० विश्वचषक २०२६ मधील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवत ओमानला पराभूत केलं आहे. श्रीलंका व ओमान यांच्यात टी-२० विश्वचषक २०२६ मधील पल्लेकले येथे सामना खेळवला गेला. या सामन्यात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी सर्वात मोठा विजय नोंदवला. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत २२५ धावा केल्या. तर प्रत्युत्तरात ओमानचा संघ २० षटकांत ९ बाद १२० धावाच करू शकला.

श्रीलंकेचा हा टी-२० विश्वचषक २०२६ मधील हा सलग दुसरा विजय आहे. ओमानवर श्रीलंकेने १०५ धावांनी मोठा विजय नोंदवल्यानंतर संघाला गुणतालिकेत नेट रन रेटमध्येदेखील मोठा फायदा होणार आहे. याशिवाय सलग दोन सामने जिंकत संघाने सुपर-८ चा मार्ग सुकर केला आहे. तर ओमान संघाला सलग दुसरा पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे सुपर-८ चं त्यांचं स्वप्न धुळीस मिळालं आहे.



### श्रीलंकेची वादळी फटकेबाजी

**श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना धावांचा डोंगर उभारला. ओमानने गोलंदाजीला सुरूवात चांगली केली, पण रत्नायके,कुसल मेंडिस व दासुन शनाका यांनी वादळी फलंदाजी केली. श्रीलंकेचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद होत माघारी परतले. यानंतर पवन रत्नायकेने २८ चेंडूत ८ चौकार व एका षटकारासह ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर दासुन शनाकाने १९ चेंडूत विक्रमी अर्धशतकी खेळी केली, तर २० चेंडूत त्याने २ चौकार व ५ षटकारांसह ५० धावा केल्या. तर कुसल मेंडिसने एका टोकाकडून मैदानावर राहत ४५ चेंडूत ७ चौकारांसह ६१धावा करत संघाचा डाव सावरला होता. तर कुसल मेंडिसने १९ धावांची झटपट खेळी करत २२५ धावा केल्या.**

श्रीलंकेने दिलेल्या २२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानची सुरूवात खूप खराब झाली. संघाचा कर्णधार व स्फोटक फलंदाज जतिंदर सिंग १ धाव करत बाद झाला.

वसीम अलीने २७ धावांची खेळी केली. तर मोहम्मद नदीमने अर्धशतकी खेळी केली. याशिवाय ओमानचे सर्व फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजीसमोर फेल झाले.

मोहम्मद नदीम शेवटपर्यंत नाबाद राहत त्याने संघासाठी ५६ चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह ५३ धावांची खेळी केली. नदीमचं हे आंतरराष्ट्रीय इतिहासातील पहिलं अर्धशतक होतं. श्रीलंकेकडून चमीरा व तीक्ष्णा यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर वेलाल्गे, मेंडिस, व दुशान हेमंता यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)